नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १७६ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




मंगळवार, दि. ०२ जून २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# एकाच पक्षाचे दोन उमेदवार


## मित्रपक्षांचे उमेदवार आमने-सामने

मुंबई : (स. गांवकरी)

विधान परिषदेच्या १७ स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांच्या निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी बंडखोरीला उधाण आले. भाजप वगळता सर्वच पक्षांत उमेदवारीवरून गोंधळ निर्माण झाला. अहिल्यानगर मतदारसंघात महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांच्या उमेदवारांनी अर्ज दाखल केले. तर पुण्यात राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या दोन उमेदवारांनी अर्ज दाखल केले तर यवतमाळमध्ये शिंदे गटातील दोन उमेदवारांनी अर्ज दाखल केल्याने संभ्रम निर्माण झाला. नांदेड, छत्रपती संभाजीनगर आणि रायगडमध्येही महायुती आणि महाविकास आघाडीत बंडखोरांनी अर्ज भरल्याने मित्रपक्ष आमने-सामने उभे ठाकले आहेत. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत ४ जून असल्याने त्यानंतरच या निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार आहे. महायुतीत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या वाट्याला दोन जागा आल्या आहेत. यापैकी पुणे स्थानिक प्राधिकारी मतदारसंघातून राष्ट्रवादीचे उमेदवार म्हणून उद्योजक संजय काकडे यांचे चिरंजीव विक्रम यांनी तसेच माजी आमदार सुनील टिंगरे यांनी अर्ज भरले आहेत. अहिल्यानगर स्थानिक प्राधिकारी मतदारसंघात भाजपच्या प्राजक्त तनपुरे यांच्या विरोधात राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या राणी लंके, काँग्रेसच्या करण ससाणे आणि शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या मछिंद्र धुमाळ यांनी अर्ज भरले आहेत.

यवतमाळ मतदारसंघात शिवसेना शिंदे गटातील दुष्यन्त चतुर्वेदी आणि मंत्री संजय राठोड यांच्या पत्नी शीतल राठोड यांनीही उमेदवारी अर्ज भरले, तर छत्रपती संभाजीनगर-जालना मतदारसंघात भाजपच्या सुहास शिरसाट यांच्या विरोधात शिवसेना शिंदे गटाचे माजी मंत्री अब्दुल सत्तार यांचे चिरंजीव समीर सत्तार यांनी बंडाचे निशाण फडकावले आहे. रायगड मतदारसंघात शिवसेना शिंदे गटाच्या जुईली दळवी यांनी अपक्ष अर्ज दाखल करत राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या अनिकेत तटकरे यांच्याविरोधात बंडखोरी केली आहे.

प्रदेश काँग्रेसने दिलेल्या माहितीनुसार नांदेड मतदारसंघातून रामदास पाटील -सुखटनकर हे पक्षाचे अधिकृत उमेदवार आहेत. त्याचवेळी माजी आमदार माधवराव पाटील -जळगावकर यांनीही अर्ज दाखल केला आहे. नांदेडमध्ये भाजपकडून अमर राजूरकर यांनी अर्ज भरला असून येथे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार प्रताप पाटील -चिखलीकर यांचे चिरंजीव प्रवीण आणि हिंगोलीत ठाकरे गटाचे उमेदवार डॉ.विवेक नावंदर यांच्याविरोधात ठाकरे गटाचे खासदार नागेश पाटील-अष्टीकर यांचे चिरंजीव कृष्णा यांनी बंडखोरी केली आहे.



### स्थानिक प्राधिकारी मतदारसंघातील उमेदवार

शिवसेना -शिंदे गट
ठाणे : रवींद्र फाटक
नाशिक: नरेंद्र दराडे
यवतमाळ: दुष्यन्त चतुर्वेदी किंवा शीतल राठोड
परभणी-हिंगोली :सईद खान

राष्ट्रवादी अजित पवार
रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग : अनिकेत तटकरे
पुणे : विक्रम काकडे किंवा सुनील टिंगरे

शिवसेना ठाकरे गट
नाशिक : अनिल कदम
परभणी-हिंगोली: डॉ.विवेक नावंदर
छत्रपती संभाजीनगर-जालना : देवयानी कृष्णा पाटील डोणगावकर
जळगाव : शरद तायडे
रायगड, रत्नागिरी-सिंधुदुर्ग : सुरेंद्र उर्फ बाळ माने

राष्ट्रवादी शरद पवार गट
पुणे: श्रीकांत पाटील
ठाणे: अभिजित पवार
सांगली-सातारा : बाळासाहेब उर्फ बापू पाटील

# अपात्र ८१ लाख लाडक्या बहिणींकडून पैसे परत घेणार नाही

## १४ हजार पुरुष लाभार्थ्यांकडून रक्कम वसूल करणार

मुंबई : (स. गांवकरी)

लाडकी बहीण योजनेत ८१ लाख महिला अपात्र ठरल्याने आता त्यांना देण्यात आलेले हजारो कोटी रुपये परत घेतले जाणार का असा प्रश्न निर्माण झाला होता. मात्र यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली असून या अपात्र ठरलेल्या ८१ लाख महिलांकडून पैसे वसूल केले जाणार नसल्याचे स्पष्ट केले. मात्र ज्या १४ हजार पुरुषांनी योजनेचा लाभ घेतला होता त्यांच्याकडून मात्र सर्व रक्कम वसूल केली जाणार आहे. लाडकी बहीण योजनेत ८१ लाख महिला अपात्र ठरल्याने विरोधकांकडून महायुती सरकारवर ताशेरे ओढण्यात आले. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या योजनेतील लाभार्थ्यांची संख्या कमी झाली याची माहिती दिली. डेटाबेसद्वारे लाभार्थ्यांची पडताळणी केल्यानंतर योजनेचा महिलांच्या नावे अर्ज करून लाभ घेणारे १४ हजार पुरुष निघाले, ५ लाख सरकारी, १० लाख प्राप्तीकर भरणाऱ्या महिला, घरी चारचाकी असणाऱ्या पाच लाख महिला असल्याचे समोर आले. त्याचप्रमाणे ईकेवायसी सक्ती केल्यानंतरही अनेक महिलांनी ईकेवायसीच केली नाही. त्यामुळे अशा प्रकारे योजनेसाठी अपात्र ठरणाऱ्यांचे मानधन थांबविण्यात आले. त्याचप्रमाणे ज्या २५ लाख महिलांची केवायसी भरताना



चूक झाली होती त्यांनाही सुधारणा करण्याची संधी देण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. या योजनेसाठी भारताचे नियंत्रक आणि लेखा परीक्षकांकडून (कॅग) लेखापरीक्षण केले जाईल तेव्हा अपात्र महिलांना मानधन दिल्याबद्दल विचारणा होईल. मात्र तरीही पुरुष सोडून ज्या महिला अपात्र ठरल्या आहेत त्यांना एकवेळची माफी म्हणून त्यांच्याकडून पैसे वसूल केले जाणार नाहीत. पण १४ हजार पुरुषांकडून मात्र पैसे वसूल केले जातील.

हा पैसा जनतेचा आहे त्यामुळे तो नियमानेच खर्च करावा लागतो असेही त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी लाडकी बहीण योजनेसाठी आवश्यक असेल तर पुन्हा केवायसी विंडो सुरु करण्याची तयारीही मुख्यमंत्र्यांनी दाखवली. ई-केवायसी प्रक्रिया गेल्या वर्षी ऑगस्टपासून सुरू करण्यात आली होती. मात्र, ई-केवायसी हा निकष केवळ लाडकी बहीण योजनेसाठी नसून राज्यातील सर्व थेट लाभ हस्तांतरण योजनांसाठी लागू आहे.

## थोडक्यात...

### एसटीच्या ताफ्यात सर्व इलेक्ट्रिक बसेस

मुंबई (स. गांवकरी) : 'विकसित महाराष्ट्र २०४७'च्या दृष्टिकोनातून राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व एसटी बसेस टप्प्याटप्प्याने ई-बसेस करण्यात येणार आहेत. त्यासाठी आवश्यक चार्जिंग स्टेशनचे राज्यव्यापी जाळे उभारण्याच्या कामाला गती द्या, असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली 'वर्षा' निवासस्थानी राज्य परिवहन महामंडळाच्या ई-बसेस प्रकल्पाचा आढावा घेण्यात आला. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. एसटीचा ५० टक्के ताफा २०२९ पर्यंत, ८० टक्के ताफा २०३५ पर्यंत आणि १०० टक्के ताफा २०४७ पर्यंत ई-बसेसमध्ये रूपांतरित करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर बसमार्गांचे कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाच्या साहाय्याने विश्लेषण करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. तसेच पुरवठादारांकडून बस प्राप्त झाल्यानंतर सात दिवसांच्या आत त्यांची तपासणी पूर्ण करण्यास सांगितले. ई-बसेससाठी स्वतंत्र परिसंस्था (इकोसिस्टम) विकसित करण्याबरोबरच ज्या मार्गांवर सध्या खासगी बससेवा चालते.

# युरियाच्या आयात खर्चात ११२ टक्क्यांनी वाढ

मुंबई : (स. गांवकरी)

आखाती युद्धामुळे नैसर्गिक वायूच्या उत्पादनात झालेली घट , वाढलेला वाहतूक खर्च आणि सागरी वाहतुकीच्या विमा खर्चात चार पटीने झालेली वाढ यातून युरियाच्या आयात खर्चात गतवर्षाच्या तुलनेत ११२ टक्क्यांनी वाढ झाली आहे. डाय अमोनियम फॉस्फेटच्या आयात खर्चात ३८ टक्क्यांनी वाढ झाली आहे. वाढलेल्या आयात खर्चामुळे केंद्र सरकारवर मोठा आर्थिक बोजा पडत असून, खतांवरील अनुदानाची रक्कम यंदा दुप्पट होण्याची भीती आहे. आखाती युद्धाचा सर्वाधिक भीषण परिणाम जागतिक रासायनिक



खतांचे उत्पादन आणि वाहतुकीवर झाला आहे. चीन आणि भारत या मोठ्या देशांसह अन्य आशियाई आणि आग्नेय आशियाई देशांत जूनच्या सुमारास पेरण्या होतात. त्यामुळे रासायनिक खतांच्या मागणी मोठी वाढ होते. नेमक्या याच काळात आखाती युद्धामुळे वाहतूक खर्चात वाढ झाली आहे. सागरी विमा वाहतुकीच्या रक्कमेत चार पटीने वाढ झाली आहे. युरिया खतासाठी आवश्यक असणाऱ्या नैसर्गिक वायूच्या उत्पादनावर विपरीत परिणाम झाला आहे. त्यामुळे रासायनिक खतांच्या किंमतीत बेसुमार वाढ झाली आहे. भारताला युरिया आखाती देशातून युरियाचा पुरवठा होतो. पण, आखातातील अनेक खनिज तेल आणि नैसर्गिक वायूच्या उत्खनन प्रकल्पावर हल्ले झाल्यामुळे नैसर्गिक वायूच्या उत्पादनावर परिणाम झाला आहे. त्यामुळे खत निर्मिती कंपन्यांना नैसर्गिक वायूचा तुटवडा जाणवत आहे. त्यामुळे आखातातून तयार युरियाच्या आयात खर्चात ११२ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

# अब्दुल सत्तारांच्या आरोपांनंतर संजय राऊतांचं सुचक विधान

मुंबई : (स. गांवकरी)

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विधान परिषद निवडणुकीच्या निमित्ताने महायुतीतील वाद चव्हाट्यावर आला आहे. छत्रपती संभाजीनगरसह अनेक मतदारसंघांमध्ये उमेदवारीवरून प्रचंड वाद झाले. अखेर, हे वाद संपुष्टात येऊन उमेदवारांची अंतिम यादी जाहीर झाली. मात्र, ज्यांना संधी मिळाली नाही त्यांनी बंडखोरी करत अपक्ष अर्ज भरला आहे. यामध्ये शिवेसना (एकनाथ शिंदे) पक्षाचे माजी मंत्री अब्दुल सत्तार यांचा सुपूत्र समीर सत्तार यांचाही समावेश आहे. एकीकडे उमेदवारीवरून गोंधळ सुरू असतानाच



अब्दुल सत्तार यांनी भाजपावर टीकास्त्र डागलं आहे. त्यांनी भाजपावर पक्षफोडीचा आरोप केल्याने राजकारणात खळळ माजली आहे. यावरूनच शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे नेते संजय राऊतांनी प्रतिक्रिया दिली. शिवसेना पक्ष तोडण्याचा कार्यक्रम सुरू आहे. हात तोडायचे, पाय तोडायचे असं हळूहळू सुरू असल्याचा आरोप अंबादास दानवेंनी आज केला होता. या दाव्यावर अब्दुल सत्तार म्हणाले, "आमचं तर मुंडकंच तोंडून टाकलं. अनेक वर्षांची असलेली आमची जिल्हा परिषद गेली. महापालिकेतील सत्ता संपली. आता राहिलं काय? लहान मोठ्या जागांवर भाजपा जागा बळकावत आहे. शिवसेनेत दोन भाग करायचे, एकाला हाताशी धरायचं आणि दुसऱ्यावर अन्याय करायचा. दुसऱ्याला धरायचं अन् तिसऱ्यावर अन्याय करायचा. अशा पद्धतीने आमचा मोठा भाऊ आम्हाला संपवत असेल तर त्याला इलाज नाही. " दरम्यान, अंबादास दानवे यांनी दोन्ही पक्षांनी एकत्र यावं, असंही आवाहन केलं होतं. त्यावर अब्दुल सत्तार यांनी उत्तर दिलं की, "मलाही वाटतं की आता दोन्ही शिवसेना पक्षांनी एकत्र यायला हवं. आमच्या नेत्यांनी, म्हणजे एकनाथ शिंदे यांनी जर एकत्र येण्याचा निर्णय घेतला, तर कोणालाही विचारण्याची गरज उरणार नाही. एका मिनिटांत आम्ही तयार होऊ. माझा नेता जो निर्णय घेईल, तो मला पूर्णपणे मान्य असेल", असे त्यांनी यावेळी म्हटले. दोन्ही शिवसेनेने एकत्र यावं, या अब्दुल सत्तार यांच्या वक्तव्यावर राजकीय पडसाद उमटायला सुरुवात झाली. त्यावर शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे खासदार आणि प्रवक्ते संजय राऊत यांनीही प्रतिक्रिया दिली.

# सेना, राष्ट्रवादीच्या जागांत कपात

## विधान परिषद निवडणुकीत भाजपचा वरचष्मा



### भाजपची भिस्त पुन्हा आयातांवर

भाजपचे ११ पैकी पाच उमेदवार हे अन्य पक्षांमधून भाजपवासी झालेले आहेत. छत्रपती संभाजीनगरमध्ये भाजपने उमेदवारी दिलेले सुहास शिरसाट हे राष्ट्रवादीचे पदाधिकारी होते. त्यांची आई जिल्हा महिला राष्ट्रवादीच्या अध्यक्षा होत्या. अमर राजूरकर, बसवराज पाटील हे काँग्रेसचे माजी आमदार आहेत. प्राजक्त तनपुरे हे राष्ट्रवादीचे माजी आमदार आहेत. राजेंद्र राऊत हे काँग्रस व शिवसेनेत आमदार होते.

### कोण आहेत मतदार ?

स्थानिक प्राधिकारी मतदारसंघात महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायतींचे नगरसेवक तसेच जिल्हा परिषदांचे सदस्य व पंचायत समित्यांचे सभापती हे मतदार असतात. गुप्त पद्धतीने मतदान होत असल्याने आर्थिकदृष्ट्या सक्षम किंवा नगरसेवकांची मते खरेदी करण्याची ऐपत असलेल्याला विजय मिळविणे सहज शक्य होते. नगरसेवकांची मते मिळविण्यात यशस्वी होणाऱ्या उमेदवाराचे पारडे नेहमी जड असते. निवडणुकीचे चित्र माघारीनंतर गुरुवारी स्पष्ट होणार असले तरी प्रत्यक्ष मतदान झाल्यास नगरसेवकांचा 'भाव' वाढणार आहे.

मुंबई : (स. गांवकरी)

विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांतील निवडणुकीवरून सत्ताधारी महायुतीत बंडखोरी झाली असतानाच, दुसरीकडे भाजपने शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाला कमी जागा सोडत मित्र पक्षांना त्यांची जागा दाखवून दिली आहे. महायुतीतील बंडखोरी शमविण्याचे मोठे आव्हान नेतेमंडळींसमोर आहे. प्रत्यक्ष मतदान झाल्यास मोठ्या प्रमाणावर नगरसेवकांच्या मताला भाव येण्याची वर्तविली जात आहे.

विधान परिषदेच्या १७ जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीत महायुतीत भाजपने ११ जागा स्वत:साठी ठेवल्या आहेत. शिवसेना शिंदे गटाला चार तर राष्ट्रवादी अजित पवार गटाला दोन जागा सोडल्या आहेत. करोना साथीमुळे पालिकांच्या निवडणुका रखडल्याने स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांमधील निवडणुका होऊ शकल्या नव्हत्या. मुदत संपलेल्या या जागांमध्ये भाजप सात, शिवसेना पाच, राष्ट्रवादी ३ तर काँग्रेसचे दोन आमदार होते. अर्थात तेव्हा शिवसेना व राष्ट्रवादीत फूट पडलेली नव्हती.

या वेळी भाजपने शिवसेना, राष्ट्रवादीने गेल्या वेळी जिंकलेल्या छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर या जागा स्वत:कडे घेतल्या आहेत. याशिवाय गेल्या वेळी काँग्रेसने जिंकलेल्या सातारा-सांगली, नांदेड या मतदारसंघांतही उमेदवार उभे केले आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे छत्रपती संभाजीनगरच्या जागेसाठी शेवटपर्यंत आग्रही होते. पण भाजपने ही जागा सोडण्यास ठाम नकार दिला. राष्ट्रवादीला पुण्याच्या जागेसाठी शेवटपर्यंत ताटकळत ठेवले होते. पुण्याची जागा सोडण्यास भाजपची तयारी नव्हती.

एकूणच या निवडणुकीत भाजपने शिवसेना शिंदे व राष्ट्रवादी अजित पवार या दोन्ही मित्र पक्षांची अधिकच्या जागांची मागणी मान्य केली नाही. रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्गमध्ये शिवसेना शिंदे गटाच्या नगरसेवकांची संख्या जास्त असली तरी सुनील तटकरे यांनी ही जागा मुलासाठी प्रतिष्ठेची केल्याने भाजपने शिंदे यांना या जागेवरील दावा मागे घेण्यास भाग पाडल्याचे सांगण्यात येते.

छत्रपती संभाजीनगर मतदारसंघ भाजपच्या वाट्याला गेला असला तरी माजी मंत्री अब्दुल सत्तार यांच्या मुलाने बंडखोरी केली आहे. रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघात राष्ट्रवादीचे अनिकेत तटकरे यांच्या विरोधात शिवसेनेचे आमदार महेंद्र दळवी यांच्या विरोधात बंड केले आहे.

पुण्यात राष्ट्रवादीत उमेदवारीवरून वादावादी झाली. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत ही गुरुवारपर्यंत आहे. या मुदतीत बंडखोरांची मनधरणी केली जाईल.



## थोडक्यात पण महत्वाचे



### निवडणूकीच्या दिलेल्या जबाबदाऱ्या पार पाडा : अपर जिल्हाधिकारी

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : महाराष्ट्र विधान परिषदेच्या नांदेड स्थानिक प्राधिकार मतदारसंघाची द्वैवार्षिक निवडणूक प्रक्रिया पारदर्शक आणि शांततेत पार पाडण्यासाठी सर्व नोडल अधिकारी व सहाय्यक अधिकारी यांनी दिलेली कामे व जबाबदाऱ्या पार पाडण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करावी, असे निर्देश अपर जिल्हाधिकारी रत्नदीप गायकवाड यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठक कक्षात आज सर्व विभाग प्रमुखांची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी उपजिल्हाधिकारी (सामान्य) अजय शिंदे, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) राजकुमार माने, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, उपजिल्हाधिकारी (रोहयो) हनुमंत कोळेकर, उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी निवडणूकीच्या अनुषंगाने दिलेल्या जबाबदाऱ्या व कामे सर्व नोडल अधिकारी व सहाय्यक अधिकारी यांनी चोखपणे पार पाडाव्यात या अनुषंगाने निवासी उपजिल्हाधिकारी तथा सहा. निवडणूक निर्णय अधिकारी किरण अंबेकर यांनी सूचना दिल्या. निवडणूकीच्या अनुषंगाने एफएसटी पथके व्हिडीओ कॅमेरासह स्थापन करावेत. जिल्ह्यात आचारसंहितेचा भंग होणार नाही याची दक्षता सर्व विभाग प्रमुखांनी घ्यावी असेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी मतदान व मतमोजणीच्या अनुषंगाने करण्यात येणारे नियोजनासह विविध अनुषंगिक बाबीवर चर्चा करण्यात आली.

### निवडणुकीसाठी ८ उमेदवारांचे १७ नामनिर्देशन अर्ज दाखल

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : महाराष्ट्र विधान परिषदेच्या 16 स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांच्या द्विवार्षिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नांदेड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघासाठी नामनिर्देशन अर्ज दाखल करण्याची मुदत आज संपली. 27 मे ते 1 जून दरम्यान एकूण 8 उमेदवारांनी 17 नामनिर्देशन अर्ज दाखल केले आहेत. भाजपचे अमरनाथ राजूरकर आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे रामदास पाटील यांनी पक्षाचा अधिकृत AA-BB फॉर्म सादर केला आहे. नामनिर्देशन अर्जांची छाननी 2 जून रोजी होणार असून, अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख 4 जून 2026 आहे. मतदान 18 जून 2026 रोजी सकाळी 8 ते दुपारी 4 वाजेपर्यंत होईल, तर मतमोजणी 22 जून 2026 रोजी करण्यात येणार आहे. या निवडणुकीत नांदेड जिल्ह्यातील 452 पात्र मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

### रुग्ण व नातेवाईकांसाठी वॉटर फिल्टर विथ कुलरचे दान




नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, विष्णुपुरी येथे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना स्वच्छ व आरोग्यदायी पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे या उद्देशाने वॉटर फिल्टर विथ कुलर दान करण्यात आला आहे. भीषण उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर रुग्ण व नातेवाईकांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन हॅपी क्लब व नांदेड शांतता कमिटी यांच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला. ॲड. मोहम्मद कासिम वसीम बाबुसेठ तसेच हॅपी क्लबचे अध्यक्ष मोहम्मद शोहेब यांच्या सहकार्याने बालरोग विभागातील वॉर्ड क्रमांक ७ साठी हा वॉटर फिल्टर विथ कुलर रुग्णालयास प्रदान करण्यात आला. याप्रसंगी अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख, वैद्यकीय अधीक्षक डॉ. विजयकुमार कापसे, बालरोग विभागप्रमुख डॉ. किशोर राठोड, उपवैद्यकीय अधीक्षक डॉ. शिवानंद देवसरकर, अधिसेविका बी. आर. मुदीराज यांच्यासह कर्मचारी व रुग्णनातेवाईक उपस्थित होते. यावेळी अधिष्ठाता डॉ. देशमुख यांनी समाजातील दाते, सामाजिक संस्था आणि सुजाण नागरिकांनी सामाजिक दायित्वाच्या भावनेतून रुग्णालयाला रुग्णोपयोगी साहित्य उपलब्ध करून द्यावे, असे आवाहन केले. अशा उपक्रमांमुळे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना थेट लाभ मिळत असून अधिकाधिक दाते पुढे येऊन आरोग्यसेवेसाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देतील, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. देण्यात आलेल्या साहित्याची योग्य देखभाल व व्यवस्थापन करण्याच्या सूचनाही संबंधित वॉर्डाला देण्यात आल्या. तसेच रुग्ण व नातेवाईकांनी उपलब्ध सुविधांचा जबाबदारीने वापर करावा, असे आवाहन करण्यात आले. या उपक्रमासाठी रुग्णालय प्रशासनाच्या वतीने राजरत्न केळकर व कुणाल महागडे (समाजसेवा अधीक्षक) यांनी संस्थेशी समन्वय साधून अधिष्ठाता यांच्या मार्गदर्शनाखाली वॉटर फिल्टर उपलब्ध करून घेण्यासाठी विशेष प्रयत्न केले. रुग्णालय प्रशासनाने दात्यांचे आभार मानून भविष्यातही अशा सामाजिक उपक्रमांसाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले.

### हदगाव तालुक्यातील निवघा गावात तरुणाचा खून, मित्र गंभीर जखमी



तामसा (स. गांवकरी) : हदगाव तालुक्यातील निवघा गावात पत्याच्या डावावरून झालेल्या पैशांच्या उधारीच्या वादातून एका तरुणाची हत्या झाल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेत एका तरुणाचा मृत्यू झाला असून त्याचा मित्र गंभीर जखमी झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, विजय नारायण (बाळू) कदम (वय 23, रा. निवघा, ता. हदगाव) असे मृत तरुणाचे नाव आहे. तर त्याचा मित्र रामा मारोती गजभारे (वय 22) हा गंभीर जखमी झाला आहे. शनिवारी रात्री सुमारे 10 वाजण्याच्या दरम्यान विजय कदम व रामा गजभारे हे गावात पत्याचा डाव खेळत बसले होते. त्याचवेळी दुसऱ्या गटातील काही युवक तेथे आले. यांच्यामध्ये पूर्वी दिलेल्या पैशांच्या देणे-घेणे (उधारी) प्रकरणावरून वाद सुरू झाला. विजय व रामाने त्यांच्याकडे दिलेले पैसे परत मागितल्याने दोन्ही बाजूंमध्ये जोरदार शाब्दिक चकमक झाली. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि एका आरोपीने धारदार शस्त्राने हल्ला केल्याची माहिती समोर आली. या हल्ल्यात विजय कदम यांचा जागीच मृत्यू झाला, तर रामा गजभारे गंभीर जखमी झाला. जखमीवर उपचार सुरू असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून आरोपींचा शोध घेतला जात आहे. या घटनेमुळे हदगाव तालुक्यातील निवघा गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# तीन कर्मचाऱ्यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा संपन्न

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात दीर्घकाळ समर्पित सेवा बजावून सेवानिवृत्त होत असलेल्या तीन कर्मचाऱ्यांचा सपत्नीक सेवापूर्ती गौरव सोहळा अधिसभा सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. विद्यापीठाच्या वतीने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सपत्नीक शाल, स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र तसेच साडी-चोळी देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन हे होते. व्यासपीठावर कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, नवोपक्रम व नवसंशोधन मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. मारुती गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विद्यापीठातील विविध विभागांत उल्लेखनीय सेवा बजावलेल्या श्याम भरतराव डाकोरे (लेखाधिकारी), श्यामराव शेषराव हंबर्डे (सेवक) आणि आसाराम बापूराव काटकर (सफाईदार) यांचा सपत्नीक सन्मान करण्यात आला. लेखाधिकारी श्याम भरतराव डाकोरे यांनी विद्यापीठात सुमारे ३० वर्षे सेवा बजावत संपदा विभाग, लेखा विभाग, भंडार विभाग आणि प्रकाशन विभागात कार्य केले.

श्यामराव शेषराव हंबर्डे यांनी १९९६ पासून सेवक पदावर कार्यरत राहून संपदा विभाग, विद्यार्थी विकास विभाग, प्रकाशन विभाग आणि परीक्षा विभागात आपली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. तर आसाराम बापूराव काटकर यांनी सफाईदार पदावर कार्यरत राहून पात्रता विभाग, स्थावर विभाग, कुलगुरू निवासस्थान, शैक्षणिक विभाग, माध्यमशास्त्र संकुल तसेच श्री गुरु गोविंद सिंगजी अध्यासन संकुल व संशोधन केंद्र येथे सेवा बजावली. अध्यक्षीय समोपात बोलताना प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव करताना, "विद्यापीठ हे केवळ संस्था नसून एक कुटुंब आहे. या कुटुंबातील सदस्यांच्या प्रदीर्घ आणि निष्ठावंत सेवेचा गौरव करणे ही विद्यापीठाची समृद्ध परंपरा आहे," असे प्रतिपादन केले. सत्काराला उत्तर देताना लेखाधिकारी श्याम डाकोरे यांनी गेल्या तीन दशकांतील सहकार्याबद्दल विद्यापीठ प्रशासन, अधिकारी, सहकारी कर्मचारी यांचे आभार व्यक्त केले. यावेळी उपस्थित सहकाऱ्यांनीही निवृत्त कर्मचाऱ्यांविषयीच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या कार्याचा गौरव केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. जगदीश कुलकर्णी यांनी केले. या सोहळ्यास विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी, मान्यवर तसेच सत्कारमूर्तींचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन

मुखेड : (स. गांवकरी)

राजसत्ता ही वैभवासाठी नव्हे, तर जनतेच्या कल्याणासाठी असते, हा आदर्श आपल्या कार्यातून जगाला दाखवून देणारे तेजस्वी व्यक्तिमत्त्व म्हणजे पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर. स्त्रीशक्ती, न्याय, करुणा, दूरदृष्टी आणि लोकसेवा यांचे मूर्तिमंत प्रतीक असलेल्या अहिल्यादेवींनी आपल्या राज्यकाळात विकासाची अशी गंगा वाहिली की आजही त्यांचे कार्य प्रेरणेचा अखंड स्रोत आहे. दुःखाचे डोंगर कोसळूनही त्या खचल्या नाहीत; उलट सामान्य जनतेच्या सुखासाठी त्यांनी स्वतःचे संपूर्ण आयुष्य अर्पण केले. घाट, विहिरी, मंदिरे, धर्मशाळा, रस्ते आणि जनहिताची अनेक कामे उभारून त्यांनी विकासाचा आदर्श निर्माण केला. स्त्रियांच्या सन्मानासाठी, शिक्षणासाठी आणि स्वावलंबनासाठी घेतलेले निर्णय त्या काळात क्रांतिकारी ठरले. त्यांच्या न्यायप्रिय आणि लोकाभिमुख राज्यकारभारामुळे प्रजेच्या मनात त्या "राजमाता" म्हणून अजरामर झाल्या. आज समाजात माणुसकी, प्रामाणिकपणा आणि लोकसेवेची भावना जपण्याची गरज आहे. अशा वेळी अहिल्यादेवींचे विचार आणि कार्य नव्या पिढीसाठी दीपस्तंभासारखे मार्गदर्शक आहेत. त्यांचा आदर्श प्रत्येक जनप्रतिनिधी, समाजसेवक आणि नागरिकाने आचरणात आणणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. लोककल्याण, न्याय आणि सेवाभावाचा अखंड दीप म्हणजे पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर! त्यांच्या पवित्र जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन व कोटी कोटी प्रणाम "ज्या मातेनं राज्याला कुटुंब मानलं, जनतेला आपली लेकरं मानलं आणि न्यायाला धर्म मानलं, त्या पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे स्मरण म्हणजे प्रेरणेचा अखंड उत्सव आहे.

## अपघातग्रस्त कुटुंबाच्या दुःखात वैदू समाज संघटना सहभागी

**सूरज शिंदे कुटुंबाचे डॉ. विश्वासराव आरोटे यांनी केले सांत्वन, आर्थिक मदतीचे वाटप!**

संगमनेर : (स. गांवकरी)

- आर्थिक मदत व किराणा किटचे वाटप!



संगमनेर विधानसभा मतदार संघातील काही दिवसांपूर्वी झालेल्या अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या सूरज सुरेश शिंदे यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन करण्यासाठी विविध सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट दिली. यावेळी कुटुंबाला आर्थिक मदत, किराणा किट तसेच सांत्वनपर भेट देण्यात आली. या प्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, अखिल महाराष्ट्र वैदू समाजाचे अध्यक्ष स्वामी शिरकुल, माजी अध्यक्ष शामलिंग शिंदे, वैदू समाजाचे पाटील साहेबराव शिंदे, शामराव शिंदे, आण्णा शिंदे, बबन गायकवाड, वैदू समाज प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजू शिंदे, उपाध्यक्ष रवि शिंदे, सदस्य मच्छिंद्र शिंदे, जग्गू शिंदे, अशोक शिंदे, मुशिलगया शिंदे तसेच सिन्नरचे कन्हैया धनगर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ. विश्वासराव आरोटे यांनी सांगितले की, अखिल भारतीय वैदू सामाजिक संघटना समाजातील प्रत्येक कुटुंबाच्या सुख-दुःखात सहभागी होत असून गरजू बांधवांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे. संघटनेच्या माध्यमातून तरुण आणि ज्येष्ठ नागरिकांना एकत्र आणून केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना, प्रशिक्षण उपक्रम आणि सामाजिक विकासाच्या संधी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. अपघातग्रस्त कुटुंबाला दिलासा देण्यासाठी संघटनेने पुढाकार घेतल्याबद्दल कुटुंबीयांनी उपस्थितांचे आभार मानले. या भेटीदरम्यान संवेदनशील वातावरणात मृताच्या कुटुंबीयांना धीर देत समाजातील एकोप्याचे दर्शन घडले.

## अर्धापूरात इंग्रजी माध्यमांच्या शाळांचा सुळसुळाट

**मान्यता, स्थलांतर व नियम पालनाबाबत चौकशीची मागणी**

अर्धापूर : (स. गांवकरी)

अर्धापूर शहरात गेल्या २ ते ३ दशकांपासून इंग्रजी माध्यमांच्या शाळांची संख्या झपाट्याने वाढत असून अनेक शाळांच्या मान्यता, स्थलांतर आणि नियम पालनाबाबत फार मोठे भयंकर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.शिक्षण विभागाने या महत्त्वाच्या व मोठ्या समस्या व प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन ताबडतोब सर्वंकष चौकशी करावी अशी मागणी अभ्यासू , जागरूक नागरिक व पालकांकडून करण्यात येत आहे.सध्या पालकांचा इंग्रजी माध्यमांच्या शिक्षणाकडे वाढता कल लक्षात घेता शहरात २ ते ४ वर्षात मोठ्या प्रमाणावर नवीन शाळा सुरू झाल्या आहेत. परंतु अनेक शाळा काही वर्षे सुरू राहून नंतर बंद पडल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्यावर त्याचे परिणाम झालेले आहेत. अशा शाळांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या टी.सी.,निर्गम उतारे व इतर शैक्षणिक कागदपत्रांसाठी पालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याची तक्रार आहे.तामसा रोड परिसरात यापूर्वीच अवघ्या काही अंतरावर अनेक इंग्रजी माध्यमांच्या शाळा कार्यरत आहेत.अशा परिस्थितीत एकाच परिसरात इतक्या शाळांना मान्यता देताना शासनाच्या नियमांचे पालन झाले आहे का,याबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत.काही शाळांनी पूर्वी मान्यता नसताना किंवा इतर ठिकाणच्या मान्यतेच्या आधारे शाळा चालवल्याच्या तक्रारी समोर आल्या असून काही संस्थांनी मूळ मान्यता मिळालेल्या ठिकाणाऐवजी अन्यत्र शाळा सुरू केल्याचेही सांगितले जात आहे.त्यामुळे संबंधित शाळांची मूळ मान्यता,दाखविण्यात आलेली जमीन,इमारत,स्थलांतराची परवानगी आणि व्यवस्थापनातील बदल यांची सखोल चौकशी करण्याची मागणी होत आहे.

सेल्फ फायनान्स तत्त्वावरील शाळांना ज्या ठिकाणासाठी शासनाने मान्यता दिली आहे त्याच ठिकाणी त्या कार्यरत आहेत का,आवश्यक जमीन,इमारत व इतर भौतिक सुविधा उपलब्ध आहेत का अशा नियमाच्या सर्व बाबींची तपासणी करण्यात यावी अशी मागणी नागरिकांनी केली आहे.कारण हे संस्था चालक फक्त हातमिळवणी करून देवाण घेवाण करतात व अर्थकारण करून शाळांना शासनाच्या आदेशाला केराची टोपली दाखवून,शासनाचे सर्व नियम धाब्यावर बसवून वरील समस्याग्रस्त शाळांना मान्यता देतात व घेतात आणि अशा शाळांमुळे विद्यार्थ्यांचे भविष्य,मान्यता शाळा,पालक, नागरिक,गावं,शहर व तालुका अशा सर्वांना त्रास देवून त्यांचे नुकसान करीत आहेत. त्यामुळे अशा फसव्या शाळांमुळे मान्यताप्राप्त शाळा व त्या शाळेत शिकणारे अभ्यासु, हुशार विद्यार्थी ज्यांचे भविष्य उज्वल आहे अशा सर्वांचे अतोनात नुकसान होत आहे.

त्यामुळे अशा प्रकारच्या महत्वाच्या,मोठ्या व गंभीर समस्ये बाबत पंचायत समिती अर्धापूर, जिल्हा परिषद शिक्षण विभाग नांदेड,शिक्षण उपसंचालक,शिक्षण संचालक व शिक्षण आयुक्त यांनी संयुक्तपणे चौकशी करून दोषी आढळणाऱ्या संस्था व व्यक्तींवर योग्य ती कार्यवाही ताबडतोब करावी अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा या प्रश्नावर पालक,विद्यार्थी व जागरूक नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर आंदोलन छेडण्यात येणार असल्याचा इशाराही देण्यात आला आहे व होणाऱ्या परिणामास वरील मिलीभगत करणारे जवाबदार राहतील असे कळविण्यात आले आहे.

## घाणीचे साम्राज्य; नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

हिमायतनगर : (स. गांवकरी)



हिमायतनगर शहरात सध्या अनेक भागांमध्ये घाणीचे साम्राज्य पसरल्याचे चित्र दिसून येत आहे. रस्त्यांच्या कडेला साचलेला कचरा, तुंबलेल्या गटारी आणि अस्वच्छ परिसरामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे शहरातील स्वच्छतेचा प्रश्न गंभीर बनला आहे. काही ठिकाणी कचऱ्याचे ढीग अनेक दिवसांपासून उचलले जात नसल्याने दुर्गंधी पसरत असून डास व माशांचा प्रादुर्भाव वाढला आहे. त्यामुळे साथीच्या रोगांचा धोका निर्माण झाला असून नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा संबंधित विभागाकडे तक्रारी केल्या असल्या तरी ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप केला जात आहे. विशेषतः पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नाल्यांची स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापन तातडीने करण्याची मागणी होत आहे. हिमायतनगर शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी नगर प्रशासनाने त्वरित लक्ष देऊन नियमित स्वच्छता मोहीम राबवावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. अन्यथा येणाऱ्या काळात आरोग्यविषयक समस्या अधिक गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## वृद्ध शेतकरी व मुलीचा आत्मदहनाचा इशारा

तामसा : (स. गांवकरी)

हदगाव तालुक्यातील तामसा परिसरातील एका 70 वर्षीय शेतकऱ्याने आणि त्यांच्या मुलीने न्याय न मिळाल्यास तहसील कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशारा दिल्याने खळबळ उडाली आहे. याबाबत त्यांनी तहसीलदार, हदगाव यांना निवेदन सादर केले आहे. निवेदनानुसार, मौजे उमरी येथील गट क्रमांक 286 मधील शेतीवर गेल्या सुमारे 70 वर्षांपासून कुटुंबाचा ताबा असून त्या जमिनीत कल्पा पावर कंपनी यांनी विनापरवाना 5ते आठ हजार ब्रास जेसीबीने माळ उत्खलन करून काम सुरू होते. कंपनीने शेतजमिनीवर अतिक्रमण करून ताबा घेण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. तक्रारदार मिराबाई शंकर जाधव व वसंत उमला राठोड यांनी कंपनी च्या विरोधात संबंधित मंडळ अधिकारी यांना तक्रार देऊनही कंपनी विरुद्ध काही न कारवाई करता आम्ही पंचनामा सादर करून संबंधित अहवाल तहसीलदार हदगाव यांना पाठवला आहे. कंपनीच्या विरोधात रात्रीच्या वेळी जेसीबीच्या सहाय्याने गट क्रमांक 286 मधील मुरूम नेण्यात आला. तसेच स्वतःला व मुलीला धमकावून शेतीवर कब्जा करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, संबंधित प्रकरणात मंडळ अधिकाऱ्यांनी पंचनामा न केल्यामुळे न्याय मिळत नसून कंपनीच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच, प्रशासनाने दखल न घेतल्यास तहसील कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान, या गंभीर आरोपांबाबत प्रशासनाकडून अद्याप अधिकृत भूमिका समोर आलेली नसून, संबंधित प्रकरणाची चौकशी करून योग्य ती कार्यवाही करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## डीवायएसपी पानेगावकरांचा पहाटेचा दणका

नायगाव : (स. गांवकरी)

- अंतरगावच्या अवैध वाळू साम्राज्यावर धाड
- जेसीबी, दोन ट्रॅक्टर, हायवा आणि दुचाकींसह ७६.५० लाखांचा मुद्देमाल जप्त
- दहा जणांवर गुन्हा दाखल



नांदेड जिल्ह्यात सुरू असलेल्या 'ऑपरेशन क्रॅकडाऊन' अंतर्गत बिलोली उपविभागाचे पोलिस उपअधीक्षक श्याम पानेगावकर यांनी रविवारी पहाटे अंतरगाव शिवारातील गोदावरी नदीपात्रात सुरू असलेल्या अवैध वाळू उपशावर धडक कारवाई केली. या कारवाईत एक हायवा, दोन ट्रॅक्टर-ट्रॉली, एक जेसीबी, दोन दुचाकी आणि वाळूसह तब्बल ७६ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

गोपनीय माहितीच्या आधारे डीवायएसपी पानेगावकर यांच्या नेतृत्वाखाली कुंटूर व नायगाव पोलिसांच्या संयुक्त पथकाने ३१ मे रोजी पहाटे सुमारे १.२० वाजता अंतरगाव शिवारातील गोदावरी नदीपात्रालगत छापा टाकला. यावेळी बोटीच्या सहाय्याने नदीपात्रातून अवैधरित्या वाळू उपसा सुरू असल्याचे आढळून आले.

कारवाईदरम्यान घटनास्थळी एक हायवा, दोन ट्रॅक्टर-ट्रॉली, एक जेसीबी, दोन दुचाकी तसेच सहा ब्रास वाळू असा मोठा मुद्देमाल सापडला. पोलिसांनी सर्व साहित्य जप्त करून पंचनामा केला. जेसीबी चालक घटनास्थळावरून पसार झाल्याने यंत्रणा पोलिस बंदोबस्तात ठेवण्यात आली आहे.

या प्रकरणी कुंटूर पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक १३१/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०३(२) व ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात हायवा चालक व मालक, ट्रॅक्टर चालक-मालक, जेसीबी मालक तसेच वाळू उपशात सहभागी असलेल्या दहा जणांविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे.

ही कारवाई नांदेडचे पोलिस अधीक्षक अभिजित कुमार (आयपीएस) व अपर पोलिस अधीक्षक सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत डीवायएसपी श्याम पानेगावकर, पोलिस निरीक्षक अरविंद घोडके, सहाय्यक पोलिस निरीक्षक मल्लीकार्जुन कारामुंगे, उपनिरीक्षक गजानन तोटेवाड यांच्यासह कुंटूर व नायगाव पोलिस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी सहभागी होते.

पोलिस अधीक्षकांनी कारवाई करणाऱ्या पथकाचे कौतुक केले असून, जिल्ह्यातील अवैध वाळू उपसा व वाहतुकीविरुद्ध यापुढेही कठोर मोहिम सुरू राहणार असल्याचा इशारा दिला आहे.

# सुरगाणा येथील जळीतग्रस्त ९ कुटुंबांना आर्थिक मदत

- वैदू समाज फाऊंडेशन, पत्रकार संघ व समर्थ गांवकरी समूहाचा मदतीचा हात!
- संघटनांची खरी ताकद सुख-दुःखात दिसते – डॉ. विश्वासराव आरोटे









सुरगाणा : (स. गांवकरी)

संघटना ही केवळ नावापुरती नसून प्रत्येकाच्या सुख-दुःखात खंबीरपणे उभी राहणारी असते, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी केले. सुरगाणा येथील जळीतग्रस्त ९ कुटुंबांना आर्थिक मदत व किराणा साहित्य वाटप कार्यक्रमात ते बोलत होते. नाशिक जिल्ह्यातील आदिवासीबहुल सुरगाणा परिसरात लागलेल्या आगीत काही कुटुंबांचे मोठे नुकसान झाले होते. या संकटग्रस्त कुटुंबांना पुन्हा उभे करण्यासाठी अखिल भारतीय वैदू समाज फाऊंडेशन, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ आणि दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने आर्थिक मदत व जीवनावश्यक किराणा साहित्य प्रदान करण्यात आले.

यावेळी डॉ. विश्वासराव आरोटे यांनी सांगितले की, प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या प्रगतीसाठी मेहनत घेत असते; मात्र अचानक आलेल्या संकटामुळे अनेकजण खचून जातात. अशा वेळी समाज आणि संघटनांनी दिलेला आधार हा जिवाला नवी उभारी देणारा ठरतो. वैदू समाज आणि मराठा समाजातील जळीतग्रस्तांना मदतीचा हात देण्याचा निर्णय हा प्रेरणादायी आणि कौतुकास्पद असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमात अखिल भारतीय वैदू समाज फाऊंडेशनचे मार्गदर्शक पोलीस निरीक्षक दशरथजी आटकर, अखिल भारतीय वैदू सामाजिक संघटनेचे प्रांतिक अध्यक्ष डॉ. स्वामी शिरकूल, पी.एस.आय. दवंगे, सुरगाणा नगराध्यक्ष भारत आप्पा वाघमारे आणि नगरसेवक सचिन आहेर उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. स्वामी शिरकूल यांनी सांगितले की, समाजावर दुःखद प्रसंग किंवा संकट आले तर संघटना संपूर्ण ताकदीने त्यांच्या पाठीशी उभी राहील. जळीतग्रस्त कुटुंबांना आर्थिक मदत व किराणा साहित्य देऊन त्यांना नव्याने उभारी देण्याचा संकल्प संघटनेने केला आहे.

कार्यक्रमात दैनिक समर्थ गांवकरीचे प्रतिनिधी अनिल पवार यांनी उपस्थित मान्यवरांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. तर आभार प्रदर्शन नगराध्यक्ष भारत आप्पा वाघमारे यांनी केले.

यावेळी शामलिंग शिंदे (प्रदेशाध्यक्ष, वैदू समाज), साहेबराव पवार, पै. अशोक जाधव, ताया लोखंडे, अनिल सुरेश पवार, बावड्या धनगर, रामनाथ धनगर, एकनाथ भोये, अर्जुन शिंदे, रवी शिंदे, भारत शिर्के, संजय शिर्के, अंबिका शिंदे, मेघा शिंदे, शैला पवार, ज्योती शिंदे, भारती शिंदे, रेणुका शिंदे, प्रमिला भोये, केशव देशमुख, भिका मेघा यांच्यासह वैदू समाजाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. विशेष म्हणजे, या कार्यक्रमादरम्यान परिसरातील एका गरजू तरुणाच्या किडनी उपचारासाठीही रोख आर्थिक मदत देण्यात आली. या सामाजिक उपक्रमामुळे जळीतग्रस्त आणि गरजू कुटुंबांना दिलासा मिळाला असून संघटनांच्या सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडले.

संघटना म्हणजे एक परिवार या परिवारातील प्रमुख संघटक हा मात्र सेवक म्हणून काम करत असतो सेवा करणे म्हणजे आपल्या आयुष्यातील पुण्याच्या प्रभाव असल्याचे मत डॉक्टर शिरकुल यांनी व्यक्त केले अभी तो एक टेलर है पिक्चर अभी बाकी है संघटनेला हिंदुस्थानातील एक महत्त्वाची सामाजिक दायित्व असलेली संघटना म्हणून ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न आहे कॉक्रोच पार्टीपेक्षा आमची पार्टी प्रथम क्रमांकाची राहील या समाजाला केंद्रात व राज्यात महत्त्वाचे मंत्रीपद द्यावे लागेल महामंडळ तयार करावे लागेल एक वचनी एक वाणी याप्रमाणे आम्ही काम करू माझा तरुण वर्गाला नेहमी सल्ला राहील व्यसनापासून बाजूला राहा सरस्वती लक्ष्मी या दोन्ही बहिणी असून या दोन्हींना आपल्या घरात स्थान द्या आईला वडिलांना पूजनीय माना संघटना तुमच्या केसाला धक्का लावल्यानंतर शांत बसणार नाही जो कोणी माझ्या समाजाला अडवा येईल त्याला मात्र तेथेच आडवा करण्याची आता तयारी माझ्याकडे आहे.

- डॉ. वैदु

## थोडक्यात पण महत्वाचे



### डी. एम. जाधव कृष्णुरकर सर यांचा सेवानिवृत्ती सोहळा उत्साहात संपन्न

नायगाव (स. गांवकरी) : शैक्षणिक क्षेत्रात दीर्घकाळ निष्ठेने व कर्तव्यभावनेने सेवा बजावणारे श्री संत बाळगीर महाराज हायस्कूल, कहाळा येथील डी. एम. जाधव सर कृष्णुरकर यांचा सेवापूर्ती कार्यगौरव सोहळा रविवारी (३१ मे) रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. विविध क्षेत्रातील मान्यवर, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात जाधव यांच्या शैक्षणिक व सामाजिक योगदानाचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मोहनराव पा. सुगावकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव माधवराव पा. वाळकीकर, सहसचिव श्रीहरी पा. उबाळे, नायगाव खरेदी-विक्री संघाचे चेअरमन श्रीनिवास पाटील चव्हाण, माजी प्राचार्य गो. श. मेथे, विलास पाटील मेथे, पप्पू पाटील, मनोज मोरे, पप्पू कोंढेकर, विठ्ठल पावडे, श्रीहरी देशमुख, पंढरीकमठेवाड गुरुजी, माधवराव शिंदे गुरुजी, परबत पाटील जाधव, प्रशांत नादरे (सरपंच), डांगे सर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### संध्याकाळपासुन ते पहाट पर्यंत मोठ्या प्रमाणात माती वाहतूक



शिवनेरी (स. गांवकरी) : जुन्नरच्या पश्चिम भागात संध्याकाळपासुन ते पहाट पर्यंत माती वाहतूक मोठ्या प्रमाणात सूरु आहे . याबाबत तहसील कार्यालयातून परवानगी घेतल्यानंतरच माती वाहतूक सुरू आहे अशी चर्चा नागरिकांमध्ये सुरु आहे .पश्चिम भागामध्ये दैनंदिन वाहतूक गर्दी दिवसा मोठ्या प्रमाणात असल्यामुळे संध्याकाळपासून ते पाहटे पर्यंत महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार माती वाहतूक जोरदार सुरू आहे . भाजीपाला , सर्व फळ उत्पादित , कांदा , बटाटा, लसूण , व कडधान्य यांची जशी बाजार समितीमध्ये सदर माहिती सर्व नागरिकांना समक्ष व प्रसार माध्यमातून वेळेवर मिळते . माती बाबत माहिती मिळावी अशी चर्चा नागरिकांमध्ये सातत्याने सुरू आहे . याबाबत तहसील कार्यालयातून काय निर्णय घेतात ? याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे . पहाटे वयोवृद्ध , ज्येष्ठ नागरिक, महिलावर्ग , तरुण वर्ग आरोग्य संतुलित राहण्यासाठी रस्त्याने जात असताना माती वाहतूक करणारे वाहन गाडीचा वेग जास्त असल्यामुळे नागरिकांना खूपच त्रास होतो . गाडीच्या वेग बाबत वाहन चालकांना तहसील कार्यालयातून समज देण्यात यावी . रात्रीच्या वेळेस माती वाहतूक करणारे वाहन यांच्या गाडीचा प्रकाश मुळे खूपच त्रास सहन करावा लागत आहे. महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार माती वाहतूक सुरु आहे पण नागरिकांना वाहन चालकाचा वेग , गाडीचा प्रकाश यामुळे खूपच त्रास होतो आहे . याबाबत तहसील कार्यालयातून काय निर्णय होतो , याकडे नागरिकांचे लक्ष लागलेले आहे .

## दत्तक घेतलेल्या नाशिकच्या समस्यांकडे दुर्लक्ष का?

### पेठ-सावळ घाटात आजही हजारो प्रवाशांचा जीवघेणा प्रवास!



नाशिक : (स. गांवकरी)

राज्याचे मुख्यमंत्री यांनी नाशिक शहर दत्तक घेतल्याची घोषणा करून विकासाची ग्वाही दिली असली, तरी प्रत्यक्षात नाशिक शहरासह ग्रामीण व आदिवासी भागातील नागरिक आजही मूलभूत समस्यांनी त्रस्त असल्याचे चित्र दिसून येत आहे. विशेषतः नाशिक-गुजरात या महत्त्वाच्या महामार्गावरील पेठ घाट व सावळ घाट परिसरातील रस्त्यांची दुरवस्था प्रवासी, विद्यार्थी, रुग्ण आणि स्थानिक नागरिकांसाठी गंभीर चिंतेचा विषय बनली आहे.

मागील अनेक वर्षांपासून या महामार्गाच्या काँक्रीटीकरणाचे काम सुरू आहे. मात्र घाट परिसरातील अरुंद रस्ता, मोठमोठे खड्डे आणि संथ गतीने सुरू असलेली कामे यामुळे दररोज वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. महाराष्ट्र आणि गुजरात या दोन राज्यांना जोडणाऱ्या या महत्त्वाच्या मार्गावर हजारो वाहने ये-जा करतात. मात्र रस्त्यांच्या खराब अवस्थेमुळे अनेक वाहने अडकून पडतात, तर वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे. या मार्गाचा वापर परिसरातील आदिवासी व ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षणासाठी करतात. वाहतूक कोंडीमुळे त्यांना तासन्तास घाटात अडकून राहावे लागते. तसेच दुर्गम भागात पुरेशा आरोग्य सुविधा नसल्याने गंभीर रुग्ण, गर्भवती महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना उपचारांसाठी नाशिककडे याच मार्गाने प्रवास करावा लागतो. रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे आणि वाहतूक कोंडीमुळे त्यांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत.

एकीकडे नाशिक शहरातही रस्ते, पाणीपुरवठा आणि आरोग्य सेवांच्या समस्या कायम आहेत. दुसरीकडे आगामी कुंभमेळ्याच्या पूर्वतयारीच्या नावाखाली शहरातील अनेक वृक्षांची मोठ्या प्रमाणावर छाटणी आणि तोड करण्यात आल्याची टीका पर्यावरणप्रेमींकडून होत आहे. शासन निसर्ग संवर्धनाच्या घोषणा करत असताना प्रत्यक्षात झाडांची संख्या कमी होत असल्याने पर्यावरणीय समतोल बिघडत असल्याची भावना नागरिक व्यक्त करीत आहेत.

पर्यावरणातील बदलांमुळे मागील काही वर्षांत अतिवृष्टी, गारपीट, उष्णतेच्या लाटा आणि हवामानातील अनियमितता वाढल्याचे दिसून येत आहे. याचा थेट परिणाम शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होत असून शेतकरी अधिक संकटात सापडत आहेत.

ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची समस्या देखील अद्याप कायम आहे. अनेक दुर्गम गावांमध्ये महिलांना आजही डोक्यावर हंडे घेऊन पाणी आणावे लागते. खराब रस्त्यांमुळे रुग्ण, गर्भवती महिला आणि विद्यार्थ्यांना रोजच्या जीवनात अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. नाशिक शहर दत्तक घेतल्यानंतरही नागरिकांच्या मूलभूत समस्या कायम असल्याने विकासाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. पेठ-सावळ घाटातील रस्त्यांचे काम, ग्रामीण भागातील पाणीपुरवठा, आरोग्य सुविधा आणि पर्यावरण संवर्धन यांसारख्या प्रश्नांवर शासनाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. "या समस्यांचा कायमस्वरूपी निवारण नेमका कधी होणार?" असा सवाल आता सर्वसामान्य नागरिक उपस्थित करीत आहेत.

## शासकीय अतिक्रमण व अडथळा निर्माण करणाऱ्यावर कारवाई



शिवनेरी : (स. गांवकरी)

शिव पानंद रस्ता , गाडी रस्ता, शेत रस्ता, पायी रस्ता मोकळा होण्यासाठी गरजेचे आहे. याबाबत शासकीय अतिक्रमण व अडथळा निर्माण करणाऱ्यावर कारवाई करणार . असे तहसीलदार बाळासाहेब शिरसाट यांनी उपोषणकर्ते शेत पानंद रस्ते चळवळ समिती / शेतकरी बांधव / व शेतकरी संघटना जुन्नर तालुका यांना सांगितले. शेत पानंद रस्ते चळवळ समिती , शेतकरी बांधव व शेतकरी संघटना जुन्नर तालुका यांनी गुरुवार दि. २८ मे पासुन तहसील कार्यालय जुन्नरच्या बाहेर भर उन्हाळ्यात उपोषणाचा आजचा दुसरा दिवस आहे . तहसीलदार व जुन्नर पोलीस स्टेशन यांनी उपोषणकर्त्यांच्या मागण्या समजुन घेतले आहेत . तालुक्यातील सर्व शेत रस्ते मोकळे व्हावे यासाठी निवेदन देऊन उपोषण सुरू केले आहे.

उपोषणासाठी काशिनाथ कारभारी काकडे , तालुका अध्यक्ष संजय भुजबळ , सह्याद्री शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रमेश शिंदे , राजू शेट्टी , तालुका अध्यक्ष प्रमोद खांडगे , गणेश गडगे , साईनाथ काकडे , काशिनाथ आवटे , निवृत्ती डोंगरे , युवराज कानस्कर , सुभाष ढोले , रवींद्र तांबोळी , रामचंद्र शिंदे , राजेश काकडे , राजाराम वाजगे , निवृत्ती बोर्हाडे , तालुक्यातील शेतकरी बांधव उपस्थित होते. जुन्नर तालुका शेतकरी संघटना यांनी शासन दरबारी शेत रस्ते मोकळे होत नाही यासाठी उपोषणाचा मार्ग अवलंब.

## मंत्रीपदाचा दावा असूनही डावलले; आमदार संग्राम जगतापांवर अन्याय



### मामाच्या हट्टाला राष्ट्रवादीत बळी

अहिल्यानगर: (स. गांवकरी)

अहिल्यानगर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विधानपरिषद निवडणुकीची घोषणा होताच जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापू लागले आहे. या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेचे माजी उपमहापौर गणेश भोसले यांनी महत्त्वपूर्ण भूमिका मांडत माजी आमदार स्वर्गीय अरुणकाका जगताप हे स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक मध्ये दोनदा अपक्ष निवडून आले होते त्यांना व आमदार संग्राम जगताप यांना निवडणूक करण्यासंदर्भाची चांगली हातोटी आहे सर्वांबरोबर चांगले संबंध असून त्यांच्या कुटुंबीयांचा या जागेवर पहिला हक्क असल्याचे स्पष्ट केले. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाने नगरची जागा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे घेऊन आयुर्वेद शिक्षण मंडळाचे अध्यक्ष सचिन जगताप यांना उमेदवारी देण्यात यावी, अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नगरसेवक या निवडणुकीत मतदानासंदर्भात वेगळा विचार करतील, असा इशाराही त्यांनी दिला. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे हे आपल्या मुलाच्या उमेदवारीसाठी झटत आहे पक्षातील नेते आपल्या मतदारसंघा पुरतेच मर्यादित राहिले तर पक्षाची अवस्था राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटासारखी होईल होईल गणेश भोसले पुढे म्हणाले की, स्वर्गीय अरुणकाका जगताप हे दोन वेळा स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून विधानपरिषदेवर निवडून गेले होते. त्यांनी जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची मजबूत संघटना उभी केली. त्यामुळे या निवडणुकीत त्यांच्या कुटुंबीयांचा नैतिक आणि राजकीय हक्क सर्वप्रथम विचारात घेतला गेला पाहिजे. सचिन जगताप यांना उमेदवारी देऊन त्यांच्या कुटुंबाच्या योगदानाचा सन्मान करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली. यावेळी त्यांनी राज्य सरकारच्या मागील महाविकास आघाडी सरकारमधील मंत्रीपदाच्या वाटपावरही भाष्य केले. ते म्हणाले की, त्या काळात आमदार संग्राम जगताप यांचा मंत्रीपदावर ठोस दावा असतानाही त्यांना डावलण्यात आले. त्याऐवजी पहिल्यांदाच निवडून आलेल्या प्राजक्त तनपुरे यांना मंत्रीपद देण्यात आले. आज ते कोणत्या राजकीय पक्षात आहेत, हे संपूर्ण राज्य पाहत आहे. त्या निर्णयाचे परिणाम आज स्पष्टपणे दिसत असून, निष्ठावंतांना डावलल्यामुळेच पक्षाची काय अवस्था झाली हे आपण पाहत आहोत अशी 'टीका त्यांनी केली.

भोसले पुढे म्हणाले की, अहिल्यानगर शहरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची पाळेमुळे रुजविण्याचे आणि त्याचा वटवृक्ष करण्याचे मोठे काम आमदार संग्राम जगताप यांनी केले आहे. तरुणांमध्ये प्रचंड लोकप्रियता असलेले, संघर्षशील आणि तडफदार नेतृत्व म्हणून त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. स्वर्गीय अजितदादा पवार यांचाही त्यांना मंत्री करण्यासाठी प्रबळ आग्रह होता. मात्र, एका मामाच्या हट्टापायी शेवटच्या टप्प्यात त्यांना डावलण्यात आले आणि कारखानदारीला प्राधान्य देण्याचा निर्णय शरद पवार गटातील नेतृत्वाने घेतला. त्यांनी आरोप केला की, जनाधार, संघर्ष आणि कार्यकर्त्यांची ताकद एका बाजूला ठेवून वारसाहक्काच्या राजकारणाला महत्त्व देण्यात आले. कार्यकर्त्यांच्या भावना आणि जनतेचा कौल दुर्लक्षित करून एका "भाच्याला" पुढे केले गेले. आज तोच भाचा सत्तेच्या लोभासाठी भाजपमध्ये जात असल्याचे चित्र दिसत आहे. ज्यांच्या आशीर्वादाने राजकीय उंची मिळाली, त्यांच्याच राजकीय भूमिकेला छेद देण्याचे काम सुरू असल्याची टीकाही त्यांनी केली. मंत्रीपद मिळाल्यानंतर मतदारसंघ, पक्ष संघटना आणि कार्यकर्त्यांसाठी नेमके काय योगदान दिले गेले, याचे उत्तर आजही अनेकांना मिळालेले नाही. सत्तेच्या समीकरणांसाठी पक्ष बदलण्याची वेळ येणे ही दुर्दैवी बाब असून, शरद पवार गटाने कर्तृत्वापेक्षा घराणेशाहीला दिलेले प्राधान्य, निष्ठावंत कार्यकर्त्यांवर झालेला अन्याय आणि जनाधार असलेल्या नेतृत्वाकडे केलेले दुर्लक्ष यामुळेच त्या पक्षाची आजची अवस्था निर्माण झाली असल्याचा दावा त्यांनी केला.

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
समर्थ गांवकरी



# दोषी अधिकाऱ्यांकडून निधी वसूल करा – गोपाळदादा तिवारी

पुणे : (स. गांवकरी)



मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील सुमारे ८१ लाख लाभार्थी अपात्र ठरल्यानंतर त्यांच्या नावांची यादीतून वगळणी करण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी राज्य सरकार आणि प्रशासनावर जोरदार टीका केली आहे. अपात्र लाभार्थ्यांना कोट्यवधी रुपयांचा सरकारी निधी वितरित झाल्याबद्दल संबंधित सचिव आणि अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करून राज्याच्या तिजोरीचे झालेले नुकसान त्यांच्याकडून वसूल करण्याची मागणी त्यांनी केली आहे.


प्रसिद्धीपत्रकाद्वारे तिवारी यांनी म्हटले आहे की, विधानसभा निवडणुकीपूर्वी जाहीर करण्यात आलेल्या लाडकी बहीण योजनेअंतर्गत अर्ज करणाऱ्या महिलांना दरमहा १,५०० रुपयांचे अनुदान मंजूर करून वितरित करण्यात आले. मात्र आता तब्बल ८१ लाख लाभार्थी अपात्र ठरत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे लाभार्थी पात्रता तपासण्याची जबाबदारी असलेल्या महिला व बालविकास विभाग, अर्थ विभाग आणि संबंधित प्रशासकीय यंत्रणांनी सुरुवातीपासूनच आवश्यक पडताळणी का केली नाही, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. तिवारी म्हणाले की, अपात्र लाभार्थ्यांची वगळणी झाल्यामुळे दरमहा सुमारे १,२०० कोटी रुपयांची बचत होणार असल्याचे सांगितले जात आहे. यावरून आतापर्यंत राज्याच्या तिजोरीवर अंदाजे १८ हजार कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार का टाकण्यात आला, याची जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे. यासाठी संबंधित सनदी अधिकारी, सचिव आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. यासोबतच काही लाभार्थी वयोमर्यादेबाहेर असून काही सरकारी कर्मचारीदेखील योजनेचा लाभ घेत असल्याचे प्रशासनाने नंतर उघड केले. जर हे निकष मतदानानंतर लक्षात येत असतील, तर ही बाब प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी असल्याचे तिवारी यांनी नमूद केले. काँग्रेसने या प्रकरणाला केवळ आर्थिक गैरव्यवस्थेचा मुद्दा न मानता लोकशाही प्रक्रियेशी संबंधित गंभीर बाब असल्याचे म्हटले आहे. अपात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याच्या निर्णयामुळे राज्याच्या आर्थिक हिताला धक्का बसल्याचा आरोप करताना, अशा धोरणात्मक त्रुटींमुळे राज्यात चुकीचे सरकार निवडले जाण्यास मदत झाल्याची खंतही तिवारी यांनी व्यक्त केली. तसेच, महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिव, राज्यपाल आणि आवश्यक असल्यास उच्च न्यायालयाने या संपूर्ण प्रकरणाची गंभीर दखल घेऊन चौकशी करावी, अशी मागणी काँग्रेसने केली आहे.



ठाणे : दिवा परिसर हरित, सुंदर आणि प्रदूषणमुक्त करण्याच्या उद्देशाने वंचित बहुजन आघाडी, ठाणे शहर (दिवा) यांच्या वतीने दिवा प्रभाग समितीचे सहायक आयुक्त शिवप्रसाद नागरगोजे यांना निवेदन देण्यात आले. वंचित बहुजन आघाडीचे कल्याण ग्रामीणचे विकास इंगळे यांनी ठाणे महापालिका प्रशासनाकडे दिवा शहर परिसरात किमान १००० वृक्षांची लागवड व संवर्धन मोहीम राबविण्याची मागणी करण्यात आली.

## थोडक्यात बातम्या...

### इंदोरीच्या मुख्याध्यापकपदी सौ. सविता बाळासाहेब मेहेत्रे यांची नियुक्ती



अकोले (स. गांवकरी) : अकोले तालुक्यातील प्रवरा विद्यालय, इंदोरी च्या मुख्याध्यापकपदी सौ. सविता बाळासाहेब मेहेत्रे यांची नियुक्ती झाली आहे. सौ सविता मेहेत्रे या १९९७ पासून अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या विद्यालयामध्ये कार्यरत आहे. यापूर्वी त्यांनी करंजी, इंदोरी, निमगाव पागा व समशेरपूर येथील माध्यमिक विद्यालयांमध्ये शिक्षक म्हणून काम केलेले आहे. त्यांची आता इंदोरीच्या माध्यमिक विद्यालयात मुख्याध्यापक म्हणून नियुक्ती झाली आहे. संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ.विवेक भापकर, सचिव अँड विश्वासराव आठरे, सहसेक्रेटरी मुकेश मूळे, खजिनदार अँड दीपलक्ष्मी म्हसे, विश्वस्त नंदकुमार झावरे, जी.डी. खानदेशे, जयंत वाघ, दिपक दरे, डॉ सी. के. मोरे, जि.प.च्या अर्थ व बांधकाम समितीचे माजी सभापती कैलासराव वाकचौरे, अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे कार्यकारिणी सदस्य शरद देशमुख, अकोलेचे नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे, अगस्ती कारखान्याचे माजी संचालक बाळासाहेब ताजणे, वसंत बाळसराफ, अशोक गायकवाड, सोमनाथ बाळसराफ, इंदोरीच्या सरपंच सौ मनिषा ठोंबाडे, रुंभोडीचे सरपंच रविंद्र मालुंजकर, विविध संस्थांचे पदाधिकारी व आदींनी अभिनंदन केले आहे.

### राष्ट्रीय बेसबॉल स्पर्धेत भोकरच्या दोन कन्यांची सुवर्ण कामगिरी



भोकर (स. गांवकरी) : ओडिशातील भुवनेश्वर येथे दि. 24 ते 29 मे 2026 दरम्यान पार पडलेल्या 31 व्या सब-ज्युनिअर राष्ट्रीय बेसबॉल क्रीडा स्पर्धेत भोकरच्या दोन खेळाडूंनी महाराष्ट्राचे नाव देशपातळीवर उज्वल केले आहे. टार्गेट स्पोर्ट्स अकॅडमी, भोकर येथील कु. नेहा मोहनाजी ताटेवाड आणि कु. श्वेता शिवाजी जाधव यांनी महाराष्ट्र संघाकडून दमदार खेळाचे प्रदर्शन करत संघाला सुवर्णपदक मिळवून देण्यात मोलाची भूमिका बजावली. बेसबॉल फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राच्या मुलींच्या संघाने देशभरातील बलाढ्य संघांना मागे टाकत प्रथम क्रमांक पटकावला. विशेष म्हणजे भोकर तालुक्यातील नेहा ताटेवाड व श्वेता जाधव यांनी उत्कृष्ट नेतृत्व, संघभावना आणि कौशल्यपूर्ण खेळाच्या जोरावर महाराष्ट्र संघाला विजेतेपद मिळवून दिल्याने संपूर्ण महाराष्ट्रात त्यांचे कौतुक होत आहे. भुवनेश्वर येथील किट्स युनिव्हर्सिटी मैदानावर महाराष्ट्र संघाच्या विजयाचा जल्लोष पाहायला मिळाला. सुवर्णपदक जिंकल्यानंतर खेळाडूंसह प्रशिक्षक आणि क्रीडाप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. ग्रामीण भागातील खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर चमकदार यश मिळवल्याने भोकर तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. या दोन्ही खेळाडूंच्या यशामागे मुख्य प्रशिक्षक बालाजी एल. गाडेकर यांचे अथक परिश्रम आणि सातत्यपूर्ण मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. मंजुळानगर मैदानावरील टार्गेट स्पोर्ट्स अकॅडमी येथे वर्षानुवर्षे कठोर सराव, विविध स्पर्धांतील सहभाग आणि शिस्तबद्ध प्रशिक्षणाच्या बळावर या खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरापर्यंत मजल मारली. महाराष्ट्र संघात निवड झाल्यानंतर त्यांनी राज्याचे प्रतिनिधित्व करत सुवर्णपदकाची कमाई करून दिली.

### सौर ऊर्जा हा भविष्यातील उत्तम पर्याय

राजगुरुनगर (स. गांवकरी) : विजेचे वाढते दर ,आणि वाढता वापर लक्षात घेता भविष्यात सौर ऊर्जा हा उत्तम आणि पर्यावरणपूरक पर्याय ठरू शकतो .त्यामुळे पारंपरिक ऊर्जा स्त्रोतांवर विसंबून न राहता केंद्र व राज्य शासनाच्यावतीने विविध सौर योजना आणल्या असून .या योजनांमुळे घरगुती, व्यावसायिक तसेच कृषी क्षेत्रात सौर ऊर्जेचा वापर मोठ्या प्रमाणात होऊन त्याचा लाभ होण्यास मदत होणार आहे. राजगुरुनगर महावितरण विभागाच्या सहकाऱ्याने खेड तालुक्याच्या विविध भागात कार्यान्वित होत असलेल्या सौर पॅनलद्वारे २५ मेगावॅट वीज उत्पादन होणार असून नुकतेच तालुक्याच्या पांगरी येथे २५ एकर क्षेत्रावर उभारण्यात आलेला पाच मेगावॅट क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला.या प्रकल्पाचा लोकार्पण उपकार्यकारी अभियंता उत्तम मंचरे आणि राजगुरुनगर शहर अभियंता प्रमोद जाधव यांच्या उपस्थितीत झाले. पांगरी प्रकल्पातून निर्माण होणारी वीज ११ केव्ही वाहिनीद्वारे चांडोली येथील ३३ केव्ही सबस्टेशनमध्ये जोडण्यात येणार असून या अतिरिक्त ५ मेगावॅट विजेमुळे राजगुरुनगर शहरास अधिक सक्षम आणि अखंडित वीजपुरवठा मिळण्यास मदत होणार आहे. सूर्यप्रकाशापासून वीज निर्मिती केली जाते. या पद्धतीमुळे वीजबिलात मोठी बचत होत असून प्रदूषणमुक्त ऊर्जा उपलब्ध होते. विशेषतः ग्रामीण भागात शेतकरी सौर पंपांचा वापर करून सिंचनासाठी लागणारी वीज सहज उपलब्ध करून घेत आहेत. सौर ऊर्जा ही अक्षय ऊर्जा असल्याने भविष्यातील ऊर्जा गरजा पूर्ण करण्यासाठी ती अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. घरांच्या छतांवर बसविण्यात येणाऱ्या सौर प्रकल्पांमुळे अतिरिक्त वीज निर्मिती करून ती वीज वितरण कंपनीला देण्याची सुविधाही उपलब्ध आहे. पर्यावरण संवर्धन, आर्थिक बचत आणि ऊर्जेचे स्वावलंबन या तिन्ही बाबी साध्य होत असल्याने नागरिकांनी सौर ऊर्जेचा स्वीकार करावा, असे आवाहन करण्यात येत असून,शासनाच्या अनुदान योजनांचा लाभ घेऊन अधिकाधिक नागरिकांनी सौर ऊर्जा प्रकल्प उभारावेत, असेही आवाहन करण्यात आले आहे. तालुक्याच्या टेकवडे गावात शंभर टक्के तर पाईट , पांगरी, ,कडूस,(शेंडेवाडी )कोरेगाव, कनेरसर, येथे सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित होत असून येत्या महिन्याभरात पूर्णतः प्रकल्प चालू होऊन वीज पुरवठा अधिक सक्षम होईल.

# विद्यार्थ्यांच्या यशाचा ग्रामपंचायतीकडून गौरव

कळवण, नाशिक : (स. गांवकरी)

- शिरसमणीत दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा प्रेरणादायी सत्कार समारंभ संपन्न



गावाच्या प्रगतीचा खरा पाया हा शिक्षणात असतो आणि विद्यार्थ्यांच्या यशामध्येच गावाचे उज्वल भविष्य दडलेले असते, कळवण तालुक्यातील शिरसमणी ग्रामपंचायतीच्या वतीने इयत्ता दहावी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. दिनांक २८ मे रोजी सायंकाळी ४ वाजता ग्रामपंचायत कार्यालयात आयोजित या कार्यक्रमाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमाला ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी, ग्रामसेवक, महिला वर्ग, ज्येष्ठ नागरिक, पालक आणि गावातील तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. विद्यार्थ्यांच्या यशाचा आनंद गावकऱ्यांनी सामूहिकरित्या साजरा करत त्यांना भावी आयुष्यासाठी प्रेरणादायी शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की, "आजच्या स्पर्धेच्या युगात शिक्षण हाच यशाचा राजमार्ग आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी मेहनत, सातत्य आणि जिद्दीच्या जोरावर कोणतेही शिखर गाठू शकतात. गावातील विद्यार्थ्यांनी केवळ गुण मिळवण्यापुरते न थांबता शासकीय सेवेत, प्रशासनात, पोलीस, सैन्य, वैद्यकीय, अभियांत्रिकी अशा विविध क्षेत्रात यश मिळवून आपल्या गावाचे नाव उज्वल करावे."

यावेळी विद्यार्थ्यांचा पाण्याची बॉटल आणि पेन देऊन गौरव करण्यात आला. हा सन्मान विद्यार्थ्यांसाठी केवळ भेटवस्तू नसून, "ज्ञानाच्या प्रवासात पुढे जात राहा" असा ग्रामस्थांचा आशीर्वाद असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली. गावातील नागरिकांनी व्यक्त केले की, विद्यार्थ्यांचा सन्मान ही केवळ परंपरा नसून पुढील पिढीला शिक्षणासाठी प्रोत्साहन देणारी प्रेरणा आहे.

मोबाईल आणि सोशल मीडियाच्या आकर्षणाच्या काळात विद्यार्थ्यांनी अभ्यासाला प्राधान्य देत मिळवलेले यश इतरांसाठी आदर्श ठरणारे आहे.

# विकास चव्हाण यांची अशासकीय सदस्यपदी निवड

आळेफाटा : (स. गांवकरी)



पारगाव तर्फे आळे येथील वसंतराव नाईक कृषीनिष्ठ पुरस्कार विजेते प्रगतशील युवा शेतकरी तसेच विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे तज्ञ संचालक श्री. विकास हरिभाऊ चव्हाण यांची जुन्नर तालुका कृषी विभागाच्या आत्मा (कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा) अंतर्गत तालुकास्तरीय शेतकरी सल्लागार समिती (BFAC) तसेच पुणे जिल्हा स्तरावरील शेतकरी सल्लागार समिती (DFAC) मध्ये अशासकीय सदस्य म्हणून निवड जाहीर करण्यात आली आहे. जिल्हा व तालुका स्तरावरील समित्यांवर एकाच वेळी त्यांची निवड झाली असून, जिल्हा स्तरावर निवड झालेले ते जुन्नर तालुक्यातील एकमेव सदस्य आहेत. ही निवड पुणे जिल्हा आत्मा नियामक मंडळाचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी श्री. जितेंद्र डूडी यांच्या मान्यतेने करण्यात आली आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवणे, आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा प्रसार करणे तसेच शासकीय योजना तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे ही महत्त्वाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल परिसरात व शेतकरी वर्गातून आजुबाजुच्या गावातील ग्रामस्थ कडुन कौतुक करण्यात आले आहे

# भरडधान्य खरेदी प्रक्रिया नियमित सुरू ठेवण्याची मागणी



किनवट : (स. गांवकरी)

ऑनलाईन नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांच्या क्रमवारी यादीप्रमाणे भरडधान्य (ज्वारी व मका) खरेदी प्रक्रिया नियमितपणे सुरू ठेवावी तसेच शेतकऱ्यांच्या धान्य खरेदी प्रक्रियेत अडथळा निर्माण करून व्यापारीधार्जिण्या प्रवृत्तीला चालना देणाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यात यावी, अशी मागणी भारतीय जनता पार्टी किसान मोर्चा नांदेड उत्तरचे जिल्हा चिटणीस उध्दव मारोती मुंडे यांनी तहसीलदार किनवट यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. तहसीलदार किनवट यांना दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, शासनाने १ मे ते ३० जून २०२६ हा भरडधान्य खरेदीचा कालावधी निश्चित केला असून ऑनलाईन नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांची क्रमवारी यादी तयार करण्यात आली आहे. त्यानुसार संबंधित शेतकऱ्यांना संदेश पाठवून नियमित खरेदी प्रक्रिया सुरू ठेवणे आवश्यक आहे. विहित मुदतीत सर्व नोंदणीकृत शेतकऱ्यांचे धान्य खरेदी करून त्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. इस्लापूर येथे सुरू असलेली खरेदी प्रक्रिया सुरळीत सुरू असताना व्यापाऱ्यांच्या नावाचा गैरसमज पसरवून खरेदी प्रक्रियेत अडथळा आणण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. खरीप हंगामाच्या पेरणीचे दिवस जवळ आल्यामुळे लहान शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागू शकतो.

# प्रवाशांच्या सेवेसाठी एसटी सदैव तत्पर – अशोक चव्हाण

किनवट : (स. गांवकरी)




प्रवाशांनी दूरच्या प्रवासासाठी दुचाकी अथवा इतर खासगी वाहनांचा वापर करण्यापेक्षा सुरक्षित, किफायतशीर आणि विश्वासार्ह असलेल्या एसटी बसने प्रवास करावा. प्रवाशांच्या सेवेसाठी एसटी महामंडळ सदैव तत्पर असून प्रवाशांना अधिक चांगल्या सुविधा देण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असल्याचे प्रतिपादन किनवट आगाराचे आगार प्रमुख अशोक चव्हाण यांनी केले. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त किनवट आगारात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती राहुल नाईक, नगरसेविका अश्विनी जागरलावार, मराठी पत्रकार संघटनेचे अध्यक्ष प्रमोद पहुरकर, पत्रकार मुकुंद नेम्मानीवार, नगरसेविका प्रतिनिधी प्रभू कोल्हे, कार्यशाळा अधीक्षक वाय.एच. खिल्लारे तसेच ज्येष्ठ प्रवासी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला बसस्थानक परिसरात महिला प्रवासी व ज्येष्ठ प्रवाशांचा पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी एसटीच्या समाजोपयोगी कार्याचा गौरव करत महामंडळाच्या सेवेला शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलताना कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती राहुल नाईक यांनी प्रवाशांच्या सोयीसाठी विविध उपाययोजना राबविण्याची गरज व्यक्त केली. ग्रामीण भागातील प्रवाशांना अधिक चांगली वाहतूक सेवा उपलब्ध व्हावी, यासाठी आगार प्रशासनाने विशेष लक्ष द्यावे, असे त्यांनी सांगितले. मराठी पत्रकार संघटनेचे अध्यक्ष प्रमोद पहुरकर यांनी किनवट आगारातून लांब पल्ल्यांच्या बससेवा सुरू करण्याची मागणी केली. त्यामुळे प्रवाशांची मोठी सोय होईल, असे त्यांनी नमूद केले. नगरसेविका अश्विनी जागरलावार यांनी आपल्या मनोगतात सर्व प्रवाशांना व एसटी कर्मचाऱ्यांना वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या. एसटी कर्मचारी कोंडे यांनी प्रवाशांना एसटी बस व बसस्थानक परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले. तसेच किनवट आगाराने नांदेड विभागातून प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल आगार प्रमुख अशोक चव्हाण यांचे उपस्थित मान्यवरांनी अभिनंदन केले. कार्यक्रमात सलग पंधरा वर्षे अपघातमुक्त सुरक्षित सेवा देणाऱ्या ३१ चालकांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. त्यांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले. या उपक्रमामुळे चालक व कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमास पत्रकार प्रशांत वाठोरे, राज माहुरकर, मलिक चव्हाण, लक्ष्मीकांत मुंडे, शुभम शिंदे, विजय जोशी, संतोष सिसले, वाहतूक अधीक्षक शिलरत्न ढगे, वाहतूक निरीक्षक साईनाथ मुंडे, गंगय्या सटलावार, शंकर ताडेवार, गजेंद्र दासरवार तसेच एसटीचे चालक, वाहक, प्रशासकीय व यांत्रिक कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन संतोष अनंतवार यांनी केले. शेवटी केक कापून व पेढे वाटप करून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

# स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी राजेंद्र राऊत यांचा अर्ज दाखल

सोलापूर : (स. गांवकरी)





सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी बार्शीचे माजी आमदार राजाभाऊ राऊत यांचा उमेदवारी अर्ज आय मोठ्या जल्लोषात दाखल करण्यात आला. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यासह महायुतीतील सर्व आमदारांची आणि नेत्यांची उपस्थिती होती. यावेळी अनेक नेते मंडळींनी देवाभाऊनी शब्द पाळल्याची चर्चा करत असल्याचे दिसून आले. सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विधान परिषदे निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टीने अखेर राजाभाऊ राऊत यांना उमेदवारी दिली आहे . भाजपाच्या केंद्रीय कार्यालयाकडून सोलापूर साठी राजेंद्र राऊत यांचे नाव घोषित करण्यात आले आहे. त्यामुळे प्रशांत परिचारक यांना डावलण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भगवंत महोत्सवादम्यान बार्शीकरांना दिलेला शब्द पाळल्याची चर्चा सोलापूर जिल्ह्यात सर्वत्र सुरू आहे.आहे.

या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विधान परिषदेसाठी प्रशांत परिचारक की राजाभाऊ राऊत या दोन्हीपैकी कोण? असा प्रश्न उपस्थित झाला होता. मात्र यामध्ये राजाभाऊ राऊत यांनी बाजी मारली आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या नेतृत्वाखाली ही निवडणूक होत आहे. नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीमध्ये राजेंद्र राऊत यांनी सहा जिल्हा परिषद आणि १२ पंचायत समितीच्या निवडणुकीमध्ये सगळ्याच्या सगळे भारतीय जनता पार्टीचे उमेदवार निवडून आणले होते. तसेच बार्शी नगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपचा झेंडा फडकला होता. त्यामुळे त्यांना पक्षाने बक्षीस म्हणून विधान परिषदेचे उमेदवारी दिली आहे. सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्था विधानपरिषद निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टी शिवसेना राष्ट्रवादी कॉंग्रेस महायुती तर्फे आज बार्शीचे माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी आपला उमेदवारी अर्ज जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्याकडे दाखल केला. सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीसाठी भाजपचे उमेदवार श्री. राजेंद्र राऊत यांनी आज पालकमंत्री जयकुमार गोरे, खासदार ज्योतीताई वाघमारे, आमदार विजय देशमुख आणि आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी भाजपचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. कार्यकर्त्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे परिसर भाजपमय झाला असून, आगामी निवडणुकीतील विजयाचा निर्धार अधिक दृढ झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. विकास, संघटनशक्ती आणि जनतेचा विश्वास यांच्या बळावर भाजपचा विजय निश्चित करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, शिवसेना खासदार ज्योती वाघमारे, आमदार विजयकुमार देशमुख, आमदार संजय शिंदे, आमदार बाळराजे देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल केला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अॅड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

आंतरभारती रुरल इंटरनॅशनल मेडिकल एज्युकेशन ट्रस्ट संचलित,

# आनंदगड शैक्षणिक संकुल

आनंदगड, वीरगाव ता. अकोले, जि. अहिल्यानगर



२५ रौप्यमहोत्सवी वर्ष
वर्ष १९९९-२०२४

पाल्याच्या उज्वल भविष्यासाठी आनंदगड शैक्षणिक संकुल येथे स्वप्न प्रत्यक्षात साकारले जातात!

(D.T.E., MSBTE, DBAT University P.C.I. Approved)

DTE Code 5480

## मातोश्री राधा कॉलेज ऑफ फार्मसी

| | डी फार्मसी | बी फार्मसी |
| --- | --- | --- |
| पात्रता | १२ वी पास (PCB / PCM) | १२ वी पास (PCB / PCM & CET) |
| कालावधी | २ वर्ष | ४ वर्ष |
| प्र.क्षमता | ६० विद्यार्थी | ६० विद्यार्थी |

विद्यार्थ्यांसाठी बस सुविधा उपलब्ध!

- संपर्क -
7709203202
9421190696 I 9689758321

ग्रामीण महाराष्ट्रातील ISO मानांकित शाळा

## धर्मवीर आनंद दिघे इंग्लिश मिडिअम स्कुल अ‍ॅण्ड ज्युनिअर कॉलेज

के जी ते १२ वी विज्ञान शाखा
(इंग्रजी माध्यम)

अत्यल्प फी सर्वोत्कृष्ठ शिक्षण



आपल्या पाल्याच्या शालेय प्रवेशासाठी संस्कारक्षम इंग्रजी माध्यमाची प्रयोगशील शाळा

- संपर्क -
9158077688
7875074070 I 9975276670

## आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज

पत्ता: आनंदगड शैक्षणिक संकुल, आनंदगड, वीरगांव, ता. अकोले, जि. अहिल्यानगर
DTE, Govt of Maharashtra M.S.B.T.E., Mumbai AICTE, New Delhi Approved

DTE Code 05662

- सिव्हिल इंजिनिअरिंग 60
- मॅकेनिकल इंजिनिअरिंग 60
- कॉम्प्युटर इंजिनिअरिंग 60
- इलेक्ट्रिकल अ‍ॅण्ड इलेक्ट्रॉनिक्स 60
- आर्टिफिशीअल इंटेलिजीअंस अ‍ॅण्ड मशीन लर्निंग 60

- संपर्क -
9209645837 I 9922545516
9765431168 I 7028724045 I 9922161686



महाराष्ट्र शासन वैद्यकिय शिक्षण व
औषधी द्रव्य विभाग महाराष्ट्र कौन्सिल ऑफ अ‍ॅक्युपंक्चर,मुंबई
- मान्यता प्राप्त वैद्यकीय अभ्यासक्रम -

Anandgad Virgaon

## मातोश्री गंगुबाई शिंदे अ‍ॅक्यूपंक्चर कॉलेज अ‍ॅण्ड हॉस्पिटल

डिप्लोमा इन अ‍ॅक्युपंक्चर थेरपी (DAT)

| | |
| --- | --- |
| प्रवेश क्षमता | ५० विद्यार्थी |
| डिप्लोमा कालावधी | २ वर्षे |
| शैक्षणिक पात्रता | इ. १२ वी पास |

सुविधा
- सर्व सुविधायुक्त भव्य कॉलेज व हॉस्पिटल इमारत
- तज्ञ व अनुभवी प्राध्यापक व अ‍ॅक्युपंक्चरिस्ट
- अ‍ॅक्युपंक्चर उपचार पद्धती सुविधा
- वसतिगृह सुविधा उपलब्ध

- संपर्क -
9011271729
9834719663 I 7028724045

॥ सुजाता ॥ अकोले 9970095289

## थोडक्यात पण महत्वाचे



### करमाळ्यात भिंत कोसळून वृद्ध दांपत्य झाले जागीच ठार

सोलापूर (स. गांवकरी) : सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यातील केतूर जवळील उजनी लाभक्षेत्रातील पोमलवाडी येथे रविवारी (ता. ३१) रात्री झालेल्या जोरदार वादळी वाऱ्यामुळे अत्यंत दुर्दैवी घटना घडली. वस्तीवरील घराची भिंत अंगावर कोसळून वृद्ध दांपत्याचा जागीच मृत्यू झाला आहे. मृतांची नावे जगन्नाथ मारुती नवले (वय ८०) आणि शालन जगन्नाथ नवले (वय ७५) अशी आहेत. हे दांपत्य उजनी जलाशयाजवळील आपल्या वस्तीवर राहत होते. रविवारी रात्री सुमारे ९ ते ९.३० वाजण्याच्या दरम्यान ते जेवणासाठी बसले असताना अचानक आलेल्या वादळी वाऱ्यामुळे सिमेंट विटा एकावर एक रचून तयार केलेली भिंत त्यांच्या अंगावर कोसळली. या दुर्घटनेत दोघांचाही जागीच मृत्यू झाला. घटनास्थळी आसपास कोणतीही वस्ती नसल्याने रात्री ही घटना कोणाच्या निदर्शनास आली नाही. दरम्यान, करमाळा येथे असलेल्या त्यांच्या नातवाने रात्री फोन केला असता प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे तो सोमवारी सकाळी वस्तीवर आला असता तहा धक्कादायक प्रकार उघडकीस आला.

### प्रेमसंबंधांचे फोटो व्हायरल करण्याची धमकी ; दोन जणांविरूध्द गुन्हा दाखल

अहिल्यानगर (स. गांवकरी) : प्रेमसंबंधातील कथित फोटो सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देत २० हजार रूपयांची खंडणी मागितल्याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दोन जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी निंबळक (ता. अहिल्यानगर) येथील २७ वर्षीय तरूणाने शनिवारी (३० मे) रात्री फिर्याद दिली आहे. विकास शिंदे ऊर्फ शनीबाबा व बल्या (पूर्ण नाव, पत्ता माहिती नाही) यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरचा प्रकार शुक्रवारी (२९ मे) दुपारी दोनच्या सुमारास एमआयडीसीतील एका कंपनीमध्ये घडला असल्याचे फिर्यादीत नमूद आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी दुपारी दोन वाजताच्या सुमारास एमआयडीसीतील एका कंपनीत असलेल्या महिलेच्या मोबाईलवर अनोळखी व्यक्तीने फोन केला. यावर फिर्यादीने त्या नंबरवर २.१४ वाजताच्या सुमारास फोन केला असता संबंधित व्यक्तीने स्वतःचे नाव बल्या असे सांगितले. त्याने फिर्यादी व महिलेच्या कथित प्रेमसंबंध दर्शविणारे फोटो आपल्या मोबाईलमध्ये असल्याचे सांगून ते सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी दिली.

### मान्सून लांबणीवर, पण राज्यात आज वादळी पावसाची शक्यता



अहिल्यानगर (स. गांवकरी) : राज्यातील हवामानात हळूहळू बदल होत असून जूनच्या पहिल्या आठवड्यात अनेक भागांत वादळी पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. मात्र हा पाऊस मान्सूनचा नसून मान्सूनपूर्व स्वरूपाचा असल्याने शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, असे आवाहन कृषी आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून करण्यात आले आहे. दरम्यान १ जूनपासून वादळी पावसाचा अंदाज असला तरी किमान १० जून पर्यंत राज्यातील बहुतांश भागात मान्सूनच्या आगमनाची शक्यता नसल्याचे IMD ने म्हटले आहे.हवामान विभागाच्या अंदाजानुसार, विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि खानदेश या भागांत दुपारनंतर ढगाळ वातावरण निर्माण होऊन काही ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाच्या सरी कोसळू शकतात.  कोकण किनारपट्टीवरही काही भागांत हलका ते मध्यम पाऊस पडण्याचा अंदाज आहे. मे महिन्याच्या तुलनेत तापमानात काही प्रमाणात घट होणार असली तरी पूर्व विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये कमाल तापमान ४० अंश सेल्सिअसच्या वर राहण्याची शक्यता आहे. महत्त्वाचे म्हणजे, सध्या होत असलेल्या वादळी पावसाचा मान्सूनशी थेट संबंध नाही. मान्सून अद्याप केरळात पूर्णपणे दाखल झालेला नसल्याने महाराष्ट्रातील बहुतांश भागात त्याचे आगमन किमान १० जूनपर्यंत होणार नसल्याची शक्यता आहे.  प्रशासनाने नागरिकांना आणि शेतकऱ्यांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. विशेषतः विजांच्या कडकडाटाच्या वेळी झाडाखाली, टिनशेडखाली किंवा विद्युत खांब, ट्रान्सफॉर्मर आणि वीजवाहिन्यांच्या जवळ उभे राहू नये. तसेच पाळीव जनावरांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यावर भर देण्यात आला आहे. शेतकऱ्यांनी मान्सूनची नियमित प्रगती लक्षात घेऊनच पुढील कृषी निर्णय घ्यावेत, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.



### चोरीचा यशस्वी तपास करणाऱ्या पोलिसांचा संघटनांकडून सन्मान

ठाणे (स. गांवकरी) : काही दिवसांपूर्वी दिवा परिसरातील रहिवासी ज्योती अभिवंत यांच्या राहत्या घरात चोरीची घटना घडली होती. या चोरीमध्ये सुमारे साडेपाच तोळे सोन्याचे दागिने, काही चांदीच्या वस्तू तसेच रोख रक्कम चोरीला गेली होती. या प्रकरणी मुंब्रा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार आर. डी. सत्रे करत होते. तपासादरम्यान त्यांनी अत्यंत तत्परता, चिकाटी आणि कौशल्यपूर्ण पद्धतीने तपास करत चोरीस गेलेले दागिने परत मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे पीडित महिलेला तिचे मौल्यवान दागिने परत मिळाल्याने समाधान व्यक्त केले आले आहे. सदर यशस्वी कामगिरी पोलीस सह आयुक्त प्रिया डमाळे, मुंब्रा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार आर. डी. सत्रे यांच्यासह दिवा पोलीस चौकीतील पोलीस अंमलदार रवी सातपुते, पोलीस हवालदार सुनील कोळेकर आणि पोलीस अंमलदार वसीम तडवी यांनी विशेष कामगिरी केली. प्रसंगी या पोलिसांच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे आरंभ सोशल फाउंडेशन आणि युनिव्हर्सल ह्युमन राइट्स कौन्सिल भारत यांच्या वतीने त्याचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास महाराष्ट्र महिला प्रदेशाध्यक्ष तसेच आरंभ सोशल फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा सुवर्णाताई कदम उपस्थित होत्या. याशिवाय वैदेही पालकर, जागृती सागवेकर, अर्चना कांबळे आणि रेश्मा कांबळे यांनीही उपस्थित राहून पोलिसांचे अभिनंदन केले. उपस्थितांनी पोलिसांनी केलेल्या निस्वार्थ सेवाभावी कार्याचे कौतुक करत नागरिकांच्या सुरक्षेसाठी अशाच तत्परतेने काम करत राहण्याचा विश्वास व्यक्त केला.

# एल-निनोचे संकट : पाणी-चारा टंचाईचे सावट

## जिल्हाधिकाऱ्यांचे यंत्रणेला अलर्ट

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

एल-निनोच्या संभाव्य प्रभावामुळे आगामी काळात पर्जन्यमानावर परिणाम होण्याची शक्यता आहे. ही बाब लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, जलस्रोतांचे नियोजन, चाऱ्याची उपलब्धता तसेच संभाव्य पाणीटंचाईच्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी आतापासूनच सज्ज राहून प्रभावी उपाययोजना कराव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात एल-निनोचा प्रभाव आणि त्यावर करावयाच्या उपाययोजनांबाबत आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. आशिया बोलत होते. यावेळी उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, उपजिल्हाधिकारी अनुपकुमार यादव, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता बाळासाहेब शेटे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या अधीक्षक अभियंता सुनंदा नरवाडे, नगरपालिका प्रशासन अधिकारी अभिजित हराळे उपस्थित होते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्यासह संबंधित यंत्रणांचे प्रमुख अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

डॉ. आशिया म्हणाले, जिल्ह्यातील उपलब्ध पाणीसाठ्याचा विचार करून आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्यात यावे. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होण्यापूर्वीच आवश्यक




उपाययोजना राबवून नागरिकांना दिलासा द्यावा. ग्रामीण व शहरी भागातील पाणीपुरवठा योजनांची नियमित तपासणी करून त्या सतत कार्यान्वित राहतील, याची दक्षता घ्यावी. जिल्ह्यातील उपलब्ध पाणीस्रोतांमधून अनधिकृतपणे पाणी उपसा होणार नाही यासाठी विशेष दक्षता घेणे आवश्यक आहे. अशा प्रकरणांवर शीघ्रगतीने कारवाई करण्यासाठी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांचा समावेश असलेले विशेष पथक स्थापन करून अनधिकृतपणे पाणी उपसा करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी, असे त्यांनी सांगितले. संभाव्य परिस्थिती लक्षात घेऊन पशुधनासाठी पुरेशा प्रमाणात चारा उपलब्ध राहणे आवश्यक आहे. यासाठी गाव, मंडळ आणि तालुकास्तरावर सूक्ष्म नियोजन करण्यात यावे. ज्या भागात चाऱ्याची उपलब्धता अधिक आहे, तेथून चारा टंचाई असलेल्या तालुक्यांमध्ये चाऱ्याचा पुरवठा करण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारावी, असे निर्देश त्यांनी दिले. पिण्याच्या पाण्याच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड होता कामा नये. प्रत्येक तालुक्यात नियमितपणे पाण्याचे नमुने तपासण्यात यावेत. प्रत्येक नगरपालिका क्षेत्रात उपलब्ध पाणीसाठ्याचे काटेकोर नियोजन करून नागरिकांना नियमित पाणीपुरवठा सुनिश्चित करावा, असेही ते म्हणाले.

बैठकीत कृषी विभाग, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, जलसंपदा विभाग, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, महावितरण, नगरपरिषद प्रशासन तसेच इतर संबंधित विभागांकडून सद्यस्थितीचा आढावा सादर करण्यात आला.

## दारणा मातेचा आरती सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न

इगतपुरी : (स. गांवकरी)

भागीरथ आतकरी मो (8208466839) इगतपुरी तालुक्यातील घोटी येथे दारणामाई प्रतिष्ठान व सखी सोशल ग्रुपच्या वतीने रविवार दि. ३१ रोजी सायंकाळी दारणा मातेचा आरती सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या आरती सोहळ्याला दारणामाई प्रतिष्ठानचे बंटी पगारे, सख्खी सोशल ग्रुपच्या वैशाली गोसावी, ज्योती चव्हाण, अ‍ॅड. सोपान, सुनीता सिंघल, उर्मिला वेताळ, ललिता क्षीरसागर, कीर्ती अग्रवाल, मंगलताई आरोटे, दीपाली शिंदे, अश्विनी ठोळे, भारती पंडित, शाहिर बाळासाहेब भगत, सखाराम गव्हाणे, हरिष भागडे, हरिष उघडे, प्रभाकर खाडे, नवीन शिंदे, भानुदास चव्हाण, संजय चव्हाण, नवीन शिंदे, एकनाथ माळी यांच्यासह सर्व महिला पुरुष मंडळी उपस्थित होते. सायंकाळच्या उत्साहवर्धक



वातावरणात दारणा नदी प्रेमी व जमलेल्या सर्वांच्या उपस्थितीत दारणा नदी मातेचा आरतीचा सोहळा घोटी येथे मोठ्या आनंदाने उत्साहाने साजरा करण्यात आला. यावेळी दारणामाई प्रतिष्ठानचे बंटी पगारे यांनी सांगितले की, नदीच्या पाण्यावर अनेक नागरीकांचे जीवन अवलंबून आहे त्यामुळे दारणा नदी मातेला स्वच्छ व सुंदर ठेवणे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. " टाकू नका नदीमध्ये कचरा कारण आई आहे तिचा दर्जा " सर्वांनी या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल बंटी पगारे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## खोडद : ग्राहक हक्कांसाठी राज्यव्यापी मोहीम

खोडद : (स. गांवकरी)

नारायणगाव येथे अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या वतीने ग्राहकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि एमआरपी व्यवस्थेतील त्रुटींविरोधात राज्यव्यापी जनजागृती व स्वाक्षरी अभियानाला प्रारंभ करण्यात आला. या अभियानादरम्यान नागरिकांना एमआरपीचे महत्त्व, किंमत निर्धारण प्रक्रिया आणि ग्राहकांचे हक्क याविषयी माहिती देण्यात आली. अभियानादरम्यान उपस्थित नागरिकांशी संवाद साधून एमआरपी कशी ठरते?, एकाच वस्तूची किंमत वेगवेगळ्या ठिकाणी वेगळी का असते? आणि ग्राहकांना किंमत रचनेची माहिती मिळायला हवी का? अशा प्रश्नांच्या माध्यमातून ग्राहकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यात आली. नागरिकांना ग्राहक हक्क ,किंमत ,पारदर्शकता आणि एमआरपी व्यवस्थेतील त्रुटी याविषयी माहिती पत्रकांचे वितरण करण्यात आले. प्रांत सहकोषाध्यक्ष ज्ञानेश्वर




उंडे यांनी सांगितले की ,सध्याच्या एमआरपी व्यवस्थेत पारदर्शकतेचा अभाव असल्याने ग्राहकांची दिशाभूल होत आहे .वस्तूंचा उत्पादन खर्च, कर, वाहतूक खर्च आणि विक्रेत्यांचा नफा याबाबत स्पष्ट माहिती ग्राहकांना मिळावी, अशी मागणी करण्यात आली. एमआरपी ग्राहक संरक्षणाचे साधन नसून अनेकदा ग्राहकांच्या आर्थिक शोषणाचे माध्यम बनत आहे. वस्तूचा उत्पादन खर्च, कर ,वाहतूक खर्च आणि विक्री मार्जिन याची माहिती ग्राहकांपासून लपवली जाते .त्यामुळे एमआरपी व्यवस्थेत संपूर्ण पारदर्शकता आणि किंमत निर्धारणाची स्पष्ट माहिती देणे आणि ग्राहकांना वाजवी किंमत मिळवण्याची हमी देणे आवश्यक आहे. ग्राहकांची लूट थांबवण्यासाठी केंद्र शासनाने एमआरपी व्यवस्थेचे तातडीने पुनरावलोकन करून सुधारित कायदा करावा. यावेळी मध्य महाराष्ट्र प्रांत अध्यक्ष बाळासाहेब औटी ,प्रांत सहकोषाध्यक्ष ज्ञानेश्वर उंडे,तालुका उपाध्यक्ष देवराम तट्टू, जुन्नर तालुकाध्यक्ष जगन्नाथ खोकराळे, तालुका सचिव देवराम नाबगे, पुणे जिल्हा सचिव अशोक भोर, संजय चिंचपूरे, आशा थोरात, नंदराम भोर यांच्यासह कार्यकर्ते, ग्रामस्थ ,महिला व युवक या अभियानाला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अहिल्यादेवी होळकरांच्या कार्याचा अनमोल वारसा

इगतपुरी : (स. गांवकरी)

मुंबईहून नाशिककडे रस्त्याने प्रवास करताना लागणाऱ्या कसारा अर्थात थळ घाटाच्या परिसरात एक अद्भुत आणि ऐतिहासिक वास्तू आजही पर्यटकांचे लक्ष वेधून घेते. घाटन देवी मंदिरापासून सुमारे दोन किलोमीटर अंतरावर असलेली घुमटाकार रचना असलेली ही प्राचीन बारव स्थानिकांमध्ये “टोप बारव”, “घुमटी बारव” किंवा “राणी अहिल्यादेवींची बारव” म्हणून ओळखली जाते. सुमारे २५० वर्षांपूर्वी आहिल्याबाई होळकर यांच्या कार्यकाळात ही बारव बांधण्यात आल्याचे सांगितले जाते. घाटातून प्रवास करणाऱ्या वाटसरू, यात्रेकरू आणि स्थानिकांना पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध व्हावी तसेच त्यांना विश्रांती घेण्यासाठी सुरक्षित ठिकाण मिळावे या उद्देशाने या बारवेची निर्मिती करण्यात आली होती. सुमारे ४० फूट व्यासाची ही बारव पूर्णपणे दगडी बांधकामात उभारण्यात आली



आहे. बारवेवर उभारलेला गोलाकार घुमट तिचे वैशिष्ट्य मानले जाते. झाडांचा पाला, जंगली प्राणी किंवा इतर घाण पाण्यात पडू नये तसेच उन्हाळ्यात पाण्याचे बाष्पीभवन कमी व्हावे यासाठी या बारवेवर तीन बाजूंनी अर्धगोलाकार खिडक्या ठेवून भव्य घुमट उभारण्यात आला आहे. दगडी शिळांची उत्कृष्ट मांडणी आणि स्थापत्यकलेचा सुंदर नमुना असलेली ही रचना आजही भक्कम अवस्थेत उभी आहे. विशेष म्हणजे, कडक उन्हाळ्यातही या बारवेत मुबलक पाणी उपलब्ध असते. इतक्या उंच डोंगराळ भागात वर्षभर पिण्यायोग्य पाणी टिकून राहणे हे अनेकांसाठी आश्चर्याचे ठरते. घाट परिसरातील दोन वाड्यांतील महिला आजही या बारवेतील पाण्याचा वापर करतात. बारव किती खोल आहे याचा अचूक अंदाज तिच्यातील पाण्यामुळे येत नसला तरी आजही तिच्या रचनेत कोणतीही मोठी पडझड झालेली दिसून येत नाही. अहिल्यादेवी होळकर यांनी महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेशातील अनेक तीर्थक्षेत्रांमध्ये घाट, मंदिरे, धर्मशाळा आणि पाणपोया उभारून जनसेवेचे कार्य केले होते. त्याच परंपरेचा हा एक महत्त्वाचा वारसा मानला जातो.

दरम्यान, अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त सकल धनगर समाज आणि जनसेवा प्रतिष्ठान यांच्या वतीने या ऐतिहासिक स्थळावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी या वास्तूच्या ऐतिहासिक महत्त्वावर प्रकाश टाकण्यात आला. महाराष्ट्र शासनाने या टोप बारवेच्या परिसराचे सुशोभीकरण करून पर्यटनस्थळ म्हणून विकसित करण्याचे काम केले आहे. पर्यटकांना या प्राचीन वारशाची माहिती मिळावी यासाठी विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून परिसरात अनेक पर्यटन आकर्षणेही विकसित करण्यात आली आहेत. उत्कृष्ट स्थापत्यकलेचा हा वारसा जतन करण्यासाठी शासनाकडून प्रयत्न सुरू असून, इतिहासप्रेमी आणि पर्यटकांसाठी ही बारव आकर्षणाचे केंद्र ठरत आहे.

## श्रध्दा सबुरी बुट हाऊसच्या ६ व्या वर्धापन दिनानिमित्त सामाजिक उपक्रम



रावेर : (स. गांवकरी)

रावेर  शहरातील श्रध्दा सबुरी बुट हाऊसच्या ६ व्या वर्धापन दिनानिमित्त लहान मुले मुली यांना समोसा,कचोरी व कॉफीचे मोफत वाटप करण्यात आले. या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. समाजाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या हेतूने हा सामाजिक उपक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी मा. श्री. विनोद रामचंद्र कोळी (शिवा भाई G), महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ राज्य कार्यकारिणी सदस्य तथा उत्तर महाराष्ट्र संघटक व दैनिक लोकशाही प्रतिनिधी यांचे मार्गदर्शन लाभले. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी चि. तुषार रामचंद्र कोळी, खान्देशचे ब्लॉगर तथा संचालक, श्रध्दा सबुरी बुट हाऊस, एम. जे. मार्केट, बस स्टँड समोर, रावेर यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमास नितीन भवर, विजय सोनार, कौशल पाटील, धनराज कोळी, हर्षल कोळी, अतुल कोळी, रुपेश चौधरी, रुपेश कचरे आदी उपस्थित होते. उपस्थितांनी श्रध्दा सबुरी बुट हाऊसच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## ‘स्वच्छ गाव, सुरक्षित जलवायू’ मोहिमेला प्रारंभ

ठाणे: (स. गांवकरी)

जागतिक पर्यावरण दिन २०२६ निमित्त केंद्र शासनाच्या जलशक्ती मंत्रालयाच्या पेयजल व स्वच्छता विभागामार्फत १ जून ते ५ जून २०२६ या कालावधीत “स्वच्छ गाव, सुरक्षित जलवायू” ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या या मोहिमेच्या माध्यमातून पर्यावरण संरक्षण, शाश्वत विकास, कचरा व्यवस्थापन आणि जनसहभाग यांना प्रोत्साहन देण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषद ठाणेच्या पाणी व स्वच्छता विभागामार्फत देण्यात आली. यावर्षीच्या जागतिक पर्यावरण दिनाची संकल्पना “हवामान कृती” (Climate Action) अशी



असून त्याअनुषंगाने मिशन लाईफ (Lifestyle for Environment) बाबत व्यापक जनजागृती करण्यात येणार आहे. पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय तसेच पेयजल व स्वच्छता विभाग यांच्या संयुक्त प्रयत्नांतून ग्रामीण भागात विविध लोकसहभागात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत घनकचरा व्यवस्थापनासाठी 4Rs अर्थात Refuse, Reduce, Reuse आणि Recycle या संकल्पनांना विशेष प्रोत्साहन दिले जात आहे. तसेच पाणी व्यवस्थापनासाठी 3Rs (Reduce, Reuse, Recharge), परिपत्र अर्थव्यवस्था (Circular Economy) आणि “कचऱ्यापासून संपत्ती” (Waste to Wealth) या संकल्पनांचा प्रसार करण्यात येणार आहे. या माध्यमातून ग्रामीण भागात पर्यावरणपूरक जीवनशैली विकसित करण्यावर भर दिला जाणार आहे. १ एप्रिल २०२६ पासून लागू झालेल्या घनकचरा व्यवस्थापन (SWM) नियम २०२६ अंतर्गत कचऱ्याच्या शास्त्रोक्त व्यवस्थापनाला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. ग्रामपंचायती, स्थानिक संस्था आणि संबंधित घटकांच्या जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या असून, गावपातळीवर प्रभावी अंमलबजावणीसाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. या मोहिमेअंतर्गत ग्रामपंचायतींना Bulk Waste Generators (BWGs) यांची नोंदणी करणे, चार प्रकारांमध्ये स्रोतस्तरावर कचऱ्याचे वर्गीकरण (Four-Stream Source Segregation) करणे, जुन्या कचरा साठ्यांचे (Legacy Waste) व्यवस्थापन करणे, तसेच सामुदायिक घनकचरा व्यवस्थापन सुविधांचे स्वयंमूल्यांकन करून त्यांची कार्यक्षमता वाढविणे याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. ग्रामपंचायतींमार्फत गावांमध्ये स्वच्छता अभियान, जनजागृती रॅली, विशेष ग्रामसभा, स्वच्छता शपथ, वृक्षारोपण, कचरा वर्गीकरण प्रात्यक्षिके, प्लास्टिकमुक्ती अभियान तसेच मिशन लाईफ विषयक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. स्वच्छता सुविधांची योग्य देखभाल, समुदायाचा सक्रिय सहभाग आणि ODF Plus Model गाव संकल्पनेची प्रभावी अंमलबजावणी यावरही विशेष भर दिला जाणार आहे.५ जून रोजी आयोजित विशेष ग्रामसभांमध्ये मोहिमेतील उपलब्धी, घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ बाबत जनजागृती, स्थानिक कृती आराखडा तसेच पुढील अंमलबजावणीच्या नियोजनाबाबत चर्चा करण्यात येणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### दिव्यातील शूरवीर अॅकॅडमीने घडवले १५ पोलीस तर २ आर्मी जवान

ठाणे (स. गांवकरी) : दिवा शहरातील शूरवीर करियर अॅकॅडमीने १५ पोलीस तर २ आर्मी जवान घडविले आहे. अॅकॅडमीचे संचालक नरेश चौधरी यांनी आपल्या मार्गदर्शन व दैनंदिन कसरतीच्या जोरावर सन 2025-26 या कालावधीत अॅकॅडमीत अनेक विद्यार्थी घडविले असून विविध शासकीय सेवांमध्ये यशस्वीरीत्या निवड झाली आहे. यावर्षी सर्व यशस्वी व निवड झालेल्या विदयार्थ्यांना गौरवासाठी भव्य अभिनंदन व सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात पोलिस, सैन्य तसेच इतर शासकीय विभागांमध्ये नियुक्ती मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. सदर गौरव सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून शंकर सातपुते (ग्राम महसूल अधिकारी) उपस्थित होते. तसेच अॅकॅडमीचे संचालक नरेश चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव करण्यात आला. यावेळी मुंबई पोलीस, मीरा-भाईंदर पोलीस, नवी मुंबई पोलीस, रायगड जिल्हा पोलीस तसेच भारतीय सैन्य दलात निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण सराव आणि योग्य मार्गदर्शनाच्या बळावर विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केल्याचे मान्यवरांनी सांगितले. सत्कार सोहळ्यात विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या प्रसंगी स्पर्धा परीक्षा व शासकीय भरतीची तयारी करणाऱ्या युवकांना प्रेरणादायी मार्गदर्शन करण्यात आले. दिवा शहरातील शूरवीर अॅकॅडमीने अल्पावधीत अनेक युवकांना शासकीय सेवेत स्थान मिळवून देत दिवा परिसरात वेगळी ओळख निर्माण केली असल्याचे उपस्थितांनी नमूद केले. अॅकॅडमीच्या वतीने भविष्यातही अधिकाधिक युवकांना पोलिस, सैन्य आणि इतर शासकीय सेवांमध्ये संधी मिळावी यासाठी प्रशिक्षण व मार्गदर्शन सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.



### आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या आरोपींच्या अटकेसाठी आमरण उपोषण

- राळेगण थेरपाळ येथील मृत शेतकऱ्याच्या कुटुंबीयांचा लढा तीव्र, पोलीस ठाण्यासमोर ग्रामस्थांचा ठिय्या

पारनेर (स. गांवकरी) : मौजे माजमपुर (ता. पारनेर) येथील रहिवासी कै. सुदाम विष्णू आढाव यांनी जमिनीच्या वादातून टोकाचे पाऊल उचलत आत्महत्या केली होती. या प्रकरणी आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या आरोपींना अद्याप अटक न झाल्याने, संतप्त झालेल्या मयत सुदाम आढाव यांच्या कुटुंबीयांनी आजपासून सोमवार दि. १ जून पारनेर पोलीस स्टेशनसमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. मयत सुदाम आढाव यांचे पुत्र प्रभाकर सुदाम आढाव यांनी दिलेल्या माहितीनुसार, गट नंबर ६२ मधील जमिनीच्या वादातून संभाजी फक्कड आढाव, राजाराम फक्कड आढाव, शिवाजी फक्कड आढाव आणि भाऊसाहेब सोपान आढाव या चौघांच्या जाचाला कंटाळून त्यांच्या वडिलांनी २१ मे २०२६ रोजी विष प्राशन करून आत्महत्या केली होती. या प्रकरणी पारनेर पोलीस स्टेशनमध्ये एफ.आय.आर. क्र. ३८७/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, गुन्हा नोंदवून दिवस उलटूनही पोलिसांनी अद्याप एकाही आरोपीला अटक केलेली नाही. प्रशासनाच्या या संथ कारभारावर संताप व्यक्त करत, पीडित कुटुंबाने ३१ मे पर्यंत आरोपींना अटक करण्याचा अल्टिमेटम दिला होता. परंतु, कोणतीही कारवाई न झाल्याने अखेर १ जून २०२६ पासून प्रभाकर आढाव आणि त्यांचे कुटुंबीय पोलीस स्टेशनसमोर आमरण उपोषणास बसले आहेत. या आंदोलनाला माजमपुर येथील ५० हून अधिक ग्रामस्थांनी सक्रिय पाठिंबा दिला असून, महिला मोठ्या संख्येने उपोषणामध्ये सहभागी झाले आहेत सर्वजण उपोषण स्थळी उपस्थित आहेत. आरोपी मोकाट फिरत असल्याने आम्हाला सतत धमकावले जात असून आमच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे, असा गंभीर आरोप प्रभाकर आढाव यांनी केला आहे. या उपोषणादरम्यान जर कुटुंबीयांच्या जीविताला काही बरे-वाईट झाल्यास, त्याला सर्वस्वी प्रशासन जबाबदार राहील, असा इशाराही त्यांनी तहसीलदारांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे. आता पोलीस प्रशासन या गंभीर प्रकरणाची दखल घेऊन काय कारवाई करते आणि आरोपींना कधी बेड्या ठोकल्या जातात, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

### शोभा शेलार यांची जिल्हा परिषद ठाणे येथे नियुक्ती



ठाणे (स. गांवकरी) : महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागाच्या शासन आदेशानुसार जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई शहर या पदावर कार्यरत असलेल्या शोभा म. शेलार यांची जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बाल विकास), जिल्हा परिषद ठाणे या पदावर बदली करण्यात आली असून त्यांनी आज, दि. १ जून, २०२६ रोजी आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला. शासनाच्या निर्देशानुसार शेलार यांनी जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बाल विकास), जिल्हा परिषद ठाणे या पदावर रुजू होताना जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई शहर या पदाचा अतिरिक्त कार्यभारही स्वीकारला आहे. महिला व बाल विकास क्षेत्रातील विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीचा समृद्ध अनुभव असलेल्या श्रीमती शेलार यांनी यापूर्वी विविध पदांवर कार्यरत असताना महिला सक्षमीकरण, बाल संरक्षण, पोषण अभियान, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, अंगणवाडी सेवा तसेच विविध शासकीय कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीत उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत महिला व बाल विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या अंमलबजावणीस अधिक गती मिळण्यास मदत होणार आहे. विशेषतः महिला व बालकांच्या आरोग्य, पोषण, शिक्षण, संरक्षण आणि सर्वांगीण विकासाशी संबंधित उपक्रम अधिक परिणामकारकपणे राबविण्यासाठी त्यांच्या अनुभवाचा लाभ होणार आहे. जिल्हा परिषद ठाणे प्रशासनाच्या वतीने शेलार यांचे स्वागत करण्यात आले असून, त्यांच्या नेतृत्वाखाली महिला व बाल विकास विभागाच्या विविध उपक्रमांना अधिक बळकटी मिळेल तसेच लाभार्थ्यांपर्यंत योजनांचा प्रभावी लाभ पोहोचविण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# घुसखोरांची एटीएस मार्फत चौकशी करा

## आमदार संग्राम जगताप यांची मागणी

- अवैध घुसखोरीच्या विरोधात जनआक्रोश
- पारनेरमध्ये सकल हिंदू समाजाचा भव्य 'रास्ता रोको'

पारनेर : (स. गांवकरी)

पारनेर तालुक्यातील वडझिरे व परिसरातील गावांमध्ये काही बांगलादेशी घुसखोर व रोहिंग्यांनी अनधिकृतपणे वास्तव्य करून स्थानिक नागरिकांना त्रास देणे आणि जमिनी हडपण्याचे प्रकार सुरू केले असल्याचा आरोप करत आमदार संग्राम जगताप यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. देवी भोयरे फाटा येथे स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने आयोजित करण्यात आलेल्या रस्ता रोको आंदोलनामध्ये सहभागी होऊन त्यांनी प्रशासनाला सज्जड इशारा दिला. आमदार संग्राम जगताप यांनी स्पष्टपणे मागणी केली की, या भागातील कथित घुसखोरांची केवळ स्थानिक पातळीवर चौकशी न करता ती दहशतवाद विरोधी पथकामार्फत (ATS) करण्यात यावी. स्थानिक नागरिकांच्या जमिनी बळकावण्याच्या वाढत्या घटनांमुळे जनतेमध्ये असंतोष असून, प्रशासनाने यावर तातडीने कायदेशीर कारवाई करावी, अन्यथा स्थानिक नागरिक स्वतःच या घुसखोरांचा बंदोबस्त करतील, असा इशारा त्यांनी दिला. वडझिरे परिसरासह संपूर्ण पारनेर तालुक्यातून अशा अवैध घुसखोरांचा बीमोड करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. जर प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले, तर भविष्यात यापेक्षाही मोठे आंदोलन उभारले जाईल आणि प्रशासनाच्या परवानगीची वाट न पाहता कायदा हातात घेऊन नागरिक या घुसखोरांचा बंदोबस्त करतील, अशा शब्दांत त्यांनी आपला पवित्रा मांडला.



### कायदा हातात घेण्यास भाग पाडू नका

जर प्रशासनाने या घुसखोरांवर कारवाई करण्यास टाळाटाळ केली, तर भविष्यात यापेक्षा तीव्र आंदोलन करण्यात येईल. इतकेच नव्हे, तर प्रशासनाच्या परवानगीची वाट न पाहता कायदा हातात घेऊन नागरिक स्वतः या घुसखोरांचा बंदोबस्त करतील, असा इशारा त्यांनी आंदोलनाच्या माध्यमातून आमदार संग्राम जगताप यांनी दिला.

अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील वडझिरे आणि परिसरात वाढत्या अवैध घुसखोरीच्या मुद्द्यावरून स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या घुसखोरीच्या विरोधात आणि प्रशासनाला जागे करण्यासाठी सोमवारी १ जून २०२६ रोजी आमदार संग्राम जगताप व सागर बेग यांच्या नेतृत्वाखाली'सकल हिंदू समाजा'च्या वतीने पारनेर-बेल्ह-आळेफाटा रोडवरील देवीभोयरे फाटा येथे भव्य 'रास्ता रोको' आंदोलन करण्यात आले. गेल्या काही दिवसांपासून परिसरात रोहिंग्या आणि बांगलादेशी घुसखोरांची वाढती संख्या , तसेच बांगलादेशी जिहादी वृत्तीच्या वाढत्या घटनांमुळे स्थानिक नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या गंभीर प्रकारांना आळा घालण्यासाठी आणि प्रशासनावर दबाव निर्माण करण्यासाठी हे आंदोलन पुकारण्यात आले होते. आंदोलनादरम्यान 'अवैध घुसखोरीच्या विरोधात सकल हिंदू समाज मैदानात' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. या आंदोलनात सकल हिंदू समाजाचे शेकडो बांधव, महिला, युवक आणि युवती मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी हिंदुत्ववादी आमदार संग्रामभैय्या जगताप आणि धर्मरक्षक सागर बेग यांची विशेष उपस्थिती होती. आपल्या भाषणातून त्यांनी प्रशासनाला थेट इशारा दिला की, जर तातडीने या घुसखोरांची ओळख पटवून त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई केली गेली नाही, तर हे जनआंदोलन अधिक तीव्र केले जाईल. आंदोलकांकडून करण्यात आलेल्या प्रमुख मागण्यांमध्ये घुसखोरांचा शोध घेऊन त्यांना तातडीने बाहेर काढणे आणि परिसरातील असुरक्षिततेचे वातावरण दूर करणे, यांचा समावेश आहे. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर देवीभोयरे फाटा परिसरात तणावपूर्ण शांतता होती. आंदोलनाच्या अनुषंगाने कोणतीही अनुचित घटना घडू नये म्हणून स्थानिक प्रशासनाने परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात केला होता.

या आंदोलनाने प्रशासनाला आपल्या भूमिकेवर पुनर्विचार करण्यास भाग पाडले असून, स्थानिक नागरिकांमध्ये वाढत्या घुसखोरीबाबत असलेल्या भीती आणि असंतोषाची दखल आता सरकारला घ्यावीच लागणार आहे.

## नऊ जणांचे १४ उमेदवारी अर्ज दाखल

नाशिक : (स. गांवकरी)

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या नाशिक स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत नऊ उमेदवारांनी १४ अर्ज दाखल केले. या उमेदवारी अर्जांची मंगळवार २ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता छाननी करण्यात येईल, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी आयुष प्रसाद यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात ही पत्रकार परिषद झाली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी तथा सहनिवडणूक निर्णय अधिकारी रोहितकुमार राजपूत, उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. मधुमती सरदेसाई, प्रशिक्षणार्थी जिल्हाधिकारी डॉ. जयकुमार आढे आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री. प्रसाद यांनी सांगितले की, महाराष्ट्र विधानपरिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची मुदत होती. एकूण ९ जणांचे १४ अर्ज दाखल झाले आहेत. या अर्जांची मंगळवार २ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता छाननी करण्यात येईल. ४ जून २०२६ पर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस असेल. १८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या कालावधीत मतदानाची प्रक्रिया पार पडेल. त्यानंतर २२ जून २०२६ रोजी मतमोजणी होईल. या निवडणुकीसाठी भारत निवडणूक आयोगाने निरीक्षक म्हणून भारतीय प्रशासकीय सेवेतील ज्येष्ठ अधिकारी मिलिंद शंभरकर यांची नियुक्त केली असून त्यांचे नाशिक येथे आगमन झाले आहे. ते भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार संपूर्ण निवडणूक प्रक्रियेवर नियंत्रण ठेवणार आहेत. या निवडणुकीसाठी एकूण ६२२ मतदार असून मतदान मतपत्रिकेवर होणार आहे.

## समता सैनिक दल प्रशिक्षण शिबिर उत्साहात संपन्न

पाथर्डी : (स. गांवकरी)

शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने एक दिवशीय समता सैनिक दल प्रशिक्षण व त्यानिमित्ताने भारतीय बौद्ध महासभा महिला कार्यकारीणी ची दि. 31 मे रोजी निवड करण्यात आली.

समता सैनिक दलामध्ये 30 प्रशिक्षणार्थीने सहभाग नोंदवून यशस्वीरित्या प्रशिक्षण पूर्ण केले.या प्रशिक्षण शिबिरामध्ये विशेष करून करोडी, बालमटाकळी व चिंचपूर पांगुळ या गावातील तरुणांनी सर्वात जास्त सहभाग नोंदवला आहे. या प्रशिक्षण शिबिरामध्ये पाच महिला प्रशिक्षण शिबिरार्थींनी सहभाग नोंदवला. त्यांना भारतीय बौद्ध महासभा यांच्याकडून प्रमाणपत्र ,ओळखपत्र, नोंदणी पत्र इत्यादी प्रदान करण्यात आले.



या शिबिराचे उद्घाटन जिल्हाध्यक्ष राजेंद्र साळवे, सरचिटणीस सतीश ओहोळ, कोषाध्यक्ष विजय हुसळे, जिल्हा सचिव एस. एस. डी. गोरख केदारे यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिरासाठी प्रशिक्षक म्हणून मेजर एस. एस डी बाळू कांबळे ,संतोष गायकवाड उपाध्यक्ष, जिल्हा सचिव एस. एस डी किशोर कांबळे यांनी यशस्वीपणे प्रशिक्षणार्थींना दिवसभरामध्ये प्रशिक्षित केले.

या प्रशिक्षण शिबिरास प्रमुख उपस्थिती बाळासाहेब धस जिल्हा पर्यटन सचिव, अरुण भोंगळे संघटक पाथर्डी प्रभारी, बाळासाहेब लहासे सैनिक एस एस डी, इत्यादी उपस्थित होते.

या प्रशिक्षणाची सुरुवात वरील सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे सकाळी 9:30 वाजता ध्वजारोहण करून करण्यात आले. संपूर्ण दिवसभरामध्ये या संपूर्ण प्रशिक्षण शिबिरामध्ये प्रशिक्षकांनी समता सैनिक दलाची कर्तव्य, कामे, संचालन, जबाबदाऱ्या इत्यादी सर्व गोष्टीवर सविस्तर सराव व उद्बोधन करण्यात आले. त्याचबरोबर जिल्हा कार्यकारिणीच्या उपस्थितीमध्ये पाथर्डी तालुका महिला कार्यकारिणी घोषित करण्यात आली. या कार्यकारणीच्या निवडीसाठी भारतीय बौद्ध महासभेच्या महिला जिल्हाध्यक्ष सुनीता गायकवाड उपस्थित होत्या. त्यांनी पाथर्डी भारतीय बौद्ध महासभा पाथर्डी महिला तालुकाध्यक्ष म्हणून मीनाताई भीमराव शिंदे यांची निवड श्रीपद बळीद दादा यांनी यापूर्वीच केलेली होती, आज प्रत्यक्षात तालुकाध्यक्षपदाच्या निवड ची घोषणा करून निवड करण्यात आली. त्याचबरोबर सचिव मंदाकिनी गाडे, सरचिटणीस आश्लेषा क्षेत्रे यांची निवड केली. व या महिला तालुका कार्यकारिणी निवड बैठकीमध्ये रमा ढेकणे, मीना सरसे, कमलबाई शिंदे, भारती भोंगळे, सारिका गांगुर्डे, माया जाधव, इत्यादी उपस्थित होत्या .

हा कार्यक्रम यशस्वी घडून आणण्यासाठी पाथर्डी तालुकाध्यक्ष श्रीपत दादा बळीद, सरचिटणीस दिलीप सरसे, कोषाध्यक्ष गौतम ढेकणे , त्याचबरोबर निवृत्त नायब तहसीलदार जगदीश गाडे, एकनाथ ठोकळ, महेंद्र राजगुरू, भीमराज शिंदे, अरुण थोरात इत्यादींनी परिश्रम घेतले.

## मालपाणी बजाज शोरूममध्ये ग्राहकाला मारहाण

संगमनेर : (स. गांवकरी)

- व्यवस्थापकासह कर्मचाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल!
- वाहन दुरुस्तीच्या विलंबावरून वाद
- व्हिडिओ चित्रीकरणामुळे वाद चिघळल्याचा आरोप!




संगमनेर येथील मालपाणी बजाज शोरूममध्ये दुचाकी दुरुस्तीसाठी आलेल्या ग्राहकाला व्यवस्थापक व कर्मचाऱ्यांनी मारहाण केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात व्यवस्थापकासह अनेक कर्मचाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कासारा दुमाला येथील स्वप्निल रोहिदास सातपुते हे आपल्या सासरे त्र्यंबक लक्ष्मण राऊत यांची बंद पडलेली चेतक इलेक्ट्रिक दुचाकी दुरुस्तीसाठी ३० मे रोजी सकाळी मालपाणी बजाज शोरूममध्ये घेऊन गेले होते. वाहन स्वीकारून पावती देण्यास कर्मचाऱ्यांकडून विलंब होत असल्याने त्यांनी याबाबत विचारणा केली. त्यावेळी शोरूमचे व्यवस्थापक सचिन पल्लोड यांनी उर्मटपणे बोलण्यास सुरुवात केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. घटनेचा व्हिडिओ मोबाईलवर चित्रीत करण्यास सुरुवात करताच व्यवस्थापकाने संतापून शिवीगाळ व धक्काबुक्की केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. त्यानंतर शोरूममधील १० ते १५ कर्मचारी घटनास्थळी जमा झाले आणि त्यांनी स्वप्निल सातपुते यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच काही जणांनी लोखंडी रॉड व स्क्रूड्रायव्हरने हल्ला केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या मारहाणीत सातपुते यांच्या छाती, हात, पाय, पोट व चेहऱ्यावर दुखापत झाली. व्यवस्थापक सचिन पल्लोड यांनी गळा दाबून जीवे मारण्याची धमकी दिल्याचाही आरोप फिर्यादीने केला आहे. तसेच २५ ते ३० जणांनी एकत्रितपणे हल्ला करून जीव घेण्याचा प्रयत्न केल्याचा दावा त्यांनी केला आहे.

या प्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात सचिन पल्लोड, मंगेश मिसाळ, विष्णू मोहरीकर, सचिन धुमाळ, धारणकर (पूर्ण नाव अज्ञात) तसेच इतर १० ते १२ अनोळखी व्यक्तींविरोधात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## ओक्लेने सादर केली 'प्लेअर्स कलेक्शन' मोहीम

पुणे: (स. गांवकरी)

एक काळ असा होता जेव्हा खेळाडूने परिधान केलेल्या गोष्टींमध्ये फक्त त्यांच्या गणवेशाला (युनिफॉर्म) महत्त्व असायचे. तो काळ आता संपला आहे. आता खेळाची खरी सुरुवात झगमगाट आणि कोलाहलाच्या आधीच होते; तो एक असा क्षण असतो, जिथे सर्व गोष्टी एकाग्र होतातः म्हणजेच स्टेजवर येण्यापूर्वीची पूर्वतयारी. आजच्या क्रीडा संस्कृतीला आकार देणाऱ्या खेळाडूंसोबत मिळून तयार केलेल्या प्लेअर्स कलेक्शनच्या नवीन चॅप्टरद्वारे ओक्लेने दोन दिग्गज खेळाडूंचे सिग्नेचर आयवेअर सादर केले आहेत, ज्यामध्ये प्रत्येकाची स्वतःची सह-निर्मित कलाकृती समाविष्ट आहे. ओक्ले प्लेअर्स कलेक्शन आता टीम ओक्लेचे खेळाडू जेलिन ब्राउन आणि किलियन एम्बाप्पे यांच्या नवीन सिग्नेचर सिरीजसह पुढे जात आहे. हे असे आयकॉन्स आहेत, जे फक्त खेळ खेळत नाहीत, तर खेळाचा स्तर उंचावून, नवीन इतिहास रचून आणि समुदाय निर्माण करून खेळाभोवतीच्या संस्कृतीला एक नवा आकार देतात.



जेलिन ब्राउनच्या आयवेअर कलेक्शनमध्ये विशेष कोको ब्राउन रंगसंगती सादर करण्यात आली आहे, जी वेगळी आणि सुजाण ओळख निर्माण करते. यातील मुख्य भागांवर ब्राउनचा वैयक्तिक लोगो कोरलेला आहे. ओक्ले हायलँड जेलिन ब्राउन सिग्नेचर सिरीजचा भाग असलेल्या या आयवेअरमध्ये प्रिझम™ रूबी लेन्सेस आहेत, जे उत्तम कव्हरेज देण्यासाठी आणि सूर्याच्या किरणांपासून उत्कृष्ट संरक्षण देण्यासाठी तयार करण्यात आले आहेत.

# वरखेडा येथे रात्री उशिरापर्यंत ई-केवायसी शिबिर

कनाशी : (स. गांवकरी)

- ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद
- उपविभागीय अधिकारी डॉ. कश्मिरा संखे यांच्या उपस्थितीत वनहक्क दाव्यांना गती



ग्रामस्थांच्या सोयीसाठी ३० मे रोजी सायंकाळी ६ वाजता वरखेडा, येथे विशेष ई-केवायसी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शेतकऱ्यांना व वनहक्क दावेदारांना दिवसभर कामानिमित्त वेळ मिळत नसल्याने सायंकाळची वेळ निवडण्यात आली. हे शिबिर रात्री उशिरापर्यंत सुरू होते. सदर शिबिरास सहा. जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, कळवण डॉ. कश्मिरा संखे (भा. प्र. से.) यांनी स्वतः उपस्थित राहून मार्गदर्शन केले. यावेळी वरखेडा ग्राम महसूल अधिकारी, तालुका वन हक्क व्यवस्थापक कळवण व सुरगाणा, वनहक्क दावेदार व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. वन हक्क कायद्यांतर्गत पात्र लाभार्थ्यांचे दावे मंजूर करण्यासाठी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकारक आहे. मात्र अनेक दावेदारांचे ई-केवायसी अपूर्ण असल्याने त्यांचे दावे प्रलंबित होते. ग्रामस्थांच्या अडचणी लक्षात घेऊन प्रशासनाने गावातच शिबिर घेण्याचा निर्णय घेतला. सायंकाळी ६ वाजता सुरू झालेले शिबिर रात्री उशिरापर्यंत चालले. या शिबिरात शेकडो दावेदारांची ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

यावेळी डॉ. कश्मिरा संखे यांनी ग्रामस्थांशी थेट संवाद साधला. "वनहक्क कायद्याचा लाभ प्रत्येक पात्र आदिवासी व पारंपरिक वननिवासी कुटुंबाला मिळाला पाहिजे. त्यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे. कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी ग्रामस्थांनी पुढे यावे," असे आवाहन त्यांनी केले. रात्री उशिरापर्यंत अधिकारी स्वतः थांबून काम करून घेत असल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

वन हक्क व्यवस्थापकांनी दावेदारांना आवश्यक कागदपत्रांबाबत माहिती दिली. तसेच प्रलंबित दाव्यांचा निपटारा जलद गतीने करण्याचे आश्वासन देण्यात आले. दिवसभर शेतात व मोलमजुरीवर जाणाऱ्या ग्रामस्थांना सायंकाळचे शिबिर सोयीचे ठरले. "साहेब रात्रीपर्यंत गावात थांबले. आमची कामे जागेवरच झाली. यामुळे तालुक्याला हेलपाटे वाचले," अशी प्रतिक्रिया एका वनहक्क दावेदाराने दिली. या शिबिरामुळे वरखेडा परिसरातील वनहक्क दाव्यांच्या कामाला गती मिळणार आहे. प्रशासनाच्या या उपक्रमाचे ग्रामस्थांनी स्वागत केले.

# थोडक्यात पण महत्वाचे



## PM-SETU अंतर्गत देशातील पहिली धोरणात्मक गुंतवणूक योजना मंजूर

मुंबई (स. गांवकरी) : प्रधान मंत्री स्किलिंग अँड एम्प्लॉयॅबिलिटी ट्रान्सफॉर्मेशन थ्रू अपग्रेडेड ITI (PM-SETU) योजनेअंतर्गत एक मोठा निर्णय घेण्यात आला आहे. राष्ट्रीय सुकाणू समिती (NSC) ने आंध्र प्रदेशमधील विशाखापट्टणम ITI क्लस्टरच्या धोरणात्मक गुंतवणूक योजना (SIP) ला मंजुरी दिली आहे. ही योजना आर्सेलरमित्तल निप्पॉन स्टील इंडिया (AM/NS India) आणि त्यांची शैक्षणिक भागीदार संस्था न्यू एज मेकर्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (NAMTECH) यांनी मिळून सादर केली होती. PM-SETU योजनेअंतर्गत मंजूर झालेली ही देशातील सर्वात पहिली धोरणात्मक गुंतवणूक योजना आहे. या मंजुरीमुळे या योजनेअंतर्गत औद्योगिक भागीदारी सुरू करणारे आंध्र प्रदेश हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. कौशल भवन, नवी दिल्ली येथे भारत सरकारच्या कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय (MSDE) द्वारे आयोजित करण्यात आलेल्या 3 ऱ्या राष्ट्रीय सुकाणू समिती बैठकीत ही मंजुरी देण्यात आली. राज्य सरकारे आणि आघाडीच्या औद्योगिक कंपन्यांमधील भक्कम भागीदारीच्या माध्यमातून सरकारी ITI चे रूपांतर उद्योगांद्वारे व्यवस्थापित आणि उत्तम निकाल देणाऱ्या संस्थांमध्ये करणे, हे PM-SETU योजनेचे उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या दिशेने पडलेले हे पहिले ठोस पाऊल आहे. या बैठकीचे अध्यक्षपद कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाच्या सचिव श्रीमती देवश्री मुखर्जी यांनी भूषवले, तर या बैठकीला प्रशिक्षण महासंचालनालयाचे (DGT) महासंचालक श्री दिलीप कुमार यांच्यासह राष्ट्रीय सुकाणू समितीचे सदस्य उपस्थित होते. या चर्चेत क्षमता निर्माण आयोग (CBC), राष्ट्रीय व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण परिषद (NCVET), वाणिज्य आणि उद्योग मंत्रालय, अवजड उद्योग मंत्रालय, कामगार आणि रोजगार मंत्रालय, सहभागी राज्य सरकारे, तसेच हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेड (HAL), हिरो मोटोकॉर्प, बजाज ऑटो, ITC लिमिटेड आणि आर्सेलरमित्तल निप्पॉन स्टील (AM/NS) इंडिया, NAMTECH यांसारखे उद्योग क्षेत्रातील आघाडीचे नेते आणि आशियाई विकास बँक (ADB) व जागतिक बँक यांसारखे विकास भागीदार उपस्थित होते.

## मोफत मोतीबिंदू व नेत्र तपासणी शिबिर यशस्वीरित्या संपन्न

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : दि. २८ मे २०२६ रोजी पांगरी तर्फे ओतूर येथील समाज मंदिर येथे आयोजित करण्यात आलेल्या मोफत मोतीबिंदू व नेत्र तपासणी शिबिरास ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शिबिरामध्ये एकूण ६० नागरिकांनी सहभाग नोंदविला.तपासणी दरम्यान १० रुग्णांमध्ये मोतीबिंदूचे निदान करण्यात आले असून, त्यांच्या वर पुढील उपचारासाठी मार्गदर्शन करण्यात आले.तसेच ३० गरजू नागरिकांना मोफत व अल्प दरात चष्म्यांचे वाटप करण्यात आले. या शिबिरासाठी नेत्रतज्ञ डॉ.ओमकार सहाने तसेच संपर्क अधिकारी चेतन कोळी हे रोटरी क्लब निगडी यांच्या वतीने उपस्थित राहून मोलाचे सहकार्य केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे शिबिर यशस्वीरीत्या पार पडले. सदर शिबिराचा लाभ पांगरी तर्फे ओतूर येथील अनेक गरजू कुटुंबांना झाला.तसेच वैदवस्ती येथील कुटुंबांनी देखील या उपक्रमाचा लाभ घेतला. ग्रामीण भागातील नागरिकांना नेत्र तपासणी व आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरला.हा सामाजिक उपक्रम यशस्वी करण्यासाठी चाईल्ड फंड इंडियाचे सोशल वर्कर रवी शिंदे,बल्लाळवाडी गावचे माजी सरपंच सुधीर महाराज घोलप,वैशाली घोलप तसेच मंगल शिंदे यांनी विशेष प्रयत्न केले.समाजातील गरजू नागरिकांसाठी त्यांनी घेतलेले परिश्रम व सामाजिक बांधिलकी निश्चितच प्रेरणादायी आहे. या उपक्रमामुळे अनेक नागरिकांना नेत्र तपासणीचा लाभ मिळाला असून,ग्रामस्थां नी आयोजकांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

## सरपंच पोपटराव वारुळे यांना 'महाधन योद्धा पुरस्कार २०२६'



अहिल्यानगर (स. गांवकरी) : प्रगत शेती आणि वैज्ञानिक पीक पोषण पद्धतींमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांचा गौरव करण्याच्या उद्देशाने महाधन ॲग्रीटेक लिमिटेड (MAL) तर्फे अहिल्यानगर जिल्ह्यातील पोखर्डी तालुक्यातील सरपंच पोपटराव अंतु वारुळे यांना ऊस लागवडीतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल प्रतिष्ठेचा 'महाधन योद्धा पुरस्कार – 2026' प्रदान करण्यात आला. नंदनवन लॉन्स, न्यू टिळक रोड, अहिल्यानगर येथे आयोजित सत्कार समारंभात शेतकरी, ग्रामस्थ, कृषी क्षेत्रातील मान्यवर आणि कंपनीचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. महाधन योद्धा पुरस्काराद्वारे संतुलित पीक पोषण, वैज्ञानिक शेती पद्धती आणि कार्यक्षम अन्नद्रव्य व्यवस्थापनाच्या माध्यमातून उल्लेखनीय उत्पादनक्षमता साध्य करणाऱ्या प्रगत शेतकऱ्यांचा गौरव केला जातो. हा सन्मान पीक उत्पादनक्षमता आणि नफा वाढवण्यासाठी आधुनिक पीक पोषण उपाययोजनांचे वाढते महत्त्व अधोरेखित करतो. महाधन ॲग्रीटेक लिमिटेडच्या, 'महाधन' या प्रमुख ब्रँडअंतर्गत भारतीय शेतकऱ्यांना पिकानुसार पोषण उपाय उपलब्ध करून देण्यात अग्रणी राहिली आहे. प्रगत खत उत्पादने आणि शेतकरी-केंद्रित नवकल्पनांच्या माध्यमातून कंपनी विविध पिके आणि आर्थिकदृष्ट्या महत्त्वाच्या पिकांमध्ये शाश्वत कृषी विकासाला चालना देत आहे. कार्यक्रमात बोलताना पुरस्कार विजेते सरपंच पोपटराव म्हणाले "महाधनच्या क्रॉपटेक 9:24:24 मुळे माझ्या ऊस शेतीत उल्लेखनीय परिणाम मिळाले. उसाची वाढ अधिक मजबूत झाली, जाडी सुधारली, कांड्यामधील अंतर वाढले आणि फुटवे लवकर निघाले तसेच त्यांची वाढ अधिक जोमदार झाली. गाळपयोग्य उसांची संख्या, पिकातील एकसारखेपणा आणि एकूण उत्पादनक्षमता वाढल्याने माझे उत्पन्न वाढले आणि वैज्ञानिक शेती पद्धतीवरील माझा विश्वास अधिक दृढ झाला."

## ब्लेंडर्स प्राईड पॅकेज्ड ड्रिंक्स वॉटरने सादर केले आहे 'रिझर्व्हड एक्सपिरियन्सेस'




जयपूर (स. गांवकरी) : ब्लेंडर्स प्राईड पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरने 'ब्लेंडर्स प्राईड रिझर्व्हड एक्सपिरियन्सेस'चे अनावरण केले आहे, जे सर्व इंद्रियांच्या माध्यमातून - चवीचा कसा अनुभव घेतला जातो - याची पुनर्रचना करण्यासाठी तयार केलेले एक नवीन सांस्कृतिक व्यासपीठ आहे. अशा वेळी जेव्हा ग्राहक अधिक अर्थपूर्ण आणि उच्च दर्जाच्या अनुभवांकडे आकर्षित होत आहेत – जे त्यांच्या स्वतःच्या विकसित होत असलेल्या आवडीनिवडी आणि निवडी प्रतिबिंबित करतात, 'ब्लेंडर्स प्राईड रिझर्व्हड एक्सपिरियन्सेस' चवीला अधिक अर्थपूर्ण रूपात बदलून या बदलाला प्रतिसाद देत आहे. 'रिझर्व्हड इन एव्हरी सेन्स' या कल्पनेवर आधारित, हे व्यासपीठ चवीला एका बहु-आयामी प्रवासाच्या रूपात सादर करते - असा प्रवास ज्याचा केवळ आस्वादच घेतला जात नाही, तर तो पाहिला, ऐकला, स्पर्श केला आणि अनुभवला जाऊ शकतो.

# बापूराव कांबळे यांनी दिली उत्कृष्ट सेवा

**राजेंद्र दादा नागवडे**




श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)

वांगदरी गावचे भूषण तथा भारतीय डाक विभागातील कर्मचारी बापूराव कांबळे यांनी आपल्या सेवाकाळात वांगदरीसह परिसरातील गावांना अत्यंत प्रामाणिक व उत्कृष्ट सेवा दिली असल्याचे गौरवोद्गार सहकारमहर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन राजेंद्र दादा नागवडे यांनी काढले.

डाक विभागातून नुकतेच सेवानिवृत्त झालेल्या बापूराव कांबळे यांच्या सन्मानार्थ वांगदरी ग्रामस्थांच्या वतीने सपत्नीक नागरी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजेंद्र दादा नागवडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून माजी जिल्हा परिषद सदस्य बबन तात्या मदने, माजी पंचायत समिती सदस्य विठ्ठलराव नागवडे तसेच डाक अधिकारी अमित देशमुख उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाहूकाका राऊत व लालासाहेब नागवडे यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी कांबळे यांचे नातू शिवांश व नात शुभांगी महेश कांबळे यांनी भावनिक मनोगत व्यक्त करत आजोबांबद्दलच्या आठवणी आणि त्यांच्या कार्याची माहिती उपस्थितांसमोर मांडली.

यावेळी सरपंच तुषार नागवडे, संदीप नागवडे, भाऊ राऊत, पवार साहेब, ह.भ.प. कदम महाराज, सुभाष गोरे, आप्पासाहेब जगताप, विठ्ठलराव नागवडे, बबन मदने, अमित देशमुख, आनंदराव पवार आदींनी मनोगत व्यक्त करून बापूराव कांबळे यांच्या कार्याचा गौरव केला. सोहळ्यानिमित्त बापूराव कांबळे यांची घोड्यावरून डीजेच्या तालावर संपूर्ण वांगदरी गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. ग्रामदैवताचे दर्शन घेतल्यानंतर त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. यापूर्वी ह.भ.प. दत्तात्रय लाटे महाराज यांचे "पोस्ट, पोस्टमन, पिनकोड व पत्र" या विषयावरील विशेष प्रवचनही आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमास श्रीगोंदा कारखाना पोस्ट कार्यालयाचे पोस्टमास्तर स्वप्निल सूर्यवंशी, अहिल्यानगर सोसायटीचे चेअरमन भीमराज गिरमकर, टपाल कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष आनंदराव पवार, संतोष अवचरे, वाल्मीक जाधव, शरद अवचट, रोहिणी राऊत, संतोष शिंदे, बंडू रंधवे, पत्रकार नंदकुमार कुरुमकर, विनायक ससाणे, बाळासाहेब दळवी, पाराजी दरेकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

बापूराव कांबळे यांनी तब्बल ४२ वर्षे वांगदरी, हंगेवाडी, येळपणे, चिंबळे, मढेवडगाव, म्हातार पिंपरी, श्रीगोंदा कारखाना, लिंपणगाव, काष्टी आदी भागात डाक विभागाची निष्कलंक सेवा बजावली. सेवाकाळात त्यांनी दारूबंदी, नशामुक्ती, वृक्षारोपण आणि स्वच्छता यांसारख्या सामाजिक उपक्रमांमध्येही सक्रिय सहभाग घेतला. सत्काराला उत्तर देताना भावूक झालेल्या बापूराव कांबळे म्हणाले, "मागील ४२ वर्षे मी डाक विभागाची प्रामाणिक सेवा केली.

त्याचबरोबर सामाजिक कार्यातही योगदान देण्याचा प्रयत्न केला असून, यापुढेही समाजसेवेचे कार्य सुरू ठेवणार आहे." अध्यक्षीय भाषणात राजेंद्र दादा नागवडे म्हणाले, "बापूराव कांबळे यांनी केलेली निष्कलंक सेवा अत्यंत कौतुकास्पद आहे. ते खऱ्या अर्थाने कर्मयोगी आहेत."

यावेळी हसन शेख, महेश कांबळे, भालचंद्र राऊत, केशव पवार, निलेश कांबळे, माजी पोस्टमास्तर विजय ठोकळ तसेच वांगदरी पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लालासाहेब नागवडे यांनी केले.

## 'मालिका संपतेय, पण गोष्ट सुरूच राहणार!'

नारायणगाव : (स. गांवकरी)

'मी सावित्रीबाई जोतिराव फुले' ही लोकप्रिय मालिका लवकरच प्रेक्षकांचा निरोप घेणार असल्याच्या सोशल मिडियावर चर्चा सुरु होत्या. या चर्चांना पूर्णविराम देत मालिकेतील महात्मा जोतिराव फुलेंची भूमिका साकारणारे अभिनेते डॉ. अमोल कोल्हे यांनी सोशल मीडियावर केलेल्या सूचक ट्विटमुळे मालिकेच्या समाप्तीबाबत सुरू असलेल्या चर्चांना दुजोरा मिळाला आहे. "मालिका संपतेय, पण गोष्ट सुरूच राहणार!" असे ट्विट करत डॉ. अमोल कोल्हे यांनी काही दिवसांत एखादी महत्त्वपूर्ण घोषणा करण्याचे संकेत दिले आहेत. त्यांच्या या पोस्टमुळे प्रेक्षक आणि चाहत्यांमध्ये विविध तर्क-वितर्कांना उधाण आले असून, नेमकी कोणती नवी संकल्पना किंवा उपक्रम समोर येणार याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. दरम्यान, मालिका बंद होण्यामागील कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. याबाबत वाहिनी किंवा निर्मात्यांकडून अधिकृत भूमिका जाहीर करण्यात आलेली नसली, तरी सोशल मीडियावर यासंदर्भात मोठ्या प्रमाणात चर्चा रंगत आहेत. महात्मा जोतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्यावर आधारित या मालिकेला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला होता.




डॉ. अमोल कोल्हे यांचे सूचक ट्विट

## चाळीस वर्षांनी दहावीचा स्नेह मेळावा संपन्न

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)



सरस्वती विद्यालय उदापुर दहावी १९८७/८८ च्या बॅचचा स्नेहमेळावा बनकरफाटा उदापुर येथील "मायभूमी रिसॉर्ट"मध्ये ३१ मे रोजी मोठ्या थाटामाटात संपन्न झाला. या स्नेह मेळाव्या च्या निमित्ताने कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने करून दीप प्रज्वलन आणि प्रतिमा पूजनाने संपन्न झाले. तसेच काही मित्र मंडळी हयात नाही त्यांना दोन मिनिटे उभे राहून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.तत्पूर्वी सर्व वर्ग मित्र आणि मैत्रिणी यांचे वाजत गाजत रिसॉर्ट मध्ये ग्रँड पध्दतीने प्रवेश करून मिरवणुकीत स्वागत करण्यात आले.या मेळाव्याचे आयोजन व नियोजन विनायक फाकटकर रविंद्र भोर,मनीषा ढमाले-डुंबरे, आशा कुलवडे-मोजाड,सुशीला नवले-डुंबरे, शैलेश कुलकर्णी, यांनी केले. त्यानंतर सर्व उपस्थित मान्यवरांचा फेटा बांधून सन्मान करण्यात आला. त्यानंतर माजी विद्यार्थी यांचा देखील सन्मान करण्यात आला.जवळजवळ ४० वर्षांनी सर्व मित्रमंडळी एकमेकांना भेटले,भेटल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावरती वेगळाच आनंद दिसत होता.४० वर्षांनी भेटलेले मित्रमंडळी एकमेकांना ओळखत सुद्धा नव्हते नाव सांगितल्यानंतर आश्चर्यचकित होऊन एकमेकांकडे पाहत होते. या सर्व विद्यार्थ्यांचे वय ५३ ते ५७ च्या दरम्यान झाले होते परंतु माझा वर्गमित्र मैत्रीण ४० वर्षांनी मला भेटला आणि हृदयामध्ये एक आपुलकी व प्रेम निर्माण झाले. सर्वांनी नाष्टा करून सभागृहात हजेरी लावली यावेळी स्वतःची ओळख व परिचय करून प्रत्येकाने आपल्या मनोगतातून आपली येथे माहिती दिली शून्यातून विश्व निर्माण करावं यासारख्या मित्रांनी खूप अपार कष्ट करून कोणी व्यवसायाच्या माध्यमातून तर कोणी नोकरीच्या तर कोणी शेतीच्या माध्यमातून आपला संसार व्यवस्थितपणे चालवला असून सर्वजण आनंदित आणि प्रफुल्लित दिसत होते. अध्यक्षीय भाषणातून रविंद्र भोर यांनी सर्व वर्गमित्रांना व मैत्रणींना येणाऱ्या काळात अनेक समस्यांबाबत जागृत केले आणि आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी आणि मोबाईल चा कमीत कमी वापर करावा हा मोठा संदेश दिला त्याचप्रमाणे यावेळी ह.भ.प.गणेश महाराज शिंदे यांनी आपण आहार विहार व्यवस्थित घ्यावा व आपल्या नातवांना चांगले सुसंस्कारित बनवावं असा संदेश दिला. या वेळी मनीषा ढमाले,जयश्री अमूप,संगिता निमकर,संगिता शिंदे,सुशीला वऱ्हाडी,शोभा चौधरी,कल्पना बुगदे,सुधा शिंदे,सुनीता शिंदे, हरणाबाई अमूप,बेबी शिंदे, शैलेश कुलकर्णी,सतीश कुलकर्णी,रेवणनाथ शिंदे, राणूजी शिंदे,शंकर भले,संजय शिंदे,तुकाराम कुलवडे,ज्ञानेश्वर कुलवडे,बाळासो माळवे, शांताराम शिंदे,हनुमंत अमूप, कैलास शिंदे यांनी आपले मनोगत व्यक्त केली. दुपारी सर्वांनी वन भोजन केले त्यानंतर तरण तलाव मध्ये पोहण्याचा आनंद घेतला त्यानंतर संगीत जलसा करून आमराई मध्ये संस्मरणीय आठवणींना उजाळा ,गप्पागोष्टी चुटकुले,विनोद,अंताक्षरी यामध्ये सर्व मंत्रमुग्ध झाले होते की सूर्यदेव अस्ताला गेला याचे भान देखील राहिले नव्हते,अशा प्रकारे सर्वांनीच या स्नेह मेळाव्याचा आनंद घेतला.शेवटी चहा आणि कांदाभजी यांचा आस्वाद घेतला खूपच सुंदर मेळावा पार पडला.मेळाव्याची सांगता सर्वांनी वंदे मातरम गायन करून केली.

## सेवानिवृत्त भूमिपुत्रांचा सन्मान सोहळा उत्साहात संपन्न

### रवींद्र चव्हाण मित्र मंडळाचा स्तुत्य उपक्रम; सन्मानार्थ आंब्याच्या रोपांचे वाटप

श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)



श्रीगोंदा तालुक्यातील धार्मिक व सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या लोणी व्यंकनाथ येथे १ जून रोजी गावातील शासकीय, निमशासकीय तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय सेवा बजावून सेवानिवृत्त झालेल्या भूमिपुत्रांचा आणि याच दिवशी वाढदिवस असलेल्या ग्रामस्थांचा सन्मान सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. सालाबादप्रमाणे रवींद्र चव्हाण व भरत काकडे मित्र मंडळाच्या वतीने या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. गावातील विविध क्षेत्रांत उत्कृष्ट सेवा देऊन निवृत्त झालेल्या व्यक्तींना गौरविण्याच्या या उपक्रमामुळे सर्वधर्मसमभाव, एकात्मता आणि सामाजिक बांधिलकीचा प्रेरणादायी संदेश देण्यात आला. यावेळी बोलताना रवींद्र चव्हाण यांनी सेवानिवृत्तीनंतर प्रत्येकाने निसर्ग संवर्धनासाठी पुढाकार घेत आंब्याचे झाड लावावे, असे आवाहन केले. त्यानुसार सन्मानित मान्यवरांना स्मृतिचिन्हासह आंब्याचे रोप भेट देऊन त्यांचा आदरपूर्वक गौरव करण्यात आला. या कार्यक्रमास सरपंच सौ. मनीषाताई नहाटा, उपसरपंच चित्राताई पवार, पंचायत समितीचे माजी उपसभापती गणपतराव काकडे, संस्थेचे चेअरमन बाळासाहेब थोरात, नागवडे कारखान्याचे संचालक डी. आर. (आबा) काकडे, माजी चेअरमन लालासाहेब काकडे, युवा उद्योजक लखनशेठ नगरे, नामदेव जठार, ॲड. बाळासाहेब काकडे, एन. टी. शेलार सर, भगवानराव गोरखे, सर सहारा संस्थेचे संतोष भोसले, ह.भ.प. भरत काकडे महाराज, रवींद्र चव्हाण, संभाजी जावळे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक रामदास साळवे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे कौतुक करत सन्मानित भूमिपुत्रांना दीर्घायुष्याच्या शुभेच्छा दिल्या. तसेच सेवानिवृत्तीनंतरही गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आपले अनुभव व मार्गदर्शन समाजहितासाठी उपयोगी पडावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमास ग्रामपंचायत व सेवा संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, युवक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एन. टी. शेलार सर यांनी केले, तर रवींद्र चव्हाण यांनी आभार प्रदर्शन केले.

## ६७ वर्षीय महिलेची तीव्र चेहऱ्याच्या वेदनांपासून सुटका

पुणे : (स. गांवकरी)



गेल्या पाच वर्षांपासून चेहऱ्यात तीव्र वेदना सहन करणाऱ्या ६७ वर्षीय महिलेला मणिपाल हॉस्पिटल, खराडी, पुणे येथे करण्यात आलेल्या प्रगत मेंदू शस्त्रक्रियेमुळे अखेर मोठा दिलासा मिळाला आहे. संबंधित महिला ट्रायजेमिनल न्युराल्जिया या न्यूरोलॉजिकल आजाराने त्रस्त होती. या आजारामध्ये चेहऱ्यावर अचानक विजेचा झटका बसल्यासारख्या तीव्र आणि असह्य वेदना होतात. कालांतराने या वेदना इतक्या वाढल्या की खाणे, बोलणे, दात घासणे आणि चेहरा धुणे यांसारख्या दैनंदिन साध्या गोष्टीदेखील तिच्यासाठी अत्यंत कठीण बनल्या होत्या. दीर्घकाळ औषधोपचार सुरू असूनही तिची लक्षणे वाढतच गेली आणि त्यामुळे तिच्या दैनंदिन आयुष्याबरोबरच मानसिक स्वास्थ्यावरही मोठा परिणाम झाला होता. सविस्तर वैद्यकीय तपासणी आणि प्रगत न्यूरोइमेजिंगनंतर डॉक्टरांना असे आढळून आले की सुपीरियर सेरेबेलर आर्टरी नावाची रक्तवाहिनी ट्रायजेमिनल नर्व्हवर दबाव आणत होती आणि त्यामुळे तीव्र वेदनांचे झटके येत होते. त्यानंतर रुग्णाला मायक्रोव्हॅस्क्युलर डीकंप्रेशन (एमव्हीडी) ही विशेष शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला देण्यात आला. ट्रायजेमिनल न्युराल्जियासाठी ही शस्त्रक्रिया अत्यंत प्रभावी आणि मान्यताप्राप्त उपचारपद्धती मानली जाते.

# नैसर्गिक आपत्तींच्या पार्श्वभूमीवर जिल्हा आरोग्य विभाग सज्ज

### पूर, अतिवृष्टी व साथीच्या रोगांवर नियंत्रणासाठी विशेष कृती आराखडा तयार



ठाणे : (स. गांवकरी)

आगामी पावसाळी हंगामात संभाव्य नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तींचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी जिल्हा आरोग्य विभागाने सन २०२६-२७ साठी सविस्तर आपत्ती व्यवस्थापन कृती आराखडा तयार केला आहे. पूरस्थिती, अतिवृष्टी, साथीचे रोग, जलजन्य आजार तसेच आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना तात्काळ आरोग्य सेवा उपलब्ध व्हाव्यात यासाठी नियोजन करण्यात आले आहे. आरोग्य विभागामार्फत जिल्हास्तर, तालुकास्तर तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर नियंत्रण कक्ष, भरारी पथके आणि विशेष वैद्यकीय पथके कार्यान्वित करण्यात आली आहेत. आपत्तीच्या काळात तातडीने प्रतिसाद देण्यासाठी जिल्ह्यात एकूण तीन RRT पथके, वाहन व्यवस्थेसह २४ तास सज्ज ठेवण्यात आली असून, त्यामध्ये अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याशिवाय डॉक्टरांचे विशेष प्रतिसाद पथकही कार्यरत करण्यात आले आहे. आपत्कालीन परिस्थितीत समन्वय राखण्यासाठी जिल्हा आरोग्य विभागात २४ तास नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आला आहे. तसेच प्रत्येक तालुका व प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर स्वतंत्र नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात आले आहेत. सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना मुख्यालयात उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडू नये, असे निर्देश देण्यात आले आहेत.

साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी गावस्तरावर नियमित सर्वेक्षण करण्यात येत आहे. ग्रामपंचायती मार्फत जलजन्य आजार टाळण्यासाठी नागरिकांना पाणी उकळून व गाळून पिण्याबाबत जनजागृती करण्यात येत असून, पिण्याच्या पाण्याचे नमुने नियमितपणे तपासणीसाठी प्रयोगशाळांकडे पाठविण्यात येणार आहेत. पाणी शुद्धीकरण आणि जलस्रोतांची स्वच्छता यावर विशेष भर देण्यात आला आहे.अतिसार, विषमज्वर, कावीळ, मलेरिया, डेंग्यू, लेप्टोस्पायरोसिस यांसारख्या पावसाळ्यात साथीच्या उद्भवणाऱ्या आजारांच्या नियंत्रणासाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांना विशेष सूचना देण्यात आल्या आहेत. संभाव्य रुग्णवाढ लक्षात घेऊन आवश्यक औषधसाठा, इंजेक्शन्स, आपत्कालीन साहित्य तसेच वैद्यकीय उपकरणे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये साथ नियंत्रण कक्ष तयार ठेवण्याचे निर्देश देण्यात आले असून, रुग्णवाहिका, वैद्यकीय पथके, प्रथमोपचार साहित्य आणि मेडिसिन किट सज्ज ठेवण्यात आले आहेत. पूरस्थिती किंवा आपत्तीच्या काळात प्रभावित भागांमध्ये तात्काळ आरोग्य सेवा पोहोचविण्यासाठी वाहन व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे. आपत्ती काळातील परिस्थितीचा दैनंदिन आढावा घेण्यासाठी तालुका व प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावरून नियमित अहवाल जिल्हास्तरावर सादर करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच गर्भवती माता, बालके, ज्येष्ठ नागरिक आणि विशेष गरज असलेल्या नागरिकांच्या आरोग्य सुरक्षेसाठी स्वतंत्र नियोजन करण्यात आले आहे.

# शिक्षणासाठी समाजाने एकत्र यावे – नानजीभाई ठक्कर

## फतेहवाडी येथे कन्या हॉस्टेलचे भूमिपूजन

अहमदाबाद : (स. गांवकरी)

शिक्षण विकास सेवा ट्रस्टच्या वतीने फतेहवाडी, सरखेज (अहमदाबाद) येथे ८८१ चौरसवार जागेवर उभारण्यात येणाऱ्या कन्या हॉस्टेलच्या इमारतीचे भूमिपूजन समाजसेवक श्री नानजीभाई ठक्कर यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. मुलींच्या शिक्षणासाठी आणि सुरक्षित निवासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या या प्रकल्पामुळे परिसरातील विद्यार्थिनींना मोठा आधार मिळणार आहे.

या कार्यक्रमाला गुजरात सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता, प्राथमिक, माध्यमिक व प्रौढ शिक्षण तसेच उच्च व तांत्रिक शिक्षण विभागाचे कॅबिनेट मंत्री डॉ. प्रद्युमन वाजा यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. याशिवाय श्री अमितभाई ठक्कर यांच्यासह अनेक मान्यवरांनी कार्यक्रमाला उपस्थिती लावली. यावेळी श्री रमेश चौहान, श्रीमती मयुरी सोनी, माजी खासदार डॉ. किरीटभाई सोलंकी, श्री रमेशभाई धाडूक, टी. डी. पटेल, माजी आमदार कनतीभाई लाकूम, श्री विक्रमभाई चौहान, माजी जिल्हा सदस्य श्री कल्पेश सोलंकी, श्री मुकेशभाई डाभी, श्री रामभाई भरवाड, श्री मिहिरभाई शाह, श्री प्रविणभाई पटोळावाला, संस्थापक श्री अर्जुनभाई गोहिल, श्री हिराभाई वहेळा, श्री संजीव राठोड, श्री दिनेशभाई डाभी तसेच ट्रस्टचे विश्वस्त आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.





भूमिपूजनानंतर मार्गदर्शन करताना श्री नानजीभाई ठक्कर यांनी शिक्षण हे समाजाच्या प्रगतीचे सर्वात प्रभावी साधन असल्याचे सांगितले. ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील मुलींना सुरक्षित निवास, संस्कारक्षम वातावरण आणि उच्च शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने कन्या हॉस्टेलची उभारणी करण्यात येत असल्याचे त्यांनी नमूद केले.

ते म्हणाले की, हे ब्राह्मण समाजासाठी उभारले जाणारे छात्रालय असून येथे विद्यार्थिनींना शैक्षणिक सुविधांसह संस्कार, प्रामाणिकपणा आणि नैतिक मूल्यांचे शिक्षण मिळेल. प्रत्येक महाविद्यालयासाठी आवश्यक असणाऱ्या सुविधा या हॉस्टेलमध्ये उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. समाजाच्या सहकार्यामुळेच अशा प्रकल्पांना गती मिळते, असेही त्यांनी सांगितले. आपल्या भाषणात त्यांनी समाजबांधवांना आवाहन करताना सांगितले की, समाजात देणगीदारांची कमतरता नसते, मात्र योग्य कार्यासाठी निधीचा उपयोग करणाऱ्यांची आवश्यकता असते. या कन्या हॉस्टेलसाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच युवकांनी कोणत्याही प्रकारच्या व्यसनापासून दूर राहावे, असे आवाहन करताना त्यांनी व्यसनमुक्त समाजाची गरज अधोरेखित केली.

कार्यक्रमात बोलताना ट्रस्टचे संस्थापक श्री अर्जुनभाई गोहिल यांनी श्री नानजीभाई ठक्कर यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि सेवाभावी कार्याचा गौरव केला. त्यांनी सांगितले की, श्री ठक्कर यांनी शिक्षण क्षेत्रात अमूल्य योगदान दिले असून त्यांच्या विविध शैक्षणिक संस्था, महाविद्यालये, दवाखाने आणि पशुवैद्यकीय सेवा केंद्रांमधून लाखो विद्यार्थ्यांनी शिक्षण घेऊन आज विविध उच्च पदांवर यश मिळविले आहे.

श्री ठक्कर हे यशस्वी उद्योगपती, शिक्षणतज्ज्ञ आणि दानशूर व्यक्तिमत्त्व म्हणून संपूर्ण देशात ओळखले जातात. त्यांच्या संस्थांमध्ये हजारो शिक्षक आणि प्राध्यापक कार्यरत असून शिक्षणाचा व्यापक प्रसार करण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील असल्याचे श्री गोहिल यांनी नमूद केले.

यावेळी श्री अर्जुनभाई गोहिल यांनी श्री नानजीभाई ठक्कर यांचा पुष्पहार, शाल आणि स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला. तसेच कन्या शिक्षणासाठी योगदान देणाऱ्या सर्व दानशूर व्यक्ती आणि कार्यकर्त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांचे आभार मानण्यात आले. कन्या शिक्षणासाठी उभारण्यात येणारा हा प्रकल्प समाजासाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

## थोडक्यात पण महत्वाचे



### पुरुषांचा विद्वेष करणे म्हणजेच स्त्रीवाद नव्हे : रमणी सोनवणे

पुणे (स. गांवकरी) : पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये मुजोर असलेल्या सत्ता आणि संस्कृतीने स्त्रीला विविध नात्यांच्या आणि परंपरांच्या चौकटीत अडकवून टाकले असले तरी देखील केवळ विद्वेष करणे म्हणजे स्त्रीवाद नाही, असे प्रतिपादन विद्रोही कवयित्री आणि पहिल्या रमाई साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष रमणी सोनवणे यांनी केले. महामाता रमाबाई भीमराव आंबेडकर राष्ट्रीय स्मारक यांच्या वतीने रमाबाई आंबेडकर यांच्या स्मृतिदिनाच्या आणि राष्ट्रीय स्मारकाच्या आठव्या वर्धापन दिनानिमित्त प्रथमच आयोजित करण्यात माता रमाई साहित्य संमेलनाच्या उद्‍घाटन प्रसंगी संमेलनाध्यक्ष म्हणून रमणी सोनवणे बोलत होत्या. संमेलनाच्या उद्‍घाटन प्रसंगी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष श्रीपाल सबनीस, रंगत संगत प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. प्रमोद आडकर, पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त ज्ञानेश्वर मोळक, साहित्य आणि संस्कृती क्षेत्रामध्ये कार्य करणारे सचिन इटकर, माजी नगरसेविका लता राजगुरू, संमेलनाचे मुख्य आयोजक विठ्ठल गायकवाड, ॲड नितीन घोडके, प्रशांत खिस्ती आदी मान्यवर उपस्थित होते. भारतीय संविधानाने आपली बौद्धिक भूक भागवण्याचे कार्य केले. त्याचप्रमाणे एक स्त्री म्हणून समाजात समानतेचे स्थान देण्याचे कार्य केले. संविधानाच्या अंमलबजावणीपूर्वी समाजामध्ये पुरुष सत्ता संस्कृती मजूर होती. स्त्रीला नात्यांच्या आणि जबाबदारीच्या चौकटीत गुरफटून टाकण्यात आले होते. मात्र, केवळ पुरुषांना विरोध करणे म्हणजेच स्त्रीवाद नसून स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क आणि जबाबदाऱ्या प्रधान करणे हे समाजाच्या दृष्टीने महत्त्वाचे असल्याचे रमणी सोनवणे यांनी यावेळी नमूद केले.



### हातभट्टीची दारू कायमस्वरूपी हद्दपार होणे गरजेचे - रामदास आठवले

पुणे (स. गांवकरी) : केवळ राज्यातच नव्हे तर देशभरात सर्रास विक्री जाणारी हातभट्टीची दारू अत्यंत घातक असून ती कायमस्वरूपी हद्दपार करण्यासाठी पोलिसांनी कठोर पावले उचलावी, अशी सूचना केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केली. पुणे आणि पिंपरी चिंचवड या ठिकाणी रसायनयुक्त विषारी दारू घेतल्यामुळे तब्बल 22 जणांचा मृत्यू झाला आहे. आठवले यांनी काही मृतांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. मुलांच्या कुटुंबीयांना राज्य सरकारकडून पाच लाख रुपये तर महापालिकेकडून एक लाख रुपये मदत देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे मृतांच्या वारसांना नोकरी मिळावी अशी कुटुंबीयांची मागणी असून त्यादृष्टीने महापालिका आयुक्त चर्चा केल्याचेही आठवले यांनी सांगितले. यानंतर पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत आठवले बोलत होते. यावेळी आरपीआयचे पुणे शहराध्यक्ष संजय सोनवणे, प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, उपमहापौर परशुराम वाडेकर, नगरसेवक निलेश आल्हट, महिपाल वाघमारे, शाम सदाफुले, मोहन जगताप, अशोक गायकवाड, सलीम सय्यद, बसवराज गायकवाड, उमेश कांबळे, संदीप धांडोरे, सोनू निकाळजे, हबीब सय्यद, सुनील गवळी आदी उपस्थित होते.

### शाह खंडेलवाल जैन अँड असोसिएट्सचा ६० वर्षांचा गौरवशाली प्रवास



पुणे (स. गांवकरी) : पुण्यातील प्रतिष्ठित चार्टर्ड अकाउंटंट फर्म शाह खंडेलवाल जैन अँड असोसिएट्स (SKJ) ने आपल्या स्थापनेची ६० वर्षे पूर्ण केल्याचा ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. या निमित्ताने पुण्यातील एका आलिशान हॉटेलमध्ये दोन दिवस चाललेल्या ‘रीकनेक्ट २०२६’ या विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला ग्राहक, माजी विद्यार्थी (अलुम्नी) आणि हितचिंतकांसह १,००० हून अधिक मान्यवर उपस्थित होते. सन १९६६ मध्ये दूरदृष्टी लाभलेले स्वर्गीय सी. व्ही. खंडेलवाल यांनी या संस्थेची स्थापना केली. त्या काळात पुणे हे ‘पेन्शनर्स पॅराडाईज’ म्हणून ओळखले जात होते. गेल्या सहा दशकांत संस्थेने सातत्यपूर्ण प्रगती करत व्यावसायिक उत्कृष्टता, विश्वासार्हता आणि ग्राहककेंद्री सेवा यांमुळे स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. आज संस्थेचे मुख्यालय पुण्यात असून औरंगाबाद, इंदूर आणि बागलकोट येथे नेटवर्क कार्यालये कार्यरत आहेत. या विशेष प्रसंगी बोलताना संस्थेचे भागीदार आशीष खंडेलवाल म्हणाले, “आमचे काही ग्राहक गेली जवळपास सहा दशके आमच्याशी जोडलेले आहेत. ग्राहकांनी SKJ वर दाखविलेला विश्वासच आम्हाला सातत्याने उत्कृष्टतेकडे वाटचाल करण्यासाठी प्रेरणा देतो.”

## आरक्षण उपवर्गीकरणाचा हट्ट मातंग नेत्यांनी सोडावा

पुणे : (स. गांवकरी)

"अनुसूचित जातीच्या (SC) आरक्षणातील उपवर्गीकरणामुळे दलित आणि वंचित घटकांमध्ये अंतर्गत वाद निर्माण होऊन समाजाचे अतोनात नुकसान होणार आहे. त्यामुळे मातंग समाजाच्या नेत्यांनी आरक्षणाच्या उपवर्गीकरणाचा आपला हट्ट तातडीने सोडून द्यावा," असे परखड आवाहन आरक्षण उपवर्गीकरण पुनर्विलोकन समितीचे संयोजक राहुल डंबाळे यांनी येथे केले आहे. पुण्यात आयोजित बैठकीत ते बोलत होते. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर आरक्षणाच्या उपवर्गीकरणाबाबत देशभरात विविध मतप्रवाह समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर राहुल डंबाळे यांनी आपली आणि समितीची सविस्तर भूमिका स्पष्ट केली. यावेळी बोलताना राहुल डंबाळे म्हणाले की, "आरक्षणाच्या उपवर्गीकरणासाठी सातत्याने 'क्रांतीगुरू लहुजी वस्ताद साळवे आयोगाचा' हवाला दिला जातो. परंतु, हा आयोग पूर्णतः एकतर्फी आणि राजकीय हेतूने प्रेरित होऊन, चुकीच्या माहितीच्या आधारे तयार करण्यात आला होता हे एव्हाना स्पष्ट झाले आहे. वस्तुस्थिती ही आहे की, गेल्या वीस वर्षांत देशातील किंवा राज्यातील कोणत्याही अधिकृत समितीने अथवा आयोगाने मातंग समाजाला 'अप्रगत' ठरवलेले नाही. असे असताना केवळ राजकीय स्वार्थासाठी हा चुकीचा अहवाल पुढे केला जात आहे."



- उपवर्गीकरणामुळे समाजाचे अतोनात नुकसानच होणार: राहुल डंबाळे

## बी. टी. मखरे यांचे शैक्षणिक कार्य अतुलनीय – एकनाथ आळेकर

श्रीगोंदा : (स. गांवकरी)

श्रीगोंदा येथील शारदा विद्या निकेतनच्या मुरलीधर आण्णा होनराव व एन. एस. गुळवे ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य बी. टी. मखरे यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त आयोजित कार्यक्रमात त्यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव करण्यात आला. संस्थेचे उपाध्यक्ष तथा सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याचे संचालक एकनाथ आळेकर यांनी मखरे सरांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान अतुलनीय असल्याचे गौरवोद्गार काढले. आळेकर म्हणाले की, संस्थेच्या जडणघडणीत प्राचार्य मखरे यांचा सिंहाचा वाटा आहे. आपल्या दीर्घ सेवाकाळात त्यांनी अत्यंत प्रामाणिकपणे व निष्ठेने जबाबदाऱ्या पार पाडल्या. त्यांच्या कार्यकाळावर कोणताही डाग लागलेला नाही. सेवानिवृत्तीनंतरही ते संस्थेसाठी काही वेळ देतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. संस्थेचे खजिनदार प्रा. ज्ञानदेव गायकवाड यांनी सांगितले की, संस्थेच्या प्रगतीत मखरे सरांचे मोठे योगदान असून त्यांनी सर्वांना कुटुंबाप्रमाणे एकत्र ठेवत शाळेला गुणवत्तेच्या बाबतीत अग्रस्थानी नेले.



संस्था विश्वस्त प्रा. डॉ. बाळासाहेब बळे यांनी सांगितले की, संस्थेचे अध्यक्ष यांच्या खांद्याला खांदा लावून मखरे सरांनी संस्थेच्या विकासासाठी भरीव कामगिरी केली. भविष्यातही त्यांचे मार्गदर्शन संस्थेला लाभेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. प्रा. सचिन आगळे यांनी मखरे सरांच्या कार्यतत्परतेचा उल्लेख करताना सांगितले की, महाविद्यालयाच्या कामासाठी त्यांनी वेळेचे बंधन कधीच मानले नाही. त्यामुळे त्यांची सेवानिवृत्ती ही संस्थेसाठी मोठी हानी असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

ज्येष्ठ पत्रकार प्रा. राम सोनवणे यांनी महाविद्यालयातील विद्यार्थी संख्या वाढविण्यासाठी मखरे सरांनी केलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले. मुख्याध्यापिका संगीता वनपुरे यांनी सांगितले की, मखरे सरांनी बालवाडीपासून ते ज्युनिअर कॉलेजपर्यंत सर्व घटकांना सोबत घेत संस्थेचा गुणवत्तेचा आलेख सातत्याने उंचावत ठेवला. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी प्राचार्य मखरे यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी संस्था सचिव डॉ. अशोक खेंडके, विश्वस्त अशोक होनराव, प्रा. अदिनाथ लोहकरे, प्रभाकर शिंदे, मुख्याध्यापिका संगीता वनपुरे, महाविद्यालय विभाग प्रमुख प्रा. कांचन कुरूमकर आदी उपस्थित होते. दरम्यान, नयना वाळके यांनी प्राचार्यपदाचा पदभार स्वीकारला. कार्यक्रमास शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> "एका बाजूला प्राचार्यपदाची जबाबदारी स्वीकारल्याचा आनंद आहे; मात्र ३० वर्षे ज्ञानदानाची सेवा करून सेवानिवृत्त होणाऱ्या सहकारी प्राचार्यांचा निरोप घेताना दुःखही तितकेच आहे. जड अंतःकरणाने मी हा पदभार स्वीकारला."
> — **प्राचार्या नयना वाळके, शारदा विद्या निकेतन, श्रीगोंदा**

## दत्तात्रय खळदकर यांच्या कार्याचा गौरव; सेवा संस्थांकडून सत्कार

श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)

लिंपणगाव, जंगलेवाडी आणि ज्योतिर्लिंग सेवा संस्थांचे सचिव म्हणून प्रदीर्घ काळ कार्यरत राहिल्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या दत्तात्रय खळदकर यांचा तीनही सेवा संस्थांच्या वतीने गौरव समारंभ आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात बोलताना नागवडे साखर कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्रदादा नागवडे यांनी खळदकर यांनी शेतकरी व सभासदांचे हित डोळ्यासमोर ठेवून सेवा संस्थांचा उत्कृष्ट व लोकाभिमुख कारभार केला, असे गौरवोद्गार काढले.



संस्थेच्या कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजेंद्रदादा नागवडे होते. व्यासपीठावर ज्योतिर्लिंग सेवा संस्थेचे चेअरमन झुंबरराव रोडे, नागवडे कारखान्याच्या माजी संचालिका अंजली रोडे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना नागवडे म्हणाले की, खळदकर यांनी स्वर्गीय बापूंच्या विचारधारेतून आणि स्वर्गीय गणपतराव जंगले यांच्या मार्गदर्शनाखाली सहकार क्षेत्रात कार्य सुरू केले. सेवानिवृत्त सचिव तरटे भाऊसाहेब यांच्याकडून त्यांना प्रेरणा मिळाली. संस्थांचा कारभार पारदर्शक व लोकाभिमुख करण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. तालुक्यातील सुमारे १७५ सेवा संस्थांच्या सचिवांना मार्गदर्शन करताना सभासद शेतकऱ्यांना कर्ज व विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर शेतकरी व सभासदांना त्यांच्या कार्याची उणीव भासेल, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमात नागवडे कारखान्याचे संचालक सुभाषराव शिंदे, विठ्ठलराव जंगले, संस्थेचे चेअरमन सुनील सूर्यवंशी, शेतकरी संघटनेचे नेते अनिल घनवट, ॲड. अशोक रोडे, निळकंठ जंगले, काका रोडे, गुंड सर आदींनी खळदकर यांच्या कार्याचा गौरव केला. सत्काराला उत्तर देताना दत्तात्रय खळदकर म्हणाले की, स्वर्गीय गणपतराव जंगले यांच्या कृपाशीर्वादाने १९८७ मध्ये लिंपणगाव व जंगलेवाडी या दोन संस्थांमध्ये लोकल सचिव म्हणून काम करण्याची संधी मिळाली. पुढे तरटे भाऊसाहेब यांनी माझ्यावर विश्वास ठेवला आणि नागवडे कारखान्याचे संस्थापक स्वर्गीय बापूंनी तालुक्यातील सेवा संस्थांची जबाबदारी सोपवली. ही जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडण्याचा प्रयत्न केला. सेवाकाळात सभासद व शेतकऱ्यांना शक्य तेवढी मदत करण्याचे ध्येय ठेवले, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दादासाहेब कुरुमकर यांनी केले, तर आभार संचालक विठ्ठल जंगले यांनी मानले. यावेळी तीनही संस्थांचे पदाधिकारी, संचालक, सभासद आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ४ लाखांहून अधिक भारतीयांची योगाकडे वाटचाल

नवी दिल्ली : (स. गांवकरी)

योगाला दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवण्यासाठी मोरारजी देसाई राष्ट्रीय योग संस्था (MDNIY), आयुष मंत्रालय आणि हॅबिल्ड यांनी महत्त्वपूर्ण भागीदारी केली आहे. या सहयोगाअंतर्गत आंतरराष्ट्रीय योग दिन २०२६च्या पार्श्वभूमीवर देशव्यापी डिजिटल योग अभियान सुरू करण्यात आले असून, लाखो नागरिकांना नियमित योगाभ्यासासाठी प्रोत्साहित केले जात आहे. MDNIY आणि भारतातील पहिले हॅबिट-बिल्डिंग प्लॅटफॉर्म असलेल्या हॅबिल्ड यांच्यात नुकताच सामंजस्य करार (MoU) झाला आहे. या कराराअंतर्गत सुरू करण्यात आलेल्या ‘योगा ३६५’ उपक्रमाला देश-विदेशातून मोठा प्रतिसाद मिळत आहे. मार्च २०२६ मध्ये सुरू झालेल्या या मोहिमेचा उद्देश नागरिकांना सलग १०० दिवस दररोज योगाभ्यास करण्यासाठी प्रेरित करणे हा आहे. या उपक्रमात आतापर्यंत ४ लाखांहून अधिक सक्रिय सहभागी झाले असून, ते १३० पेक्षा जास्त देशांमधून तसेच भारतातील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधून या अभियानात सहभागी झाले आहेत. २१ जून, आंतरराष्ट्रीय योग दिनापर्यंत हा आकडा आणखी वाढण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या अभियानांतर्गत सहभागींसाठी सोपे आणि दैनंदिन जीवनात सहज समाविष्ट करता येतील असे योगाभ्यास सत्र उपलब्ध करून देण्यात आले आहेत. ही मार्गदर्शित सत्रे आयुष मंत्रालयाच्या यूट्यूब चॅनेलवर उपलब्ध असून, त्यांचे नेतृत्व हॅबिल्डचे सह-संस्थापक आणि योग प्रशिक्षक सौरभ बोथरा करत आहेत. सौरभ बोथरा यांनी सांगितले की, “योग तेव्हाच खऱ्या अर्थाने परिवर्तन घडवतो, जेव्हा तो अधूनमधून केली जाणारी कृती न राहता रोजच्या जीवनातील शिस्त बनतो. आधुनिक जीवनशैलीमुळे सातत्य राखणे अनेकांसाठी आव्हानात्मक ठरते.

## भव्य “कसुंबल डायरो” कार्यक्रम उत्साहात संपन्न!





नालासोपारा : (स. गांवकरी)

मोमाई भजन प्रवासी मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला भव्य “कसुंबल डायरो” कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर, समाजसेवक, लोककलावंत, भजन मंडळांचे प्रतिनिधी तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून श्री नानजीभाई खिमजीभाई ठक्कर, आमदार राजनजी नाईक, मनोजभाई बारोट, निलेश देशमुख, धनंजय गावडे, निलेशभाई चौधरी, इंद्रजीत बारोट, जगदीशभाई ब्रह्मभट्ट, राजुभाई टेपोवाला, लोकसाहित्य वक्ते संजयभाई ठानकी, उत्तम टांक म्युझिकल ग्रुप, उत्तर गुजरातचे प्रकाश प्रजापती, संतवाणीचे लोकगायक योगेशभाई जोशी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना श्री नानजीभाई ठक्कर यांनी सांगितले की, “मी गेली ४० वर्षे या कार्यक्रमाला नियमितपणे उपस्थित राहत आहे. ललीत महाराजांच्या काळापासून या उपक्रमाशी माझे नाते जोडले गेले आहे.” त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणाचे महत्त्व, शिस्त, कठोर परिश्रम आणि उज्ज्वल भविष्यासाठी सातत्यपूर्ण अभ्यासाची गरज अधोरेखित केली.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. तसेच आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून त्यांना प्रोत्साहन देण्यात आले. वॉटर बॅग, पेन, वह्या आदी साहित्य विद्यार्थ्यांच्या हस्ते देण्यात आले. दरवर्षी हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात आयोजित करून आदिवासी बांधवांसाठी भोजनाची व्यवस्था केली जाते, ही सामाजिक बांधिलकी जपणारी उल्लेखनीय परंपरा असल्याचे मान्यवरांनी नमूद केले. कार्यक्रमादरम्यान आरतीचा सोहळाही भक्तिभावाने पार पडला. यावेळी श्री नानजीभाई ठक्कर यांचा शाल व श्रीफळ देऊन विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राजुभाई ब्रह्मभट्ट, किरणभाई तसेच सर्व सहकार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. समारोप प्रसंगी राजुभाई यांनी उपस्थित सर्व मान्यवर, कार्यकर्ते आणि विशेषतः श्री नानजीभाई ठक्कर यांचे आभार मानले. भजन, लोकसाहित्य, समाजसेवा आणि शैक्षणिक प्रोत्साहन यांचा सुंदर संगम घडवून आणणारा हा कार्यक्रम उपस्थितांच्या स्मरणात कायम राहील, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# महिलांच्या डोक्यावरचा हंडा उतरला, वाघ्याची वाडी झाली 'पाणीदार' !

- पाणीटंचाईने होरपळलेल्या वाडीत बायफ-महिंद्राने आणली जलक्रांती!



इगतपुरी : (स. गांवकरी)

सह्याद्रीच्या दुर्गम डोंगरदऱ्यांमध्ये वसलेली आदिवासी बहूल वाघ्याची वाडी. अगदी काल परवापर्यंत उन्हाळा आला की पाण्याच्या थेंबासाठी आसुसलेली... पावसाळ्यात धो-धो कोसळणारा मुसळधार पाऊस आणि उन्हाळ्याच्या दिवसांत घशाला कोरड... हे चित्र आता बदलले असून यंदाचा उन्हाळा याला अपवाद आहे. वर्षानुवर्षे पाणीटंचाईच्या भीषण झळा सोसणाऱ्या वाडीत पाण्याचा कृत्रिम झरा आशेचे नवे जीवन घेऊन पोहोचला आहे. सौरऊर्जेवर आधारित पाणी योजनेमुळे आज गाव 'पाणीदार' झाले असून, ग्रामस्थांच्या विशेषतः महिलांच्या आयुष्यात मोठा दिलासा निर्माण झाला आहे. रोज पहाटे डोक्यावर हंडा घेऊन सुरू होणारी पाण्यासाठीची वणवण, डोंगरउतारांवरील पायपीट आणि उन्हाच्या झळांमध्ये होणारी दमछाक आता इतिहासजमा झाली आहे...

परिवर्तनाची ही विलक्षण रोचक कहाणी घडवली आहे बायफ लाइव्हलीहुड्सने. महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेड कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून 'जलसमृद्धी' प्रकल्पांतर्गत उभारण्यात आलेल्या पाणी योजनेमुळे वाघ्याची वाडीतील जीवनमानात आशादायी बदल घडून आला आहे. इगतपुरी तालुक्यातील खडकेद गावाच्या शिवारात, सह्याद्रीच्या डोंगररांगांमध्ये वसलेली वाघ्याची वाडी... अवघ्या २३ कुटुंबांची ही छोटीशी आदिवासी वस्ती. पावसाळ्यात येथे धो-धो मुसळधार पाऊस कोसळतो. ओढे-नाले दुथडी भरून वाहतात. मात्र मार्च-एप्रिल उजाडला की याच गावावर पाण्याचे गंभीर संकट अधिक गहिरे होत असे. जवळपास कोणताही पाण्याचा कायमस्वरूपी स्रोत नसल्याने ग्रामस्थांना अनेक वर्षे आंबेवाडी गावातून बैलगाडीने पाणी आणावे लागत होते.

सकाळ होताच डोक्यावर हंडे घेऊन पाण्याच्या शोधात महिलांची पायपीट सुरू होत असे. पिण्यासाठी, घरगुती वापरासाठी आणि जनावरांसाठी लागणारे पाणी वाहून आणताना महिलांची अक्षरशः दमछाक होत होती. दिवसातील मोठा वेळ केवळ पाण्यासाठी खर्च होत असल्याने सततची ओढाताण सुरू असायची.

जागतिक आरोग्य संघटनेच्या निष्कर्षानुसार निरोगी आयुष्यासाठी प्रत्येक व्यक्तीला दररोज किमान ५० लीटर पाण्याची गरज असते. मात्र वाघ्याची वाडीतील रहिवाशांसाठी जीवनावश्यक असलेले हे पाणी दूर अंतरावर होते. उन्हाळ्याची चाहूल लागली की पाणी टंचाईचे संकट समोर उभे राहायचे. एप्रिल महिन्यात परिस्थिती अधिकच भीषण होत असे. २०२१मध्ये ग्रामपंचायतीने पाण्याच्या स्रोताजवळ विहीर बांधून दिल्यानंतर काहीसा दिलासा मिळाला; मात्र संकट पूर्णपणे दूर झाले नव्हते. महिलांना अजूनही ४०० ते ५०० मीटर अंतर चालत जावे लागे. विहिरीतील खोल पाणी दोरीच्या सहाय्याने हाताने बादलीत भरून काढावे लागायचे. अनेकदा कडेवर लहान मूल आणि डोक्यावर पाण्याचा हंडा अशी कसरत महिलांना करावी लागत होती. घरात मुलांना सांभाळायला कोणी नसल्याने महिलांना त्यांनाही सोबत घेऊन पाण्यासाठी जावे लागे.

शाळेत जाण्याच्या वयातील मुलांच्या हातात पाठ्यपुस्तकांऐवजी पाण्याची भांडी दिसत. सकाळ-संध्याकाळ विहिरीवर फेऱ्या मारणे जणू महिलांच्या पाचवीला पुजले होते. पावसाळ्यात चिखलातून निसरड्या वाटांवरुन तोल सांभाळत चालणे आणि उन्हाळ्यात तापलेल्या उन्हात पाणी वाहून आणणे, हे रोजचेच दिव्य पार पाडावे लागत असे.

गावातील ही अनेक वर्षांची गंभीर समस्या लक्षात घेऊन बायफ लाइव्हलीहुड्सने 'जलसमृद्धी' प्रकल्पांतर्गत या वस्तीसाठी सौरऊर्जेवर आधारित पिण्याच्या पाण्याची योजना उभारली. महिंद्रा अँड महिंद्रा कंपनी लिमिटेडच्या सीएसआर निधीतून हे काम करण्यात आले. स्थानिक भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास, ग्रामस्थांच्या गरजांची जाण आणि लोकसहभाग या त्रिसूत्रीवर उभे राहिलेले हे काम म्हणजे ग्रामीण भागातील परिवर्तनाचे प्रभावी उदाहरण ठरावे.

फेब्रुवारी २०२६मध्ये पूर्ण झालेल्या या योजनेअंतर्गत ३ हॉर्स पॉवर क्षमतेचा सौरपंप बसविण्यात आला. विहिरीपासून टेकडीवरील पाण्याच्या टाकीपर्यंत सुमारे ३०० मीटर लांबीची पाइपलाइन टाकण्यात आली. १० हजार लीटर क्षमतेची पाण्याची टाकी उभारून त्याला चार नळांचे स्टँड जोडण्यात आले. वन्यप्राण्यांपासून आणि लोकांच्या सुरक्षेचा विचार करून सौर पॅनेलभोवती वायर फेन्सिंग केले आहे. विहिरीभोवती काँक्रीट रिंग टाकून उंची वाढवण्यात आली. विशेष म्हणजे या कामात ग्रामस्थांनी स्वतःहून श्रमदान करून सक्रिय सहभाग नोंदवला.

आज वाघ्याची वाडीतील चित्र पूर्णपणे बदलले आहे. सूर्य उगवतो आणि त्याच ऊर्जेवर पाणी आपोआप टाकीत पोहोचते. सूर्योदयाबरोबर डोक्यावर हंडा घेऊन महिलांना आता डोंगर चढ-उतार करावे लागत नाहीत. घराजवळ नळाद्वारे पाणी उपलब्ध झाल्याने पाण्यासाठीची यातायात आणि शारीरिक कष्ट कायमचे थांबले आहेत. दररोज पाणी आणण्यासाठी खर्च होणारा दोन ते तीन तासांचा वेळ आता शेती, मजुरी, मुलांची काळजी आणि स्वतःसाठी वापरता येऊ लागला आहे. या प्रकल्पामुळे केवळ पाणी उपलब्ध झाले नसून, पाण्यासाठी झगडणाऱ्या महिलांच्या चेहऱ्यावर समाधानाची लहर पसरलेली दिसते. मुलांना अभ्यासासाठी वेळ मिळू लागला आहे.

> "सौर पाणी योजनेमुळे वाघ्याची वाडीची अनेक वर्षांची पाण्याची तहान भागणार आहे. पाण्यासारखी महत्त्वाची समस्या मिटली. महिलांचे कष्ट कमी झाल्यामुळे त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे."
> **- वनिता अरुण खतेले, सरपंच, खडकेद .**

## थोडक्यात पण महत्वाचे

### अँन्टी-डँप म्हणजेच आर्द्रता-विरोधक तंत्रज्ञान सादर




पुणे (स. गांवकरी) : आजच्या घरमालकांना केवळ सुंदरच दिसणारी नाहीत तर आरामदायकही वाटणारी आणि वर्षानुवर्षे टिकणारी घरे आवडतात. परंतु, किफायती पेंट प्रकारांत, दिसण्यास आकर्षक, उत्तम कामगिरी आणि परवडणारी किंमत या तिन्ही गोष्टी एकत्र देणारी उत्पादने शोधणे मात्र अनेकदा कठीण असते. सर्वसामान्य चिंतांपैकी एक म्हणजे भिंतींवरील पाण्याचे डाग, ही एक अशी समस्या आहे जी अन्यथा चांगल्या प्रकारे जोपासलेल्या घराचे सौंदर्य नकळतपणे कमी करू शकते. ही गरज लक्षात घेऊन, एशियन पेंट्सने आपल्या लोकप्रिय एस आणि ट्रॅक्टर इमल्शन्समध्ये अँटी-डॅम्प म्हणजेच आर्द्रता विरोधी तंत्रज्ञान सादर केले आहे. याबरोबरच, ही उत्पादने कामगिरीच्या महत्त्वाच्या पैलूंवर 4 वर्षांची वॉरंटी देतात, ज्यामुळे दीर्घकाळ टिकणारी कामगिरी आणि मूल्य एकाच उत्पादनात जुळून मिळतात. एशियन पेंट्सचे दोन सर्वात विश्वासार्ह आणि मोठ्या प्रमाणावर वापरले जाणारे ब्रँड्स, एस (Ace) आणि ट्रॅक्टर (Tractor) इमल्शन्स, यांनी किफायती प्रकारात विश्वसनीय दर्जा आणि मूल्य उपलब्ध करून घरमालक, डीलर्स आणि कंत्राटदारांचा विश्वास जिंकला आहे. ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी पोर्टफोलिओमध्ये नवनवीन शोध सातत्याने सादर करणे चालू आहे. यामध्ये अधिक चांगले मूल्य देणारी ट्रॅक्टर अॅन्ड एस स्पार्क (ACE Sparc) श्रेणी आणि घरांसाठी एक चमकदार फिनिश देणारी ट्रॅक्टर अॅन्ड एस शाइन (Ace Shine) श्रेणी समाविष्ट आहे.

### आपला ठसा उमटवणाऱ्या एस्सेल समूहाची रोमांचक 100 वर्षे पूर्ण

अहिल्यानगर (स. गांवकरी) : बहुआयामी भारतीय व्यावसायिक समूह एस्सेल ग्रुपने गौरवशाली 100 वर्षे पूर्ण करून आपल्या प्रवासातील एक ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. 1926 मध्ये आदमपूर नावाच्या एका छोट्या शहरात झालेल्या सुरुवातीपासून ते विविध व्यवसायांमध्ये विस्तारलेल्या बहुआयामी समूहापर्यंत, एस्सेल ग्रुपने जगभरात एक कायमस्वरूपी ठसा उमटवला आहे. 1967 पासून, एस्सेल ग्रुपने एका पारंपरिक व्यवसायातून स्टार्ट-अपमध्ये स्वतःला रूपांतरित करत जागतिक समूहामध्ये आमूलाग्र बदल घडवून आणले आणि स्वतःला नव्याने घडवले आहे. ग्रुपच्या मुळातील पारंपरिक वस्तूंच्या व्यापाराचा व्यवसाय लष्करी पुरवठा आणि सीमेपलीकडील व्यापाराकडे वळवण्यात आला. विशेष म्हणजे, अनेक व्यवसायांची सुरुवात ही या ग्रुपने केली असून, उद्योगातील अनेक गोष्टींची सुरुवात ही त्यांच्या नावावर आहे. महत्त्वाचे म्हणजे आपली स्टार्ट-अप मानसिकता जोपासत आणि नफ्यावर बारकाईने लक्ष केंद्रित करत, ज्या व्यवसायांनी अपेक्षित मूल्य-वितरणाची पातळी गाठली नाही, असे काही व्यवसाय बंद करण्यास ग्रुपने कधीही मागेपुढे पाहिले नाही. स्वर्गीय राम गोपाल जी यांनी स्थापन केलेला, त्यांचे सुपुत्र श्री जगन्नाथ जी गोएंका यांनी विस्तार केलेल्या या व्यवसायाला श्री. नंद किशोर जी यांनी भक्कम पाठिंबा दिला. दूरदृष्टी लाभलेल्या डॉ. सुभाष चंद्र आणि त्यांचे बंधू – लक्ष्मी नारायण, जवाहर आणि अशोक गोयल यांनी यशस्वीपणे नेतृत्व केलेला एस्सेल ग्रुप हा मोजक्याच भारतीय व्यावसायिक समूहांपैकी एक आहे, जो आपली समृद्ध परंपरा सहाव्या पिढीकडे यशस्वीपणे हस्तांतरित करत आहे – आणि विशेष म्हणजे, या समूहाची चौथी आणि पाचवी पिढी आजही सक्रिय आहे. गेल्या शतकादरम्यान, या समूहाने पॅकेजिंग, गृह मनोरंजन, मनोरंजन उद्याने, वृत्तसेवा, आशय वितरण, पायाभूत सुविधा, स्थावर मालमत्ता, शिक्षण, तंत्रज्ञान, जीवनशैली आणि अशा विविध व्यावसायिक क्षेत्रांमध्ये आपला विस्तार केला; ज्यामुळे 190 हून अधिक देशांमधील अब्जावधी लोकांच्या जीवनावर सकारात्मक प्रभाव पडला आहे.

## अक्षय यादव यांना पुरस्कार

मुंबई : (स. गांवकरी)



समाजसेवा, कर्तव्यनिष्ठा आणि क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल मुंबई पोलीस दलातील कॉन्स्टेबल तथा यशस्वी मॅरेथॉनपटू अक्षय अधिक यादव यांची 'स्टार महाराष्ट्र गौरव पुरस्कार २०२६' साठी निवड करण्यात आली आहे. अवघ्या २९ व्या वर्षी अक्षय यादव हे मुंबई पोलीस दलात कॉन्स्टेबल म्हणून कार्यरत असून त्यांची नियुक्ती वरळी पोलीस मुख्यालय येथे आहे. पोलीस सेवेत असताना त्यांनी आपल्या कर्तव्याचे प्रामाणिकपणे पालन करत नागरिकांच्या सुरक्षेसाठी उल्लेखनीय कार्य केले आहे. कर्तव्य बजावत असतानाच त्यांनी क्रीडा क्षेत्रातही आपला ठसा उमटवला आहे. मॅरेथॉन धावपटू म्हणून विविध स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवत त्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली असून अनेक युवकांसाठी ते प्रेरणास्थान ठरले आहेत. त्यांची जिद्द, शिस्त, मेहनत आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी विशेष उल्लेखनीय मानली जाते. सार्वजनिक सेवेमधील योगदान तसेच क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय यशाची दखल घेत त्यांना 'स्टार महाराष्ट्र गौरव पुरस्कार २०२६' प्रदान करून सन्मानित करण्यात येणार आहे. या यशाबद्दल अक्षय अधिक यादव यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे.

## प्लॅटिनमआरएक्सने १० लाख युजर्सचा टप्पा पार केला

पुणे : (स. गांवकरी)




परवडणाऱ्या ब्रँडेड-जेनेरिक औषधे उपलब्ध करून देणाऱ्या भारतातील सर्वात विश्वासार्ह प्लॅटफॉर्म असलेल्या प्लॅटिनमआरएक्सने मोठा टप्पा गाठला असून देशभरातील 10 लाखांहून अधिक रुग्णांना आपली सेवा दिली आहे. दर्जेदार जेनेरिक पर्याय उपलब्ध करून देत कंपनीने ग्राहकांच्या औषध खर्चात एकूण 128 कोटी रुपयांपेक्षा जास्त बचत केली आहे. मधुमेह, उच्च रक्तदाब आणि हृदयविकारासारख्या आजारांमुळे लाखो भारतीयांना दरमहा 2,000 ते 5,000 रुपयांपर्यंत औषधांवर खर्च करावा लागतो. या वाढत्या खर्चामुळे 70 कोटींहून अधिक लोक औषधांचे डोस चुकवतात, औषधे पुन्हा घेण्यास उशीर करतात किंवा उपचार अर्धवट सोडतात. ही परिस्थिती बदलण्यासाठी प्लॅटिनमआरएक्सची सुरुवात करण्यात आली. हा प्लॅटफॉर्म प्रत्येक औषधासाठी एक काळजीपूर्वक निवडलेला आणि उच्च दर्जाचा ब्रँडेड जेनेरिक पर्याय उपलब्ध करून देतो. ही औषधे नामांकित फार्मा कंपन्यांकडून थेट घेतली जातात आणि त्यामध्ये मूळ ब्रँडेड औषधांप्रमाणेच 100 टक्के समान सॉल्ट कॉम्पोझिशन असते. परवानाधारक फार्मासिस्टमार्फत औषधे दिली जातात आणि भारतातील 20 हजारांहून अधिक पिनकोडपर्यंत डिलिव्हरी केली जाते. मोठ्या शहरांमध्ये एका दिवसात, तर इतर भागांत 1 ते 3 दिवसांत औषधे पोहोचवली जातात. या प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून रुग्ण गुणवत्ता आणि सुरक्षिततेत कोणतीही तडजोड न करता दर महिन्याला औषधांच्या खर्चात 50 ते 60 टक्के बचत करू शकतात. आशुतोष पांडे, सह-संस्थापक, प्लॅटिनमआरएक्स म्हणाले, "भारतीय रुग्णांचे 128 कोटी रुपये वाचणे हे आमच्यासाठी केवळ आकडेवारी नाही, हे ते पैसे आहेत जे आता कुटुंबांच्या दैनंदिन गरजांसाठी, मुलांच्या शिक्षणासाठी आणि घरखर्चासाठी वापरले जात आहेत. औषधांच्या वाढत्या खर्चामुळे अनेक कुटुंबांवर आर्थिक ताण येतो आणि अनेकदा या गरजा मागे पडतात. आमचा विश्वास आहे की चांगल्या दर्जाची औषधे ही लक्झरी असू नयेत, प्रत्येकाला परवडणाऱ्या किमतीत मिळायला हवीत. आज जवळपास 10 लाख कुटुंबांपर्यंत पोहोचल्यानंतर हा विचार मोठ्या बदलाचे रूप घेत आहे."

जेनेरिक औषधांच्या बाजारात प्लॅटिनमआरएक्सने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. याची सर्वात मोठी खासियत म्हणजे सोपी आणि विश्वासार्ह व्यवस्था. हे प्लॅटफॉर्म रुग्णांना अनेक पर्याय देऊन गोंधळात टाकत नाही, तर प्रत्येक सॉल्टसाठी फक्त एकच विश्वासार्ह आणि तपासलेला ब्रँडेड जेनेरिक पर्याय उपलब्ध करून देते. त्यामुळे रुग्णांचा विश्वास वाढतो आणि डॉक्टरांनी दिलेल्या महागड्या ब्रँडेड औषधांऐवजी कमी किमतीच्या ब्रँडेड-जेनेरिक औषधांकडे वळणे सोपे होते. प्लॅटिनमआरएक्सची स्थापना आशुतोष पांडे आणि पियुष कुमार यांनी केली. हे दोघेही अनुक्रमे इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी दिल्ली आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट कोलकाता येथील माजी विद्यार्थी आहेत.

## बाबासाहेब वैद्य यांनी शिक्षणासोबत माणूस घडविण्याचे कार्य केले – दशरथराव सावंत!

### मुख्याध्यापक बाबासाहेब वैद्य यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा उत्साहात संपन्न!





अकोले : (स. गांवकरी)

अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीच्या हभप सावित्राआई माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक बाबासाहेब किसनराव वैद्य यांच्या सेवापूर्ती निमित्त आयोजित गौरव सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या प्रसंगी बोलताना संस्थेचे माजी अध्यक्ष, विश्वस्त तथा ज्येष्ठ नेते दशरथराव सावंत यांनी "बाबासाहेब वैद्य यांनी विद्यार्थ्यांना केवळ शिक्षणच दिले नाही, तर संस्कारक्षम व जबाबदार माणूस घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले," असे गौरवोद्गार काढले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हभप विष्णुपंत वैद्य होते. व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष इंजि. सुनील दातीर, सचिव सुधाकरराव देशमुख, विश्वस्त गिरजाजी जाधव, दशरथराव सावंत, जे. डी. आंबरे, एस. पी. देशमुख, यशवंतराव आभाळे, शरदराव देशमुख, रमेशराव जगताप, ज्येष्ठ विधिज्ञ के. बी. हांडे, शिक्षणाधिकारी एस. पी. मालुंजकर यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीच्या वतीने बाबासाहेब वैद्य यांचा शाल, सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. सन्मानपत्राचे वाचन प्रा. महेश पाडेकर यांनी केले. यावेळी दशरथराव सावंत म्हणाले की, संस्थेने नेहमीच शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांमध्ये माणुसकी, मूल्ये आणि सामाजिक बांधिलकी रुजविण्यावर भर दिला आहे. बाबासाहेब वैद्य यांनीही हा वारसा यशस्वीपणे पुढे नेला. त्यांच्या कार्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे जीवन घडले आहे. अध्यक्षीय भाषणात हभप विष्णुपंत वैद्य यांनी सेवानिवृत्तीनंतरही बाबासाहेब वैद्य यांनी आपले ज्ञान व अनुभव समाजकार्यासाठी वापरावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. संस्थेचे सचिव सुधाकरराव देशमुख यांनी बाबासाहेब वैद्य यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. शाळेच्या प्रगतीसाठी त्यांनी सातत्याने योगदान दिले. सेवापूर्ती सोहळ्यात वृक्षरोप भेट देण्याचा त्यांचा उपक्रमही अनुकरणीय असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमात विद्यार्थिनी सानिका मोहटे, शिवांजली कानवडे, वैद्य परिवाराच्या वतीने सौ. भाग्यांजली राक्षे व आर्या ढगे यांनी मनोगते व्यक्त केली. तसेच हभप दत्तात्रय महाराज आवारी, संपत नाईकवाडी, के. बी. हांडे व जे. डी. आंबरे यांनीही वैद्य सरांच्या कार्याचा गौरव केला. सत्काराला उत्तर देताना बाबासाहेब वैद्य म्हणाले की, आपल्या सेवाकाळात त्यांनी आदिवासी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रामाणिकपणे काम केले. विद्यार्थ्यांना आनंदी वातावरणात शिक्षण देत त्यांच्या गुणवत्तावाढीसाठी प्रयत्न केले. अनेक विद्यार्थी आज विविध उच्च पदांवर कार्यरत असून त्यांच्याकडून मिळणारा सन्मान हीच आपल्या कार्याची खरी पावती असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

> "विद्यार्थी हाच माझ्या कामाचा आरसा आहे. मी कधीही तत्त्वांशी तडजोड केली नाही. संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे, सहकाऱ्यांचे व मित्रपरिवाराचे मला मोलाचे सहकार्य लाभले," असेही त्यांनी सांगितले.कार्यक्रमाचे स्वागत संभाजी वैद्य यांनी, प्रास्ताविक सुनील जाधव यांनी केले. सूत्रसंचालन रामदास कासार यांनी तर आभार प्रदर्शन लक्ष्मणराव वैद्य यांनी केले.

# सुखात नव्हे, दु:खातही संघटना आपल्या पाठीशी; डॉ. स्वामी शिरकुल

**वैदू समाजातील गुणवंतांचा गौरव; मुंबई पोलीस दलात निवड झालेल्या शिंदे यांचा सत्कार!**

- समाजातील यशस्वी तरुणांना प्रोत्साहन देणे ही काळाची गरज – डॉ. स्वामी शिरकुल
- अखिल भारतीय वैदू समाज फाउंडेशनकडून पोलीस अधिकाऱ्यांसह गुणवंतांचा सन्मान वैदू समाजाची नवी वाटचाल!

(स. गांवकरी)

समाजातील तरुणांनी शिक्षण, नोकरी, प्रशासन, पोलीस दल तसेच विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केल्यास त्यांचा योग्य सन्मान करून त्यांना प्रोत्साहन देणे ही समाजाची जबाबदारी आहे. समाजातील कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव केल्याने इतर युवकांनाही प्रेरणा मिळते, असे प्रतिपादन अखिल भारतीय वैदू समाज फाउंडेशनचे प्रांतिक अध्यक्ष डॉ. स्वामी शिरकुल वैदू यांनी केले. अखिल भारतीय वैदू समाज फाउंडेशनचे संस्थापक मार्गदर्शक दशरथजी आटकर यांच्या प्रेरणेतून नगर जिल्ह्यातील सावेडी येथे वैदू समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या तरुणांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुंबई पोलीस दलात कॉन्स्टेबल पदावर निवड झालेल्या सोनई येथील बांदा शिंदे तसेच राहुरी पोलीस ठाण्यात कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या रमेश शिंदे यांचा शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. सत्कार समारंभात बोलताना डॉ. स्वामी शिरकुल वैदू यांनी सांगितले की, वैदू समाज हा देशभर विखुरलेला असून अनेक वर्षे भटकंती करून उदरनिर्वाह करणारा समाज म्हणून ओळखला जात होता. मात्र गेल्या काही वर्षांपासून शिक्षणाबाबत समाजात जागृती निर्माण झाली आहे. त्यातून समाजातील अनेक मुले-मुली उच्च शिक्षण घेऊन पोलीस, लष्कर, प्रशासन, वैद्यकीय, अभियांत्रिकी तसेच इतर क्षेत्रांत यश मिळवत आहेत. ही बाब संपूर्ण समाजासाठी अभिमानास्पद असून अशा गुणवंतांना प्रोत्साहन देण्यासाठी संघटना सातत्याने प्रयत्नशील असल्याचे त्यांनी नमूद केले.

"सुखात नव्हे तर दुःखातही संघटना आपल्या समाजबांधवांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहील. समाजातील प्रत्येक कुटुंबाशी आपुलकीचे नाते निर्माण करून त्यांना न्याय, मार्गदर्शन आणि मदत मिळवून देणे हेच संघटनेचे ध्येय आहे," असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. सन्मानाला उत्तर देताना बांदा शिंदे आणि रमेश शिंदे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. "ज्या समाजात आपण जन्मलो, वाढलो आणि घडलो त्या समाजाकडून मिळालेला सन्मान हा आमच्यासाठी अत्यंत मोलाचा आहे. शाल आणि पुष्पगुच्छ हे केवळ सन्मानाचे प्रतीक नसून त्यामागे समाजाचे प्रेम, विश्वास आणि आशीर्वाद आहे. या गौरवामुळे आमच्या कार्याची जबाबदारी आणि प्रेरणा अधिक वाढली असून समाजासाठी आणखी चांगले काम करण्याची उर्मी मिळाली आहे," असे त्यांनी सांगितले.



कार्यक्रमात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या वैदू समाजातील अनेक युवकांचाही पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. समाजातील तरुणांनी शिक्षणाला प्राधान्य देऊन शासकीय सेवांमध्ये मोठ्या प्रमाणात प्रवेश करावा, तसेच समाजाच्या प्रगतीसाठी योगदान द्यावे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

या प्रसंगी संघटनेचे ज्येष्ठ नेते व सामाजिक कार्यकर्ते भावड्या भाऊ धनगर, रामनाथ धनगर, संजय शिर्के, भारत शिर्के, लकी भाऊ, शिवा शिंदे, सतीश शिंदे, अविनाश शिंदे, रवी शिंदे, गणेशभाई धनगर, कन्हैया धनगर यांच्यासह समाजातील अनेक मान्यवर, कार्यकर्ते व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.